म. ग्रं सं. वाचनालय, ठाणे.
विषय ....ज्ञा-वा..........
दा. क्र. १६५८०

BVBK-0101687

# दोन शब्द

या आन्तरराष्ट्रीय बालकवर्षाच्या पार्श्वभूमीवर पंडित नेहरूंच्या आत्मचरित्राच्या संक्षिप्त मराठी अनुवादाची ही दुसरी आवृत्ती कुमार-वाचकांसाठी उपलब्ध करून देताना समाधान वाटत आहे.

मूळ आत्मचरित्राचे अनुवादक, सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ना. ग. गोरे यांच्या कुशल लेखणीनेच हा संक्षेप केला असल्यामुळे तो किती यथायोग्य झाला आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. व्यक्ती, निसर्ग, तुरुंगवास आणि ग्रंथ इत्यादींचा पंडितजींवर मोठा परिणाम झालेला होता. म्हणून तदनुषंगाने येणारी जिवंत वर्णने येथे समाविष्ट केली असून तात्त्विक व राजकीय वादविवाद गाळले आहेत. मुख्यतः पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसकसा होत गेला याचेच चित्र येथे उमटलेले दिसेल.

महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील प्रत्येक विद्यार्थ्याने मनापासून वाचावे असे हे लाख मोलाचे पुस्तक आहे. त्याच्या पुनर्मुद्रणाचे काम 'कॉन्टिनेन्टल'कडे आपुलकीने सोपविल्याबद्दल आम्ही, आदरणीय श्रीमती इंदिराजी गांधी, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेचे माननीय विश्वस्त, आणि श्री. नानासाहेब गोरे यांचे फार आभारी आहोत.

मराठी मुले हे तेजस्वी पुस्तक वाचतील, आपल्या मित्रमैत्रिणींना वाचायला सांगतील आणि त्यापासून योग्य ती स्फूर्ती घेतील अशी खात्री आहे.

१९७९ —अनिरुद्ध अनंत कुलकर्णी

कालवश कमलेस

BVBK-0401687

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | आमचे घराणे व आमचे घर | .. | १ |
| २ | विद्याभ्यास | ... | ९ |
| ३ | राजकारणात प्रवेश | ... | १४ |
| ४ | शेतकऱ्यांशी ओळख | ... | २३ |
| ५ | गांधीयुगाचा प्रारंभ | ... | २७ |
| ६ | लखनौचा तुरुंग | ... | ३५ |
| ७ | पुन्हा बाहेरच्या जगात | ... | ४० |
| ८ | वडील आणि गांधीजी | ... | ४४ |
| ९ | युरोपची सफर | ... | ४८ |
| १० | लाठीचा प्रसाद ! | ... | ५६ |
| ११ | समाजवादाचे सूतोवाच | ... | ६३ |
| १२ | मेघांचा गडगडाट | ... | ६६ |
| १३ | नैनी तुरुंग | ... | ७३ |
| १४ | दिल्ली-करार व कराची-काँग्रेस | ... | ७९ |
| १५ | समेटाच्या कालातील कटकटी | ... | ८४ |
| १६ | समेटाची इतिश्री | ... | ८८ |
| १७ | भावतरंग | ... | ९४ |
| १८ | बाहेरच्या जगात | ... | १०० |
| १९ | धरणीकंप | ... | १०६ |
| २० | अलिपूरचा तुरुंग | ... | ११३ |
| २१ | पुनश्च डेहराडून तुरुंग | ... | ११९ |
| २२ | भरतवाक्य | ... | १२६ |



माते-समवेत छोटा जवाहर



ोतीलालजी व तरूण जवाहरलाल



पंडितजी, इंदिरा आणि सौ. कमला नेहरु



राष्ट्रपित्या - समवेत

म. नं. सं. ... ग्रंथालय शाखा.
बा. क्र. दिनांक
विषय ... ... क्र.

# आमचे घराणे व आमचे घर

१

आम्ही मूळचे काश्मीरातले. अठराव्या शतकाच्या अगदी प्रारंभी म्हणजे दोनशेहून अधिक वर्षांपूर्वी आमचे वाडवडील काश्मीरच्या खोऱ्यातून निघून पैसा आणि नाव कमाविण्यासाठी खालच्या समृद्ध प्रदेशात उतरले. फरुखसिअर बादशहाने काश्मीरला भेट दिली तेव्हा आमचे पूर्वज राज कौल फरुखसिअरच्या डोळ्यात भरले आणि १७१६ च्या सुमारास बहुश: बादशहाच्याच सांगण्यावरून कौल कुटुंब वास्तव्यासाठी दिल्लीस आले. एका कालव्याच्या काठी राहत्या घरासह एक जहागीर राज कौल यास देण्यात आली. कालव्याला हिंदीत ‘ नहर ’ असा शब्द आहे. तेव्हा कालव्याच्या काठी राहणारे म्हणून “ नेहरू ” असे अभिधान या घराण्याला मिळाले. मूळ नाव कौल, ते बदलून कौल–नेहरू असे झाले; कालान्तराने कौल गळून पडले आणि आम्ही नेहरू म्हणूनच ओळखले जाऊ लागलो.

त्यानंतरच्या धामधुमीच्या काळात आमच्या कुटुंबाच्या नशिबाने अनेक कलाटण्या खाल्ल्या; जहागीर कमी होत होत अजिबात नाहीशी झाली. आमचे पणजोबा लक्ष्मीनारायण नेहरू. गंगाधर नेहरू हे माझे आजे. १८५७ च्या प्रसिद्ध बंडाच्या जरा आधी ते दिल्लीचे कोतवाल होते. १८६१ मध्ये ते वयाच्या ३४ व्या वर्षी वारले. १८५७ च्या बंडापासून आमच्या घराण्याचा दिल्लीशी असलेला संबंध तुटला आणि आमचे सर्व कागदपत्र व दस्तऐवज बंडात गहाळ झाले. जवळची सर्व चीजवस्तू जवळजवळ खलास

झाल्यामुळे आमचे घराणेही इतर हजारो निराश्रित कुटुंबांप्रमाणे दिल्ली सोडून आग्र्यास आले. काही वर्षे नेहरू घराण्याचे वास्तव्य आग्र्यासच होते. तेथेच ता. ६ मे १८६१ रोजी माझ्या वडिलांचा जन्म झाला.

आमच्या कुटुंबाचा सर्व भार नंतर माझ्या दोघा काकांवर पडला. दोघेही माझ्या वडिलांहून बरेच मोठे होते. नुकत्याच स्थापन झालेल्या आग्र्याच्या हायकोर्टात माझे धाकटे काका वकिली करू लागले आणि हायकोर्टाचे स्थान बदलून ते अलाहाबादेला गेल्यावर नेहरू कुटुंबही अलाहाबादेस आले. तेव्हापासून अलाहाबाद हेच आमचे घर झाले; आणि त्याच शहरी माझा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी झाला.

माझ्या वडिलांचे शिक्षण कानपूर व अलाहाबाद येथे झाले. वकिलीतले सुरुवातीचे धडे कानपूरला तीन वर्षे घेतल्यावर माझे वडील अलाहाबाद येथे हायकोर्टात वकिली करण्यासाठी आले. त्यानंतर थोड्याच वर्षांनी त्यांचे बंधू पंडित नंदलाल हे एकाएकी वारले. माझ्या वडिलांच्या माथ्यावर ही आकाशीची कुऱ्हाडच कोसळली. कुटुंबातला कर्ता आणि मुख्य कमावता पुरुषही नाहीसा झाला. त्यामुळे एवढ्या मोठ्या कुटुंबाचा संसारगाडा चालवण्याची जबाबदारी तरुणपणीच माझ्या वडिलांच्या शिरावर पडली.

आपल्या धंद्यात ते अगदी गढून गेले. यशस्वी व्हावयाचे ही त्यांची प्रतिज्ञा. कित्येक महिनेपर्यंत इतर सर्व गोष्टींशी असलेला संबंध त्यांनी तोडून टाकला. काकाची बहुतेक वकीलपत्रे त्यांच्याकडे येऊन ती कामे त्यांनी व्यवस्थितपणे चालविल्याकारणाने वकिलीच्या धंद्यात प्रवीण होण्याची जी त्यांची मनीषा ती लवकरच पूर्ण झाली. यशामागोमाग अधिक काम व अधिक पैसाही त्यांच्या हाती आला व तरुण वयातच यशस्वी वकील असा त्यांचा बोलबाला झाला. इंग्रजी शिकलेल्या मध्यमवर्गीयांचे म्हणजे पांढरपेशांचे लक्ष नुकतेच काँग्रेसकडे जाऊ लागले होते. काँग्रेसच्या काही अधिवेशनांस वडील हजर राहात आणि तिच्याबद्दल वैचारिक निष्ठाही दाखवीत. पण काँग्रेसच्या कामात ते फारसे मन घालीत नसत. धंद्यातच ते गुंतून पडलेले होते.

सारख्या फुगत चाललेल्या मिळकतीबरोबर आमच्या राहणीतही पालट होत गेला; कारण वाढत्या उत्पन्नापाठोपाठ वाढता खर्च हा आलाच. हवा

तेव्हा आणि हवा तेवढा पैसा मिळविण्याची ऐपत अंगी असताना पैसा साठवणे म्हणजे आपल्या अंगच्या ऐपतीची अवहेलना करण्याप्रमाणे आहे, अशी माझ्या वडिलांची कल्पना होती. खेळाडू वृत्ती आणि हरतऱ्हेचे भोगविलास चाखण्याची आवड यांची गट्टी जमल्यावर खिशांतले पैसे बाहेर पडण्याला कोणताच प्रत्यवाय उरला नाही. आमची राहणी अधिकाअधिक पाश्चात्य वळणावर जाऊ लागली.

श्रीमंत आईबापांचे एकुलते एक चिरंजीव लाडामुळे बिघडण्याचा संभव फार; त्यातून हिंदुस्थानात तर तो अधिकच. आणि वयाच्या अकराव्या वर्षा-पर्यंत जर पाठीवर एकही भावंड झाले नाही, तर मग त्या मुलाचे फाजील लाड व्हायचे हे ठरलेलेच. माझ्या दोघी बहिणी माझ्याहून पुष्कळच लहान आहेत आणि आम्हा तिघा भावंडांत बऱ्याच वर्षांचे अंतर आहे. त्यामुळे बालपणात मला माझ्या बरोबरीचे सवंगडी लाभले नाहीत व मी थोडा एकलकोंडा असाच वाढलो. शाळेतल्या वर्गबंधूंची गट्टी जमावी तर तेही घडले नाही. कारण, बालकमंदिर अथवा प्राथमिक शाळा या संस्थांत मला कधीच पाठविण्यात आले नाही. मला शिक्षण देण्याचे काम खाजगी शिक्षक आणि शिक्षिकिणी यांच्यावरच सोपविलेले होते.

तथापि, आमच्या घरी माणसांची वाण नव्हती. हिंदू कुटुंब म्हटले की ते सोयऱ्याधायऱ्यांनी गजबजलेले असायचे. तसेच आमचेही घर होते. पण माझी चुलत भावंडे माझ्याहून पुष्कळच वडील. तेव्हा त्यांच्या कामकाजात अगर खेळात भाग घेण्यास मी फार लहान आहे असे त्यांना वाटे. तात्पर्य इतकेच की, कुटुंबात माणसे जरी पुष्कळ होती, तरी मला आपला एकान्तवासच घडे; आणि स्वतःचेच मनसुबे रचावेत आणि एकट्याचेच खेळ खेळावेत असेच भाग्य माझ्या वाटणीला येई.

धकाधकीचे प्रसंग अथवा दुसऱ्या काही उलाढाली माझ्या बालपणी घडल्या नाहीत. आयुष्याचा प्रवाह अगदी संथपणे वाहात होता. माझी चुलत भावंडे मोठमोठ्या गोष्टी बोलत, त्या सगळ्याच मला नेहमी समजत नसत. पण मी त्या लक्षपूर्वक ऐकत असे. इंग्रजांच्या उद्दाम स्वभावाविषयी आणि अपमानकारक वर्तणुकीविषयीही पुष्कळ वेळा बोलणी चालत आणि मूग गिळून स्वस्थ न बसता प्रत्येक हिंदी मनुष्याने त्यांचा छातीठोकपणे प्रतिकार केला

पाहिजे असेही मत प्रदर्शित होत असे. परकीय राज्यकर्त्यांची राजवट आणि वर्तणूक यांची मला फार चीड येत असली, तरी वैयक्तिक इंग्रज माणसाबद्दल माझ्या मनात द्वेषभाव उपजल्याचे मला तरी आठवत नाही. इंग्रज बाया माझ्या शिक्षण-संगोपनासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या आणि कधी कधी माझ्या वडिलांकडे त्यांचे इंग्रज स्नेही त्यांना भेटावयास येत असत. इंग्रजांविषयी माझ्या मनात आदरभावच होता.

सायंकाळी बहुधा खूपच मित्रमंडळी वडिलांना भेटण्यासाठी येत आणि दिवसभराच्या दगदगीनंतर जरा आराम करण्याच्या मनोवृत्तीत ते असले की वडिलांच्या तिमजली हसण्याने आमचे घर दणाणून जात असे. त्यांचे हसणे सर्व अलाहाबादेत प्रसिद्ध होते. क्वचित प्रसंगी पडद्याआडून मी वडिलांकडे आणि त्यांच्या मित्रपरिवाराकडे दृष्टी टाकीत असे. एकदा मी त्यांना कोणते तरी लाल मद्य पिताना पाहिले. व्हिस्की माझ्या परिचयाची होती; कारण ती पीत असताना वडिलांना व त्यांच्या मित्रांना मी पाहिलेले होते. परंतु हे लाल पेय पाहून मला फार भीती वाटली आणि ‘ बाबा रक्त पीत आहेत ’ असे सांगण्यासाठी मी आईकडे धावतच गेलो !

वडिलांबद्दल मला निस्सीम आदर होता. ते म्हणजे शक्ती, शौर्य आणि बुद्धिमत्ता यांचे साक्षात पुतळे आहेत अशी माझी कल्पना असे. माझ्या अगदी पहिल्या पहिल्या आठवणींपैकी एक आठवण त्यांच्या रागासंबंधीची आहे. कारण मीच त्यात होरपळून निघालो होतो. मी तेव्हा पाच-सहा वर्षांचा असेन. एक दिवस मला त्यांच्या कचेरीतील टेबलावर दोन फाउन्टन पेने आढळली. हावरेपणाने मी त्यांच्याकडे पाहात राहिलो. मनात विचार आला की, वडिलांना एकाच वेळी दोन फाउन्टन पेने लागण्याचा काही संभव नाही. म्हणून मी त्यांतले एक पेन लांबवले. नंतर मला कळून आले की, गहाळ फाउन्टन पेनचा तपास मोठ्या कसोशीने चाललेला आहे. माझ्या हातून घडलेल्या कृत्याच्या विचाराने मी अगदी भेदरून गेलो, पण मी कबूल झालो नाही. शेवटी पेन सापडले आणि माझा गुन्हा सर्वांना जाहीर झाला. वडील संतापाने लाल झाले आणि त्यांनी मला यथास्थित चोप दिला. मानहानीमुळे वाटणाऱ्या शरमेने आणि माराच्या दुःखाने अगदी मूढ बनून मी आईला जाऊन बिलगलो. मग

किती दिवस तरी माराने हुळहुळ्या झालेल्या आणि भीतीने थरथरणाऱ्या माझ्या लहानग्या शरीरावर मलमपट्ट्या चालल्या होत्या !

या शिक्षेबद्दल मी वडिलांवर आकस धरलेला मला आठवत नाही. झाली ती शिक्षा जरा कडक, पण योग्य झाली असे मला वाटले असावे. परंतु या प्रसंगानंतर वडिलांबद्दल वाटणारे प्रेम व आदर ही जरी पूर्वीप्रमाणेच कायम होती, तरी त्यांत भीतीचा अंश आला. आईविषयी मात्र तसे नव्हते. तिची भीती मला मुळीच वाटत नसे. कारण माझी खात्रीच असे की, मी काही केले तरी ती गयच करणार. माझ्यावर तिचे निरतिशय आणि अखंड प्रेम असल्यामुळे मीच तिच्यावर डोळे वटारीत असे ! वडिलांपेक्षा तिच्याशीच माझा संबंध फार येई, त्यामुळेही मला तीच अधिक जवळची वाटे. आणि ज्या गोष्टी वडिलांपाशी बोलाव्यात असे स्वप्नातही वाटणार नाही, त्या तिच्यापाशी मी बोलत असे. ती नाजूक ठेंगण्या बांध्याची अशी होती. मी लवकरच तिच्याइतका उंच झालो, तेव्हा तर मी तिच्या बरोबरीचा आहे असे मला वाटू लागले ! तिच्या सौंदर्याचा मला अभिमान वाटे, आणि तिच्या असाधारण सुंदर आणि चिमुकल्या हातापायांकडे पाहिले की मला आनंद होई. तिच्यातले काश्मीरी रक्त अद्यापि ताजे होते. कारण तिच्या माहेरच्या मंडळींनी काश्मीर सोडल्याला साऱ्या दोनच पिढ्या लोटल्या होत्या.

लहानपणी माझ्या विश्वासाचे दुसरे ठिकाण म्हणजे माझ्या वडिलांचे शिक्षक मुनशी मुबारक अली. मी अडचणीत सापडलो अगर माझे मन कष्टी झाले की मला त्यांच्यापाशी हटकून आसरा मिळावयाचाच. त्यांची भव्य मूर्ती व पांढरी शुभ्र दाढी पाहिली की, मला वाटे हे बहुत पुरातन गृहस्थ असावेत. मी त्यांना अगदी बिलगून बसे आणि अरेबिअन नाइट्समधल्या अगर दुसऱ्या पुस्तकांतल्या गोष्टी अथवा १८५७–५८ सालच्या प्रसंगांची वर्णने ते सांगू लागले, की मी आश्चर्यचकित दृष्टीने तासन् तास ऐकत राहात असे.

हिंदू पुराणे, रामायण–महाभारतासारखी महाकाव्ये यांतल्या कथाही माझी आई अगर काकू मला सांगत. काकू म्हणजे पंडित नंदलालांची पत्नी. हिंदू पुराणग्रंथांचे तिचे वाचन गाढ होते. आणि त्यातल्या गोष्टींचा तिच्याजवळ अपरंपार संग्रह होता; त्यामुळे हिंदी पुराणे आणि आख्यायिका यांच्याबद्दल मलाही बरेच ज्ञान झाले.

धर्मविषयीच्या माझ्या कल्पना फारच अंधुक होत्या. पण मला वाटे की धर्म म्हणजे बायकांचे खाते ! माझे वडील आणि माझी थोरली चुलत भावंडे तर धर्माची टरच उडवीत. त्याचा गंभीरपणे विचार करण्यास ते कधीच तयार नसत. कुटुंबातल्या बायकांची अनेक प्रकारची व्रतवैकल्ये आणि पूजाअर्चा चालत. आईबरोबर अथवा काकूबरोबर मी केव्हा केव्हा गंगेवर स्नानासही जात असे. कधी अलाहाबादेतल्या, बनारसमधल्या अथवा इतर ठिकाणच्या देवळांतूनही आम्ही जात होतो, तर कधी धार्मिक म्हणून प्रसिद्ध असलेल्या एखाद्या संन्याशाच्या दर्शनालाही बाहेर पडत होतो. पण या सर्वांचा माझ्या मनावर फारच थोडा परिणाम घडला.

याशिवाय मोठाले सण येत. होळी आली की सर्व शहरात नाचरंगाचे वातावरण पसरे आणि एकमेकांवर पिचकाऱ्यांनी पाणी उडवण्याची आम्हाला मुभा मिळत असे. दिवाळी आली की सर्व घरांवरून हजारो पणत्यांतून मंद ज्योती उजळल्या जात. बंदिशाळेत मध्यरात्री जन्मास आलेल्या कृष्णाचा उत्सव जन्माष्टमीला साजरा होई. रात्री त्या घटकेपर्यंत जागत राहणे मात्र आम्हाला मोठे कठीण काम वाटत असे. दसरा आणि रामलीला सुरू झाल्या की सोंगे आणि मिरवणुकी निघत आणि त्यांतून रामचंद्राच्या कथांचा पुनरुच्चार होई. लंकाविजय दाखवीत, तो पाहण्यास हजारो लोक लोटत असत. मोहरमची मिरवणूक पाहण्यासही सर्व मुले जात. आमच्या घराण्यात आणि इतर काश्मीरी कुटुंबांत काही असे खास सण साजरे होत की जे इतर हिंदूंत पाळण्याची चाल नव्हती. संवत वर्षमानानुसार येणारा नवरोज किंवा वर्षप्रतिपदा हा यांपैकी मुख्य सण. आमचा हा खास सण असे. त्या दिवशी घरातील सर्व माणसे नवे पोशाख करीत आणि लहान मुलांना देणगी म्हणून थोडे पैसेही देत.

पण या सर्व समारंभांत वर्षाकाठी एकदाच येणाऱ्या एका समारंभाची मला विशेष आवड वाटे. कारण त्यात मुख्य ठिकाणी माझी योजना हात असे. तो समारंभ म्हणजे माझा वाढदिवस. त्या दिवशी माझी फार गडबड उडायची. अगदी सकाळीच एका भल्या मोठ्या ताजव्यात गव्हाच्या मोटळ्या आणि इतर काही जिन्नस घालून माझे वजन करण्यात येत असे. नंतर ते जिन्नस गोरगरिबांना वाटून टाकीत. तुला झाली की मी नवा पोशाख चढवीत असे. मग मला देणग्या व बक्षिसे मिळत. उपरान्त भोजनाचा थाट उडे. या प्रसंगी

माझी मिजास म्हणजे राजाची ! माझी मुख्य तक्रार एवढीच होती की, माझा वाढदिवस फार अंतराअंतराने येई ! माझे वाढदिवस अधिक वेळ करण्यात यावेत अशी चळवळदेखील मी सुरू केली होती !

कधी कधी चुलतभावंडांच्या किंवा दुसऱ्या एखाद्या नातेवाइकाच्या अथवा मित्राच्या लग्नासाठी सगळे कुटुंबच्या कुटुंब आगगाडीने लांबच्या शहरी जात असे. अशा प्रवासात आम्हा मुलांची चंगळ होई. कारण लग्नकार्यात शिस्तीचे बंद ढिले सुटत आणि सर्व घरभर आमचा धिंगाणा चालू राही. जानोशाच्या जागी बहुधा अनेक कुटुंबे दाटीवाटीने राहात. त्यामुळे तेथे मुलांमुलींचा मोठा मेळाच जमावयाचा. अशा प्रसंगी मात्र माझी एकलकोंडेपणाची तक्रार दूर होई आणि खेळावयाची आणि खोड्या करण्याची हौस मनसोक्त भागविता येई. क्वचित प्रसंगी फार दंगा झाला की वडील माणसे जरा डोळे वटारीत.

त्या काळचा एक लहानसा प्रसंग माझ्या विशेष लक्षात राहिला आहे. तेव्हा मी बहुधा सात अथवा आठ वर्षांचा असेन. मी रोज घोडा फिरवण्यासाठी जात असे. माझ्याबरोबर अलाहाबादच्या घोडदळापैकी एक स्वार देण्यात येई. एके दिवशी संध्याकाळी मी घोड्यावरून पडलो आणि अर्धवट अरब अवलादीचा माझा सुंदर घोडा रिकाम्या खोगिरानेच घरी परत आला. वडिलांकडे टेनिससाठी लोक जमले होते, तेथे मोठी गडबड उडाली. खेळासाठी जमलेले समस्त लोक निरनिराळ्या प्रकारच्या वाहनात बसून माझ्या शोधासाठी बाहेर पडले. एक मोठी मिरवणूकच निघाली म्हणा ना ! वाटेतच ते मला भेटले, आणि मग माझे असे कौतुक झाले की मी जणू काही लढाईच मारून आलो होतो !

मी दहा वर्षांचा होतो तेव्हा आम्ही एका नव्या आणि खूप प्रशस्त घरात राहायला गेलो. वडिलांनी त्या घराचे नाव ‘ आनंद-भवन ’ असे ठेवले. घराभोवती खूप विस्तीर्ण उद्यान होते, आणि पोहण्यासाठी एक तलावही होता.

मी लवकरच पोहण्यास शिकलो. पाण्यात वरवर हात मारणे अगर पाण्याखाली बुडून पोहणे माझ्या चांगले अंगवळणी पडले होते. कंटाळवाण्या

उकाड्याच्या दिवसांत वाटेल तेव्हा आणि वाटेल तितक्या वेळा मी पाण्यात डुंबत असे. सायंकाळी वडिलांचे पुष्कळ मित्र तलावावर येत. तलाव म्हणजे नवलपरीची गोष्ट होती आणि तलावावर व खुद्द घरात विजेचे दिवे घेतले होते तेही अलाहाबादेत अपूर्वाईचेच समजले जात. पोहणारांचा तांडा आला की मला फारच आनंद होई आणि पोहता येत नसलेल्यांना पाण्यात ढकलण्यात आणि ओढण्यात जी काय गंमत होती ती मुळी औरच! डॉ. तेजबहादुर सप्रू त्या वेळी नव्यानेच अलाहाबादेत वकिली करू लागले होते, त्यांची मला चांगलीच आठवण आहे. त्यांना मुळीच पोहता येत नसे व पोहणे शिकण्याची त्यांची इच्छाही नव्हती. पाहिल्या पायरीवर पंधरा इंच पाण्यात ते बसून राहात. दुसऱ्या पायरीवर जाण्यालाही ते तयार व्हायचे नाहीत आणि कोणी ओढू लागला तर मोठमोठ्याने ओरडायचे. माझ्या वडिलांचे पोहणेही यथायथाच होते. परंतु दातओठ आवळून मोठ्या प्रचंड प्रयासाने तलावाची एक बाजू ते पुरी करीत असत.

त्या सुमारास मला एक बहीण झाली. प्रत्येकाला बहीण-भाऊ असताना मला मात्र ते नसावेत याचे मला मनातून फार वाईट वाटे. आता आपल्याला एक तरी भाऊ अगर बहीण सत्तेची अशी मिळणार ह्या विचाराने माझा आनंद गगनात मावेना. वडील त्या वेळी युरोपात होते. व्हरांड्यात उत्कंठेने मी वाट पाहात उभा राहिलो होतो, त्याची मला चांगली आठवण आहे. डॉक्टरांनी मला बहीण झाल्याची बातमी सांगितली आणि बहुधा विनोदानेच ते म्हणाले की, मुलगा झाला नाही हे बरे झाले; त्याने मिळकतीतला वाटा मागितला असता. असले अभद्र विचार माझ्या मनात येण्याइतका मी कोत्या बुद्धीचा आहे असे एखाद्याला वाटावे, ही गोष्ट माझ्या मनाला फार लागून राहिली आणि मला डॉक्टरांचा राग आला.

बाल वाङ्मय
वा. क्र. ........ दिनांक ........
विषय ........ क्र. ........

# २

मी ११ वर्षांचा असताना माझ्यासाठी एका नव्या शिक्षकाची योजना झाली, त्यांचे नाव फर्डिनंड टी. ब्रुक्स्. त्यांचे वडील आयरिश होते आणि त्यांची आई फ्रेंच अथवा बेल्जियन होती. ते निष्ठावंत थिऑसॉफिस्ट होते. त्यांच्या सहवासाने मला वाचनाची गोडी लागली, आणि मी किती तरी इंग्लिश पुस्तके वाचून काढली. अर्थात त्या वाचनात विशिष्ट हेतू असा काही नव्हता. वाङ्मयात माझी बरीच प्रगती झाली. लुई कॅरोलची पुस्तके मला भारी आवडत. तसेच डॉन क्विक्झोटमधली गस्ताव दोरेची चित्रे मला फार पसंत पडली आणि नॉन्सेनच्या 'फार्देस्ट नॉर्थ' ह्या पुस्तकामुळे मला नवीन दुनिया पाहावयाला सापडली. स्कॉट, डिकन्स, थॅकरे, वगैरेंच्या किती तरी कादंबऱ्या आणि एच्. जी. वेल्स्च्या अद्भुत कथा मी वाचल्याचे स्मरते. मार्क ट्वेन व शरलॉक होम्स्च्या गोष्टीही मी वाचल्या होत्या. "झेंडा तुरुंगातील बंदीवान्" या पुस्तकाने मला चटका लावला. जेरोम के. जेरोम चे 'थ्री मेन इन् ए बोट' हे पुस्तक म्हणजे विनोदाचा अत्युत्कृष्ट नमुना असे मला वाटत असे. काव्याची आवडही माझ्यात निर्माण झाली आणि ती आवड, माझ्यात बरेच बदल झाले असले तरी, अद्यापिही थोड्याफार प्रमाणात टिकून राहिली आहे.

विज्ञानशास्त्राचे दारही ब्रुक्समुळे थोडे किलकिले झाले. एक छोटीशी रसायनशाळा आम्ही उभारली. तेथे पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्रातले प्राथमिक प्रयोग करण्यात माझा किती तरी वेळ मोठ्या आनंदात जात असे.

त्यानंतर माझ्या मनावर रूसो–जपानी युद्धाचा परिणाम झालेला मला आठवतो. जपान्यांच्या विजयामुळे माझ्या उत्साहाला भरती चढली. नव्या बातम्या वाचावयास मिळाव्यात म्हणून मी वृत्तपत्रांची उत्सुकतेने वाट पाहात बसे. जपानसंबंधी अनेक पुस्तके मी विकत घेतली आणि त्यातली काही वाचून काढली. जपानचा इतिहास वाचताना जरा वाट चुकल्यासारखे होऊन त्यांचा सर्व संदर्भ नीटसा लागला नाही. परंतु पूर्वकालीन जपानी शिलेदारांचे पराक्रम मला आवडले. राष्ट्राभिमानाने अंतःकरण भरून येऊन हिंदुस्थान आणि आशियाखंड युरोपच्या दास्यशृंखलांतून कसे मुक्त होतील

या विचारांचे चक्र डोक्यात फिरू लागले. वीरोचित कामे मी करीत आहे, हातात तलवार घेऊन मी हिंदुस्थानसाठी लढत आहे, त्याला मी मुक्त करीत आहे अशी स्वप्ने पडू लागली.

१९०५ च्या मे महिन्यात मी पंधरा वर्षांचा असताना आम्ही इंग्लंडला जाण्यासाठी निघालो. माझे वडील, आई, छोटी बहीण, आणि मी सगळीच आम्ही इंग्लंडला चाललो होतो. मे महिन्याच्या अखेरीला एके दिवशी आम्ही लंडनला दाखल झालो. डोव्हरहून निघालेल्या आगगाडीतच आम्हाला सुशिमा येथे जपानने रशियावर मिळवलेल्या नाविक विजयाची हकिगत समजली. त्यामुळे मी अगदी खुषीत होतो. दुसऱ्याच दिवशी डर्बी शर्यत होती. आम्ही सर्वच शर्यतीला गेलो.

सुदैवाने मला हॅरो येथील विद्यालयात प्रवेश मिळाला. बाकीची मंडळी युरोपमध्ये गेली आणि काही महिन्यांनी हिंदुस्थानकडे परतली. परकी मंडळीत पूर्वी मी एकटा असा कधीच राहिलो नव्हतो. त्यामुळे मला अगदी एकलकोंडे वाटू लागले व घरची आठवण येऊ लागली. पण ही स्थिती फार वेळ टिकली नाही. काम आणि खेळ यांच्यात माझा वेळ जाऊ लागला. सुरुवातीला मला खालच्या वर्गात बसविण्यात आले. कारण, माझे लॅटिन बरेच कच्चे होते. पण लवकरच मी वरच्या वर्गात गेलो. कित्येक विषयांत आणि विशेषतः सर्वसामान्य ज्ञानात माझ्या वयाच्या मुलांपेक्षा मी पुष्कळच पुढे होतो. माझ्याबरोबरच्या बहुतेक विद्यार्थ्यांपेक्षा मी अधिक पुस्तके आणि वृत्तपत्रे वाचीत असे.

माझ्या आवडीचा विषय म्हणजे विमान-विद्या. त्या वेळी राइट बंधू, सांतोड्मो, फारमन, लॅथॅम वगैरे वैमानिकांची नावे प्रसिद्ध होती. उत्साहाच्या भरात मी वडिलांना लिहून टाकले की लवकरच विमानाच्या साहाय्याने दर आठवड्याला तुम्हांला भेटून येता येईल असे मला वाटते !

हलके हलके हॅरो येथील वातावरण माझ्या अंगवळणी पडले. मला ते स्थान आवडूही लागले. असे असूनसुद्धा विश्वविद्यालयाकडे माझी दृष्टी लागून राहिली होती. १९०६ आणि १९०७ साली हिंदुस्थानातून ज्या बातम्या येत त्यांच्या योगाने माझ्या मनात खळबळ उडे. इंग्रजी वर्तमान-पत्रांतून अगदीच तुटपुंज्या बातम्या हाती लागत. पण तेवढ्यावरूनही

मायदेशी बंगाल, पंजाब व महाराष्ट्रात फार मोठ्या घडामोडी होत आहेत असा कयास करता येत होता. लाला लजपतराय व अजितसिंग यांची हद्दपारी, बंगालमधील धुमश्चक्री, पुण्याच्या बाजूने पुष्कळदा ऐकू येणारे टिळकांचे नाव, स्वदेशी, बहिष्कार वगैरे गोष्टी कानांवर पडत. त्यामुळे मन क्षुब्ध होऊन जाई. पण ज्याच्यापाशी मी मनातली खळबळ व्यक्त करीन असे हॅरोमध्ये होते कोण ?

शाळेत माझ्या चांगल्या अभ्यासाबद्दल मला ट्रेवेलयानची गॅरिबॉल्डीवरील पुस्तके बक्षीस मिळाली. ती मला फार पसंत पडली म्हणून त्याच मालेतली उरलेली दोन पुस्तकेही मी खरेदी करून गॅरिबॉल्डीचा सर्व वृत्तान्त लक्षपूर्वक वाचून काढला. हिंदुस्थानातही स्वातंत्र्यासाठी अशीच शौर्याची कृत्ये, शर्थीचे लढे चालले आहेत अशी चित्रे माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली !

सतरावे वर्ष संपत आलेले, १९०७ च्या ऑक्टोबरचा प्रारंभ; अशा वेळी केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजात मी प्रवेश केला. वाटेल ते करण्याला शाळेतल्या पेक्षा किती तरी अधिक स्वातंत्र्य येथे मिळाले. विश्वविद्यालयीन विद्यार्थी म्हणून मी जरा फुगून गेलो होतो. बालपणाच्या शृंखला गळून पडल्या होत्या. ' जाणता ' या सदरात मी आता हक्काने मोडणार होतो. या नव्या जाणीवेने उत्पन्न होणाऱ्या अर्धवट धीटपणाच्या आणि अर्धवट लाजाळू-पणाच्या संमिश्र भावना, मी केंब्रिजच्या अरुंद रस्त्यांतून अथवा प्रशस्त प्रांगणांतून फिरत असता माझ्या मनात वागत असत.

तीन वर्षे मी केंब्रिज येथे काढिली. कॅम नदीच्या ओघाप्रमाणेच ती बिनभानगडीची वर्षे संथपणे संपून गेली. मोठा सुखाचा काळ होता तो ! खूप मित्र, थोडकेसे काम आणि थोडकासा खेळ. बौद्धिक क्षितिज हळूहळू विस्तीर्ण होत चालले होते. माझे विषय रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूस्तरशास्त्र असे होते व मला त्या विषयांची पदवीही मिळाली. परंतु माझा व्याप त्या विषयांपुरताच मर्यादित नव्हता. केंब्रिजला अथवा सुट्टीत लंडन-मध्ये अगर इतरत्र मला जे लोक भेटत ते वाङ्मय, इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र वगैरे विषयांवर अधिकारवाणीने चर्चा करीत. या उच्च वाता-वरणात मी प्रथम जरा गोंधळून जात असे. पण मी काही पुस्तके वाचली आणि मग त्यांच्या भाषणांतील मख्खी माझ्या ध्यानात येऊ लागली.

आम्ही नीत्शे, बर्नार्ड शॉच्या नव्या प्रस्तावना, आणि डिकिन्सनचा अगदी ताजा ग्रंथ यासंबंधी बहुधा बोलत असू. आम्ही स्वतःला मोठे विवादपटू मानीत असू आणि नीती व कामवासना यांच्यासंबंधी मोठ्या उच्च भूमिके-वरून आमची बोलणी चालत. माझा आयुष्याकडे पाहण्याचा त्या वेळचा दृष्टिकोण अस्पष्ट अशा सुखवादाचा होता. मी अगदी उथळ वृत्तीचा झालो होतो. मी कशाचाही साद्यंत विचार करीत नसे.

१९०७ च्या नंतर कित्येक वर्षे असंतोषाने व चळवळींनी हिंदुस्थानचे वातावरण कढत होते. १८५७ च्या बंडानंतर इतक्या वर्षांनी प्रथमच हिंदुस्थानची लढाऊ वृत्ती प्रकट झाली. टिळकांची कामगिरी व त्यांना झालेली अटक, अरविंद घोषांची अटक, बंगालमधील जनतेने स्वदेशी व बहिष्काराचे स्वीकारलेले व्रत वगैरे बातम्यांमुळे इंग्लंडातील हिंदी लोकांत चैतन्य संचारत होते. आम्ही बहुतेक झाडून सारेजण टिळकपक्षीय अथवा त्या वेळच्या हिंदुस्थानातील प्रचलित शब्दात बोलावयाचे म्हणजे " जहाल " होतो. बंगालमध्ये जे हिंसामय स्फोट होऊ लागले होते त्यांची आम्हा विद्यार्थ्यांकडून प्रशंसाही होत असे. नंतर हीच माणसे सिव्हिल सर्व्हिसमध्ये शिरली, हायकोर्टात न्यायासनावर बसू लागली, मोठ्या शांत आणि विवेकी वकिलांत त्यांची गणना होऊ लागली ! या पर्यंकवीरांपैकी फारच थोड्यांनी नंतरच्या हिंदी राजकीय चळवळीत झटून भाग घेतला.

त्या काळच्या प्रसिद्ध हिंदी पुढाऱ्यांपैकी काही केंब्रिजला भेट देऊन गेले. बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय आणि गो. कृ. गोखले यांनी आम्हाला भेटी दिल्या. आमच्या बैठकीच्या खोलीतच बिपिनचंद्र पालांची मुलाखत झाली. आमच्यापैकी दहा-बाराजणच तेथे उपस्थित होते; पण पालबाबू असे गर्जत राहिले की जणू काही दहा हजार श्रोत्यांची जाहीर सभा त्यांच्यापुढे बसली आहे ! आवाज इतका घुमत होता की ते काय म्हणताहेत ते मला समजणे मुष्किल झाले. लालाजींनी पुष्कळच हलक्या आवाजात भाषण केले आणि माझ्या मनावर त्यांच्या त्या बोलण्याचा परिणाम झाला. लंडनमध्ये असताना श्यामजी कृष्णवर्मासंबंधी व त्यांच्या इंडिया हाउससंबंधी बरेच ऐकत होतो; पण त्यांची भेट कधीच घडली नाही.

मी केंब्रिजला असताना पुढे कोणता मार्ग पत्करावा याची भवति न भवति चालली होती. काही काळ सिव्हिल सर्व्हिसमध्ये जावे असा बेत चालला होता. त्या वेळी त्या सर्व्हिसची प्रतिष्ठा विशेषच होती. पण मला तिच्याबद्दल प्रेम नसल्यामुळे तो बेत रद्द झाला. वडिलांचाच धंदा पत्करावा असे ठरून मी बॅरिस्टरीच्या अभ्यासाकडे वळलो. तदनंतरची दोन वर्षे मी लंडनच्या आवतीभोवती काढली. कायद्याच्या अभ्यासाकडे फारसा वेळ खर्च होत नसे. बॅरिस्टरीच्या परीक्षेत विशेष यश अथवा अपयश काहीच न मिळता मी सरळ पास होत गेलो. १९१० च्या उन्हाळ्यात आयर्लंडात गेलो असता सिनफेन चळवळीकडे माझे मन आकर्षित झाल्याचे मला स्मरते.

लंडनमध्ये हॅरोतले जुने मित्र भेटले आणि त्यांच्या सहवासाने मला खर्चिक राहणीची चटक लागली. वडील सढळपणे पैसे पाठवीत तेही मला पुरेनात. श्रीमंत पण बहुशः पोकळ डोक्यांच्या इंग्लिश तरुण गब्रूंचे अथवा शहरी झब्बूंचे अनुकरण करण्याचा मी माझ्याकडून प्रयत्न करीत होतो.

१९१० साली नॉर्वे देशात गेलो असता मी थोडक्यात बचावलो. डोंगराळ मुलुख तुडवीत आम्ही चाललो होतो. मुक्कामास पोचलो ते अगदी घामाघूम झालेले आणि शिणले–भागलेले असे पोचलो. आम्ही स्नानासाठी पाणी मागितले. त्या छोटेखानी खानावळीत अशा प्रकारची मागणी अपूर्वच होती ! पाणी तेथे मिळेना. शेजारच्या ओढ्यात स्नान करा असा सल्ला आम्हाला मिळाला. जवळच्या हिमनदीतून गर्जना करीत खाली पडणाऱ्या त्या ओढ्याकडे लहानसे टॉवेल घेऊन आम्ही निघालो. मी पाण्यात शिरलो. पाणी खोल नव्हते, पण मनस्वी गार होते. तळाला पाय ठरत नव्हता; त्यामुळे मी घसरून पडलो. गार पाण्यामुळे गात्रे बधिर झाली, हातापायांवर माझा ताबा राहिला नाही. पाय कोठेच ठरेना. मी झपाट्याने खाली वाहात चाललो होतो. माझा इंग्लिश मित्र कसादसा बाहेर पडला. काठा-काठाने धावत जाऊन शेवटी त्याने मोठ्या शर्थीने माझी तंगडी पकडली आणि मला बाहेर खेचले. मागाहून आम्हाला कळले की, खाली दोनतीनशे यार्डांवर हाच गिरिप्रवाह एका प्रचंड कड्यावरून खाली उडी घेत असून त्यामुळे जो धबधबा निर्माण झाला आहे, त्याला या भागातले एक निसर्गशोभेचे ठिकाण समजण्यात येते.

१९१२ साली मी बॅरिस्टर झालो आणि त्याच वर्षाच्या हेमंत ऋतूत हिंदुस्थानला परत आलो. मुंबईच्या धक्क्यावर मी जेव्हा पाय ठेवला तेव्हा आढ्यतेखोरपणावाचून माझ्याजवळ वाखाणण्यासारखे काहीच नव्हते, असे मला वाटते !

## राजकारणात प्रवेश ३

१९१२ च्या अखेरीला राजकीय दृष्ट्या देश अगदी थंड होता. टिळक तुरुंगात पडले होते. जहालांची मुस्कटदाबी करण्यात आली असून कर्त्या पुढाऱ्यांच्या अभावी ते चिप पडून होते. १९१२ सालच्या नाताळात बांकी-पूरला भरलेल्या काँग्रेस–अधिवेशनास मी एक प्रतिनिधी म्हणून हजर राहिलो होतो. इंग्रजी शिकलेल्या वरिष्ठवर्गीयांचाच तेथे भरणा होता आणि छानपैकी इस्त्री केलेल्या विजारी आणि सकाळी घालायचे कोट लोकांच्या अंगावर दिसत होते ! खरे म्हणजे सामाजिक सम्मेलनच होते ते ! कोणत्याही प्रकारची राजकीय टोचणी अगर ईर्ष्या त्यांच्या ठायी दिसत नव्हती. अधि-वेशनातली प्रभावी व्यक्ती म्हणजे गोखलेच. भावनाशील, खऱ्या तळमळीचे, आणि कष्टाळू असे गोखलेच काय ते राजकारणाचा व जनकार्याचा गंभीर-पणाने आणि कसोशीने विचार करताना दिसले. माझ्या मनावर गोखल्यांची छाप पडली.

मी हायकोर्टात वकिली सुरू केली. ते काम मला थोडेबहुत आवडत असे. युरोपहून परत आल्यानंतर पहिले काही महिने मजेत गेले. परंतु हळू-हळू माझ्या दर्जाच्या इतर लोकांच्या संगतीत मी जे जीवन कंठीत होतो ते मला नीरस भासू लागले. वाटले की आपण ध्येयहीन निष्फळ आयुष्याच्या रुक्ष चाकोरीत सापडत आहोत. सुदैवाने आमच्या घरचे वातावरण बरेच अनुकूल होते. पण तेवढ्याने भागेना. उरलासुरला वेळ घालवायला कोर्टाचे ग्रंथालय अथवा क्लब होताच. पण तेथे तेच तेच लोक भेटावयाचे, तेच तेच विषय खलायचे, नेहमीचाच काथ्याकूट सुरू असावयाचा, आणि तोदेखील

कायदेकानूंसंबंधी ! बौद्धिक चालना माणसाला मिळेल असे वातावरण तेथे नव्हतेच नव्हते. मला त्या जीवनाचा वीट येऊ लागला.

मी काँग्रेसला मिळालो आणि तिच्या विद्यमाने क्वचित होणाऱ्या सभांतही भाग घेऊ लागलो. हिंदी मजुरांवर लागू करण्यात येणाऱ्या फिजीमधील मुदतबंदीच्या कराराविरुद्ध चळवळ सुरू झाली अथवा दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या प्रश्नासारखा प्रश्न उपस्थित होऊन काही विशेष प्रसंग निर्माण झाला की त्यात मी उडी घेत असे आणि कसून मेहनत करी; पण अशी कामे कधी-काळी यावयाची.

शिकारीसारख्या करमणुकीत मी भाग घेत असे, पण त्यात मी फारसा वाकबगार नव्हतो आणि मला त्यात विशेष गोडीही वाटत नसे. मोकळ्या हवेची आणि अरण्याची मौज अनुभवावयास सापडे एवढेच त्यात मला समाधान होते. शिकारीची मी कधी आस्था बाळगली नाही. शिकारीची जी काय थोडीबहुत आवड माझ्यात होती तीसुद्धा ह्या एका लहानशा प्रसंगामुळे नष्ट झाली. एकदा एक लहान निरुपद्रवी पाडस माझ्या गोळीने जिव्हारी घायाळ होऊन पडले आणि अश्रूंनी डबडबलेल्या आपल्या टपोऱ्या डोळ्यांनी त्याने माझ्याकडे दृष्टी लावली. ते डोळे मला अद्यापि कधी कधी दिसतात !

गोखल्यांच्या भारत सेवक समाजाने प्रथम प्रथम माझे मन वेधून घेतले होते. परंतु त्यांचे राजकारण मला फार नेमस्त वाटे आणि माझा धंदा सोडून देण्याचीही माझी इच्छा नव्हती. त्यामुळे भारत-सेवक-समाजात प्रवेश मिळवावा असा विचार माझ्या मनात मुळीच आला नाही. तथापि, देशाची सेवा, निर्वाहापुरतेच वेतन घेऊन एकनिष्ठेने बजावणाऱ्या भारत-सेवकांबद्दल मला फार आदर वाटत असे. कामाची दिशा बिनचूक नसेल; पण जे काम होत होते ते सुसूत्र, एकसारखे आणि तन्मयतेने होत होते, हे काय थोडे झाले ?

नंतर महायुद्धाचे अतिमहाभारत सुरू झाले व आमचे चित्त सर्वस्वी तिकडेच लागून राहिले.

हलके हलके राजकारणाचे डोके वर निघू लागले. लोकमान्यांची सुटका झाली आणि त्यांनी व बेझंटबाईंनी होमरूल लीग स्थापन केली. मी दोन्ही-कडे नाव दाखल केले. परंतु विशेषतः मी बेझंटबाईंच्या लीगमध्ये काम

करीत असे. हिंदी राजकारणात बेझंटबाई उत्तरोत्तर अधिक चमकू लागल्या. कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात जरा चैतन्य खेळू लागले आणि मुस्लिम लीग कॉंग्रेसच्या बरोबरीने कामाचा वाटा उचलू लागली. वातावरण उत्साहमय झाले होते. आमच्यासारख्या तरुणांची मने थरारून जाऊन काही तरी महत्त्वपूर्ण गोष्टी लवकरच घडणार आहेत अशी आम्हांस आशा वाटू लागली. बेझंटबाईंच्या स्थानबद्धतेमुळे सुशिक्षित वर्गात तर फारच खळबळ उडाली. सर्व देशभर होमरूलच्या कार्याला नवा तजेला चढला.

बेझंटबाईंच्या प्रकरणामुळे माझ्या वडिलांनी व इतर नेमस्त पुढाऱ्यांनी होमरूल लीगमध्ये नावे दिली. माझे वडील हलके हलके जुन्या नेमस्त मतापासून दूर दूर चालले होते. परंतु जहाल गटात प्रत्यक्ष जाऊन सामील होण्यापूर्वी त्यांची चलबिचल झाली. त्या काळात ते अनेकवार बोलून दाखवीत की नेमस्त राजकारणात काही अर्थ उरला नाही, पण हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सुटल्याशिवाय कोणतीही गोष्ट परिमाणकारक रीतीने करताच यावयाची नाही. तो एक प्रश्न सुटला तर तुमच्यापैकी तरुणांतल्या तरुणाच्या शेजारी आपण जाऊन उभे राहावयास तयार आहोत.

एकेक पाऊल पुढे टाकता टाकता पंजाब हत्याकांडाचे १९१९ साल उजाडले, आणि पूर्वीच्या आयुष्याशी आणि पेशाशी त्यांना निगडित करणारे बंध सपकन तुटून गांधीजींनी सुरू केलेल्या नव्या चळवळीत त्यांनी उडी ठोकली.

महायुद्धातील प्रारंभीच्या काळात मी केलेली राजकीय व सार्वजनिक कार्ये फारच अल्प होती. सार्वजनिक सभांतून मी कधीच बोलत नसे. जाहीर भाषण करण्याची मला भीती वाटे. शिवाय, माझी इच्छा अशी होती की, जाहीर भाषणे इंग्रजीतून न होता हिंदीतून व्हावीत. पण फार वेळ हिंदीत बोलणे मला जमेल की नाही याची मला जबरदस्त शंका होती. अलाहाबादेस मी अगदी पहिले भाषण करण्यास तयार झालो तेव्हांचा एक प्रसंग मला आठवतो. ही बहुधा १९१५ सालातली गोष्ट असावी. छापखान्यांची मुस्कटदाबी करणाऱ्या कायद्याच्या निषेधाची ती सभा होती. मी अगदी थोडा वेळ भाषण केले आणि तेही इंग्रजीत. सभा संपताक्षणी तेजबहादुर सप्रूंनी व्यासपीठावर चढून सर्व लोकांसमक्ष मला आलिंगन देऊन माझे चुंबन घेतले. लज्जेने मी अगदी चूर

झालो. भाषणाचा आशय अथवा पद्धती चांगली होती म्हणून नव्हे, तर निव्वळ मी सभेत बोललो, आता सार्वजनिक कामासाठी आणखी एक सैनिक मिळाला एवढ्याच विचाराने सप्रूंना हर्ष झाला. व्याख्याने देणे हेच त्या वेळचे सार्वजनिक काम !

अलाहाबादेतील तरुणांना डॉ. सप्रू हे राजकारणात अधिक जहाल भूमिका घेतील अशी आशा वाटे. कारण सर्व नेमस्तांत ते भावनाप्रधान आणि उत्साहशील होते. पंडित मदनमोहन मालवीय तर देशसेवा करता करता वृद्ध झालेले. त्यांच्याबद्दल आम्हांला प्रेम होते. त्यांच्याशी आमचे तासन् तास बोलणे होई व देशाला वीरोचित असा मार्ग तुम्ही दाखवला पाहिजे असा आग्रह आम्ही धरीत असू.

घरी राजकीय विषयांची चर्चा शांतपणे होत नसे, आणि त्यांचा उल्लेख झाला—आणि तो बहुशः होईच—की वातावरण लगेच गरम होऊन जाई. मी जहाल वादाकडे झुकत चाललो होतो, त्याकडे वडिलांचे बारिक लक्ष होते. केवळ बोलक्या राजकारणावर मी एकसारखी टीका करी, प्रतिकार झाला पाहिजे असे आग्रहाने म्हणे, तेही त्यांच्या नजरेतून सुटले नव्हते. कार्याची दिशा माझ्या बोलण्यावरून स्पष्ट होत नसल्याने बंगाली क्रांतिकारकांच्या वाटेकडेच मी तडक चाललो आहे, अशी त्यांना शंका येई व ते अस्वस्थ होत.

१९१६ च्या नाताळात लखनौ-कॉंग्रेस-अधिवेशनाच्या वेळी मी गांधीजींना प्रथमच भेटलो. दक्षिण आफ्रिकेत ते धैर्याने लढले असल्यामुळे आम्हा सर्वांना त्यांच्याबद्दल आदर वाटत होता. पण आम्हा पुष्कळ तरुणांना ते दूर अंतरावर उभे आहेत, साधारण माणसापेक्षा निराळे आहेत, पण राजकारणी नाहीत असे वाटले. नंतर लवकरच चंपारण्यात त्यांनी प्रथम दाखवलेली हिम्मत आणि किसानांसाठी मिळवलेले यश ह्यामुळे आम्हांला उत्साहाचे भरते आले. स्वतःची कार्यपद्धती हिंदुस्थानात लागू करण्यास ते तयार आहेत व ती येथे यशस्वी होईल याविषयी आमची खात्री झाली.

माझा विवाह १९१६ साली दिल्ली शहरात झाला. वसंतागम सूचित करणाऱ्या वसंतपंचमीचा तो दिवस होता. त्या वर्षीच्या उन्हाळ्यातील काही महिने आम्ही काश्मीरात काढले. आमच्या कुटुंबियांना खालच्या खोऱ्यातच

ज. २

ठेवून मी आणि माझा एक चुलत भाऊ असे दोघेजण बरेच आठवडे डोंगरांतून हिंडत होतो. त्या वेळी आम्ही 'लडाख' घाटही चढून गेलो.

तिबेटच्या पठाराकडे जाणाऱ्या चिंचोळ्या आणि निर्मनुष्य अशा पृथ्वी-वरील उंच दऱ्यांतून हिंडण्याचा हा पहिलाच प्रसंग. 'झोजीला' घाटाच्या माथ्यावरून हिरव्यागार गवताने झाकलेल्या डोंगरांचे उतार एका बाजूस दिसत होते, तर दुसरीकडे उघडे बोडके शिलाखंड दृष्टीस पडत होते. दोन्ही कुशींनी पर्वतांचा पहारा असलेल्या त्या निरुंद दरीतून आम्ही वरवर चढत होतो. बर्फाच्छादित शिखरे एकीकडे चकाकत होती, आणि त्यांतुन छोटे छोटे हिमप्रवाह मंदपणे आमच्याकडे वाहात येत होते. झोंबणारा गार वारा सुटला होता. पण दिवसा सूर्याची छानदार ऊब मिळत असे. वाता-वरण इतके स्वच्छ होते की पदार्थांचे अंतर अजमावण्यात चूक होऊन लांबचे पदार्थ जवळ आहेत असा भास होई.

आणखी वर गेल्यावर आम्हाला साथ द्यावयाला झाड-झाडोराही राहिला नाही; उघडे फत्तर, बर्फ आणि क्वचित वेळा डोळ्यांना रिझवणारी फुले एवढीच काय ती उरली. परंतु निसर्गाच्या ह्या ओसाड आणि एकाकी वसतिस्थानातही मला एक प्रकारचे विलक्षण समाधान लाभले. आनंद आणि उत्साह यांनी मी फुलली होतो.

या प्रवासात एक रोमांचकारी प्रसंग अनुभवावयास सापडला. 'झोजीला' वाट चढल्यावर 'मातायान'पाशी आम्हाला कळले की, अमरनाथाची गुहा फक्त आठच मैल दूर राहिली आहे. हिम आणि बर्फ यांनी आच्छादित असा एक प्रचंड पर्वत वाटेत आडवा होता हे खरे; पण त्यात काय मोठेसे? आठच तर मैल सारे अंतर! जोमाच्या भरात आमच्यासारख्या अननुभवी माणसांनी ठरवले की अमरनाथला जायचे. ११,५०० फूट उंचीवरचा आमचा तळ सोडून आम्ही दोघेजण निघालो. वाटाड्या म्हणून एक स्थानिक धनगर बरोबर घेतला होता.

कमरेला दोऱ्या बांधून कित्येक हिमनद्या चढून गेलो, कित्येक ओलांडल्या. त्रास अधिकच होऊ लागला, श्वासोच्छ्वास करणेही जड जाऊ लागले. आमच्या हमालांच्या पाठीवर थोडे थोडेच सामान होते, तरीही त्यांच्या नाकांतून रक्त वाहू लागले. हिमनद्यांची पात्रे कमालीची घसरडी झाली होती.

आम्ही अगदी थकून गेलो. एकेक पाऊल मोठ्या मुष्किलीने पडत होते. तरी पण आमचा मूर्खपणाचा बेत आम्ही सोडला नाही. सकाळी चार वाजता आम्ही तळ सोडला होता. जवळ जवळ बारा तास एकसारखे चढल्यावर आम्हाला बक्षिसी काय मिळाली, तर एक विस्तीर्ण हिमाच्छादित मैदान दृष्टीस पडले ! परंतु तो देखावा मात्र उदात्तरम्य होता. हिमशिखरांनी वेष्टित असा तो भूभाग रत्नखचित मुकुटाप्रमाणे अथवा स्वर्देवतांच्या क्रीडांगणाप्रमाणे शोभत होता. बर्फ व धुके अधिकच पडू लागले व तो देखावा लुप्त झाला. आम्ही किती उंचीवर होतो ते कळले नाही; पण बहुधा १५,००० ते १६,००० फुटांवर ती जागा असावी. कारण अमरनाथाच्या गुहेच्या बरेच वर आम्ही उभे होतो. आम्हाला आता अर्धा-एक मैलाचा तो हिमाच्छादित प्रदेश तेवढा ओलांडावयाचा होता. मग खाली उतरले की अमरनाथ. चढ मागे पडल्यामुळे आता त्रास संपला असे आम्हाला वाटले. साहजिकच शरीर थकले होते, तरी मनाला हुशारी वाटू लागली व आम्ही पुढे पाऊल टाकले. जमीन फार फसवी होती. वाटेत अनेक चर होते व नुकत्याच पडलेल्या बर्फाने काही धोक्याच्या जागा झाकून गेल्या होत्या. ह्या बर्फापायीच इतिश्री होण्याचा प्रसंग मजवर येऊन ठेपला. बर्फ पाहून मी पाय टाकला तो बर्फाचा पापुद्रा पायाखाली फाटून मी एका प्रचंड चराच्या जाभाडात गडप झालो ! फार विस्तृत अशी ती भेग होती. तिच्या तळाशी वस्तू गेली की ती काही युगे तरी सुरक्षित राहणार याविषयी शंका घेण्याचे कारण नव्हते ! पण माझा तोल सुटला नाही, त्यामुळे चराच्या कडांना मी घट्ट धरून ठेवले. मग मला वर खेचण्यात आले. या प्रसंगामुळे मन जरा हबकलेच; पण आम्ही माघार घेतली नाही. परंतु त्यानंतर चर एकामागोमाग वाटेत आडवे येऊ लागले. त्यांपैकी काही इतके रुंद होते की ते ओलांडावयास अवश्य ती साधनेच आमच्यापाशी नव्हती. तेव्हा निरुपाय म्हणून परत वळलो. थकलो तर होतोच; त्यात निराशेची भर पडली, आणि अमरनाथाचे दर्शन काही घडले नाही.

महायुद्ध संपले तेव्हा हिंदुस्थानात खळबळ चालू होती, पण ती आतल्या आत. वाट पाहावी, अपेक्षा करीत असावे, ही मनोवृत्ती त्या वेळी देशभर प्रभावी झाली होती. मन आशामय होते, पण भीती व चिंता यांचीही

सावली त्याच्यावर पडलेली होती. नंतर रौलॅट-कायदे मंजूर झाले, त्यात अटकेचे भरमसाट अधिकार पोलिसांना दिलेले असून खटल्याच्या बाबतीत नेहमीच्या कायद्याने घालून दिलेल्या यम-नियमांचा त्यात मागमूसही नव्हता. या कायद्यामुळे सर्व हिंदुस्थानभर संतापाची लाट उसळली. नेमस्तही त्यात सामील झाले व त्यांनी ह्या कायद्यांचा कसून निषेध केला. सर्व मतांच्या लोकांनी या कायद्यांना विरोध केला. तरीदेखील अधिकाऱ्यांनी कायदे तसेच पुढे रेटीत नेले व ते मंजूरही झाले.

१९१९ च्या प्रारंभी गांधीजी एका जिवावरच्या दुखण्यातून बचावले. रौलॅट-कायद्यांना संमती देऊ नका अशी काकुळतीची विनंती आजारी असतानाच त्यांनी व्हाइसरॉयला केली होती. इतर विनंत्यांप्रमाणेच ह्याही विनंतीची विल्हेवाट लागली, आणि जवळ जवळ मोठ्या नाखुषीनेच त्यांनी आपल्या पहिल्या देशव्यापी चळवळीचे नेतृत्व स्वीकारले. सत्याग्रह-सभा भरविण्याचा त्यांनी उपक्रम सुरू केला. माझ्या उत्साहाला भरती आली. सत्याग्रह-सभेचा तत्काळ सभासद होण्याचा विचार मनात आला. कायदे-भंग, तुरुंगवास वगैरे परिणामांची मला दखल नव्हती. तसले विचार मनात आलेच तर मला त्यांची पर्वा वाटली नाही. पण एकाएकी माझा उत्साह मावळला. गोष्ट वाटते तितकी सोपी नाही, हे कळून चुकले. कारण, माझे वडील ह्या कल्पनांच्या सर्वस्वी विरुद्ध होते. मी तुरुंगात जाणार ही कल्पनाच त्यांना असह्य झाली. आमच्यावर वडिलांचे अतोनात प्रेम होते. प्रेमाचा बाजार त्यांनी कधी भरवला नाही; पण त्यांच्या संयमाच्या पापुद्र्याखाली वात्सल्याचा खोल साठा दडलेला होता.

वडिलांनी विनंती केल्यावरून गांधीजी अलाहाबादेस आले आणि त्या दोघांचा एकान्ती विचारविनिमय झाला. पण इतक्यात हिंदुस्थानात निराळ्याच घटना घडून येऊन सर्वच परिस्थिती पालटली व सत्याग्रह-सभांच्या कामाला लगाम लागला.

सत्याग्रह-दिन, देशव्यापी हरताळ, व्यापार-निरोधन, दिल्ली व अमृतसर येथे पोलिसांनी व सैन्याने केलेले गोळीबार, कित्येक इसमांचे त्यापायी पडलेले बळी, अमृतसर आणि अलाहाबाद येथे लोकसमुदायांनी केलेली हिंसा, जालियनवाला बागेतील कत्तल, पंजाबात लष्करी कायद्याने केलेली

अमानुष मानहानी व त्या कायद्यामुळे ओढवलेला अनर्थ, असे प्रसंग घडत होते. वर्तमान जवळजवळ कळेनासेच झाले. पंजाबात कोणाला जाता येईना, कोणाला त्या कोंडीतून बाहेर पडता येईना. पंजाबच्या साहाय्यासाठी व चौकशीसाठी एक वजनदार समिती काँग्रेसतर्फे नेमण्यात आली. मुख्य मुख्य भागातील लष्करी कायदा मागे घेऊन बाहेरच्या लोकांना आत येण्याची परवानगी जाहीर झाल्याबरोबर काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते भराभर पंजाबात गेले आणि त्यांनी साहाय्य व चौकशी करण्यास प्रारंभ केला. मदत करण्याचे काम बहुतेक पंडित मालवीय व स्वामी श्रद्धानंद यांच्याकडे व चौकशीचे काम मुख्यतः माझे वडील व चित्तरंजन दास यांच्या हाती सोपविले होते. त्यात गांधीजी बारीक लक्ष घालीत आणि त्यांचा सल्लाही इतर लोक घेत. अमृतसर-विभाग दासबाबूंनी स्वतःकडे घेतला. त्यांना हवी ती मदत करण्यासाठी माझी नेमणूक झाली, व त्यांच्याबरोबर मला पाठविण्यात आले. जालियनवाला बागेतही आम्ही बरेच वेळा गेलो आणि तेथील तसून् तसू जागा आम्ही तपासली.

१९१९ च्या अमृतसर-काँग्रेसचे अध्यक्ष माझे वडील होते. त्यांनी नेमस्तांना उद्देशून तळमळीने भरलेले असे एक विनंतिपत्र काढले. त्यात लष्करी कायद्यामुळे उत्पन्न झालेल्या भीषण परिस्थितीचा विचार करून "काँग्रेसला येऊन मिळा, घायाळ झालेला पंजाब तुम्हांला विनवीत आहे" असे म्हटले होते. पण नेमस्तांनी अपेक्षित उत्तर दिले नाही. काँग्रेसला मिळण्याचे त्यांनी नाकारले.

अमृतसर-काँग्रेस म्हणजे पहिली गांधी-काँग्रेस होय. लोकमान्य टिळक तेथे हजर होते व त्यांनी वादविवादात प्रामुख्याने भागही घेतला; परंतु प्रतिनिधींपैकी बहुसंख्य लोक—विशेषतः बाहेर जमलेला जनसमुदाय—यानंतर गांधीजी नेतृत्व स्वीकारणार अशा अपेक्षेने उभा होता यात शंकाच नाही. हिंदी राजकीय क्षितिजावर "महात्मा गांधी की जय" ह्या घोषणेचा नाद दुमदुमू लागला. स्थानबद्धतेतून नुकतेच सुटून आलेले अलीबंधू सरळ काँग्रेसला येऊन मिळाले व राजकारणाला नवे स्वरूप व नवी दिशा प्राप्त झाली.

राजकीय चळवळ व खिलाफत-चळवळ १९२० साली जोडीने वाढत होत्या. दोन्ही एकाच दिशेने निघाल्या होत्या. काँग्रेसने गांधीजींच्या अहिंसायुक्त

असहकारितेचा स्वीकार केल्यावर या दोन्ही चळवळी एकमेकींशी निगडित झाल्या. खिलाफत-समितीने हा नवा कार्यक्रम प्रथम स्वीकारला व १ ऑगस्ट-पासून मोहिमेला सुरुवात करण्याचे नक्की ठरले.

वर्षाच्या प्रारंभी अलाहाबादेला सय्यद रेझाअलींच्या घरी मुस्लिम लीगच्या कौन्सिलची बैठक भरली होती. गांधीजी तेथे बोलले. त्यांचे ते भाषण म्हणजे त्यांच्या उत्कृष्ट अधिकारयुक्त भाषणांपैकी एक होते. विनययुक्त पण स्पष्ट वज्राप्रमाणे कठिण, गोड व मृदू पण त्याजबरोबर सडेतोड आणि कळकळीने भरलेले असे ते शब्द ऐकल्यावर तेथल्या मुसलमान पुढाऱ्यांची अधिकच तारांबळ उडाली.

भाषणातील ते युद्धनीतिविषयक दृष्टान्त व ती धगधगणारी तळमळ पाहून श्रोत्यांपैकी बहुतेकांची पाचावर धारण बसली ! परंतु डगमगणाऱ्या श्रोत्यांचा धीर कायम टेवण्याचे काम शौकतअली बजावीत होते. त्यामुळे मतदानाची वेळ येताच बहुतेक लोकांनी पडक्या तोंडाने हळूच ठरावाच्या बाजूने म्हणजे लढाईला अनुकूल मते दिली !

गांधीजींनी असहकारितेच्या लढ्याला १ ऑगस्ट रोजी प्रारंभ करावयाचा असे ठरविले असले, तरी ह्या सूचनेला काँग्रेसची मान्यता अद्यापि मिळालेली नव्हती. त्याच दिवशी मुंबईत लोकमान्यांनी देह ठेवला. सिंधमधील दौरा आटोपून गांधीजी सकाळीच मुंबईला पोचले होते. मीही त्यांच्याबरोबर मुंबईचे लक्षावधी लोक ज्या भव्य मिरवणुकीत सामील झाले होते, तीत आम्हीही जाऊन मिळालो.

# शेतकऱ्यांशी ओळख ४

त्याच सुमाराला माझ्या राजकीय जीवनात एक नवीनच प्रकरण उद्भवून त्याला पुढे फार महत्त्व प्राप्त झाले. जवळजवळ यदृच्छया मी शेतकऱ्यांत खेचला गेलो म्हणा ना! तो प्रसंग असा :

मला आठवते ते असे की, १९२० च्या जूनमध्ये प्रतापगडच्या अगदी आतल्या भागातून सुमारे दोनशे किसान पन्नास मैलांची वाट तुडवीत अलाहाबादेला आले. त्यांचा म्होरक्या रामचंद्र हा तेथला राहणारा नव्हता. यमुनेच्या एका घाटावर ते किसान बैठक मारून बसले आहेत, असे मला कळल्यावरून काही मित्रांसमवेत मी तेथे गेलो. तालुकदारांकडून होणारी अतिरिक्त पिळवणूक, अमानुष छळ वगैरेसंबंधी आपली कहाणी त्यांनी मला सांगितली. ही स्थिती असह्य होत आहे असेही ते म्हणाले. आमच्या सांगाती चला, विचारपूस करा, आम्ही गाऱ्हाणी मांडण्यासाठी येथवर आलो म्हणून रागावलेले तालुकदार सूड घेतील, त्यापासून आम्हाला वाचवा, असेही त्यांनी विनविले. येत नाही ही भाषाच ऐकायला ते तयार नव्हते. मला त्यांनी खरोखरी धरूनच ठेवले. शेवटी दोनएक दिवसांनी त्यांच्या भागात येतो असे मी वचन दिले.

काही सहकाऱ्यांसमवेत मी तिकडे गेलो व तीन दिवस आगगाडीपासून आणि पक्क्या सडकेपासून दूर आत असणाऱ्या खेड्यात घालवले. त्या भेटीने माझे डोळे लख्ख उघडले. तो सर्व टापू उत्साहाने चैतन्यमय झाला होता व लोकांत विलक्षण लगबग चाललेली होती. थोडी सूचना दिली की पुरे, लोकांचे थवेच्या थवे जमत. एक खेडे दुसऱ्याला, दुसरे तिसऱ्याला वर्दी देई. आणि सर्व माणसे खेड्याबाहेर लोटत आणि सभास्थानाकडे येणाऱ्या बायका-पुरुषांची व मुलांची शेतांतून मुंग्यांप्रमाणे रीघ लागलेली दिसत असे. ह्याहून तातडीची सभा असली तर 'सीताराम' अशी आरोळी दिली म्हणजे सर्व दिशांना ती निनादत असे, आणि इतर खेड्यांतून तिला प्रत्युत्तर मिळून लोक धावतच येत असत. स्त्री-पुरुषांच्या अंगावर लक्तरे असली, तरी त्यांच्या चेहऱ्यांवर उत्साहाच्या लहरी उमटलेल्या दिसून येत, व काही तरी चमत्कार

घडून येणार असून त्यामुळे त्यांची दुःखे नष्ट होणार आहेत, अशी आशा त्यांच्या डोळ्यांत चमकत राही ! त्यांच्या दारिद्र्याकडे आणि अपरंपार कृतज्ञतेकडे पाहिले, की माझे अंतःकरण दुःखाने व लज्जेने भरून येई. माझ्या सुखासीन आणि निष्काळजी आयुष्याचा विचार मनात आला की लज्जा वाटे; आणि हिंदुस्थानातल्या लाखो अर्धनग्न स्त्री-पुरुषांकडे दुर्लक्ष करणारे आमचे शहरी राजकारण किती क्षुद्र याची जाणीव झाली आणि दारिद्र्याच्या व मानहानींच्या पुरात बुडालेले हिंदुस्थान पाहिले की दुःख वाटत असे. नग्न, उपाशी, पिळलेल्या आणि गांजलेल्या हिंदुस्थानचे नवेच चित्र माझ्या दृष्टीसमोर उभे राहिले आणि लांब शहरातून सहजगत्या भेटीस आलेल्या आम्हा परस्थांवरची त्यांची श्रद्धा पाहून, मनाला एका नव्याच जबाबदारीची जाणीव झाली. त्यांचे दुःख, सारखा वाढत जाणारा व कंबरडे मोडून टाकणारा खंडाचा बोजा, बेकायदेशीरपणे केलेली लुबाडणूक, खोपटांतून व जमिनीवरून त्यांची करण्यात आलेली हकालपट्टी, मारपीट वगैरेसंबंधी त्यांनी सांगितलेल्या कहाण्या मी ऐकल्या. जमीनदारांचे पित्ये, सावकार आणि शिपाई हे गिधाडांप्रमाणे त्यांना घेरून टाकीत असत. सर्व दिवसभर राबून ते जे पिकवीत, ते त्यांच्यापाशी राहात नसे. श्रमाचे त्यांना मिळणारे फळ म्हणजे लाथाबुक्क्या, शिव्यागाळी आणि वीतभर खोल गेलेले पोट !

ही प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे व शेतकरी भिकारी होत चालले आहेत. असे असता वातावरण एकाएकी गरम होण्याचे व लोकांनी उग्र स्वरूप धारण करण्याचे कारण काय ? आर्थिक परिस्थिती. पण आर्थिक परिस्थिती कारण म्हणावी तर औध प्रांतात हीच दशा आढळून येते. शेतकऱ्यांनी १९२० व १९२१ साली उचल खाल्ली ती फक्त प्रतापगड, रायबरेली आणि फैजाबाद या तीन जिल्ह्यांपुरतीच. याचे कारण एवढेच की, बाबा रामचंद्र याचे नेतृत्व त्या भागातल्या शेतकऱ्यांना लाभले होते.

रामचंद्र हा महाराष्ट्रीय होता. त्याने फिजी बेटात मुदतबंदीच्या मजुराचे काम केलेले होते. तेथून परतल्यावर तो फिरत फिरत औध प्रांताकडे वळला. तुळसीदासाचे रामायण वाचीत व कुळांची गाऱ्हाणी ऐकत तो भटकत असे. त्याच्या अंगी चांगल्या प्रकारे संघटनाकौशल्य होते. सभा भरवून आपल्या

दुःखासंबंधी विचार करण्याची गोडी त्याने शेतकऱ्यांत उत्पन्न केल्यामुळे त्यांच्यात एकीची भावना निर्माण झाली.

जून महिन्यातले पावसाळ्याच्या जरा आधींचे ते दिवस होते. उन्हामुळे अंग भाजून निघे आणि डोळ्यांपुढे अंधेरी येई. उन्हातान्हातून हिंडण्याची मला जरासुद्धा सवय नव्हती. इंग्लंडहून आल्यापासून तर दर उन्हाळ्यात मी थंड हवेच्या ठिकाणी जात असे. डोक्याला लहानसा टॉवेल गुंडाळून रखरखीत उन्हातून सर्व दिवसभर मला भटकावे लागे. इतर गोष्टींत मन गुंतलेले असल्यामुळे उन्हाचे मला भानच राहिले नाही. अलाहाबादला आल्यानंतर माझ्या काळवंडलेल्या शरीराकडे जेव्हा माझे लक्ष गेले, तेव्हाच मी किती उन्हातून हिंडत होतो ह्याची मला कल्पना आली. अगदी दणकट माणसाच्या बरोबरीने आपणालाही उन्हातान्हातून काम करता येते, आपल्याला उगीचच उन्हाची भीती वाटत होती, असे विचार मनात येऊन मला आनंद वाटला. कोणत्याही प्रकारचा फारसा त्रास न होता कडक उन्हाळा आणि कडक थंडी मला सहन करता येत असल्यामुळे माझे काम पुष्कळच सुकर झाले आहे. त्यामुळे तुरुंगवासही मला जड जात नाही. ही सहनशक्ती व्यायामाच्या सवयीमुळे व आरोग्यामुळे माझ्या अंगी आली. व्यायामाची गोडी मला वडिलांनीच लावली. अखेर–अखेरपर्यंत ते दररोज व्यायाम करीत. त्यांचे केस पांढरे शुभ्र झाले, तोंडावर सुरकुत्या पडल्या व अति विचारामुळे ते वृद्ध दिसू लागले, तरी मरणापूर्वी एकदोन वर्षेपर्यंत वार्धक्याची सावली त्यांच्या इतर शरीरावर पडली नाही.

शेतकऱ्यांत फिरू लागल्यामुळे माझ्यातला बुजरेपणा जाऊन मला सभेत भाषण करता येऊ लागले. पूर्वी मी सभेत क्वचितच बोललो असेन. हिंदुस्तानीत भाषण करावयाचे म्हणजे तर मला भीतीच वाटे. पण शेतकऱ्यांशी बोलणेच प्राप्त होते. आणि ह्या भाबड्या जीवांची भीती तरी मला कशी वाटणार ? मला वक्तृत्वकला अवगत नव्हती. माझ्या मनात जे असेल ते मी त्यांना सरळ सरळ सांगून टाकीत असे.

१९२१ साली माझ्या खेडेगावच्या भेटी सर्व वर्षभर चालू होत्या. पण माझे कार्यक्षेत्र वाढता वाढता सर्व संयुक्तप्रांताचा त्यात समावेश होऊ लागला. असहकारितेची चळवळ जोमाने चालू होती आणि तिचा संदेश

अगदी कानाकोपऱ्यातल्या खेड्यापर्यंत जाऊन थडकला होता. प्रत्येक जिल्ह्यातल्या काँग्रेस-कार्यकर्त्यांचे थवेच्या थवे खेडोपाडी हिंडत होते आणि नव्या संदेशाबरोबरच किसानांची गाऱ्हाणी दूर करावीत या मताचाही ते प्रचार करीत असत. काँग्रेस प्रचारक जाईल तेथे अहिंसेचा मुद्दा तो आग्रहाने प्रतिपादीत असे. अहिंसेच्या तत्त्वाचे संपूर्ण आकलन शेतकऱ्यांना झाले नसले, तरी त्यामुळे शेतकरी हिंसेपासून परावृत्त झाला ही गोष्ट काही खोटी नाही; हादेखील काही लहानसहान परिणाम नव्हे. शेतकऱ्यांच्या चळवळी बहुधा हिंसामयच होतात असा अनुभव आहे. औधचा शेतकरी त्या वेळी बेफाम झाला होता. तो कढत, उकळत होता. एक ठिणगी पडती तर भडका उडाला असता. असे असूनही माणूस आश्चर्यचकित व्हावा इतके ते शांत राहिले.

शेतकरी-चळवळीच्या भीतीमुळे सरकारने कुळांचा कायदा पास करून घेण्याची घाई चालवली होती. किसानांच्या हिताच्या काही सुधारणा त्यात अंतर्भूत केलेल्या होत्या. पण चळवळ काबूत आलीसे वाटताच सुधारणा आखडत्या घेण्यात आल्या. या कायद्याप्रमाणे किसानाला आजीव अथवा तहहयात कुळाचे हक्क देण्यात आले होते. शेतकऱ्यांना ही सुधारणा त्या वेळेपुरती बरी वाटली; पण त्यामुळे आपली स्थिती सुधारत नाही, ही गोष्ट यांना मागाहून उमगली. शेतकऱ्यांचे झगडे औधमध्ये चालू राहिले, पण ते लहानसहान प्रमाणात. १९२९ सालच्या जागतिक मंदीने बाजारभाव पडले व त्यामुळे मात्र पुन्हा एकवार भयंकर परिस्थिती निर्माण झाली.

असहकारितेसंबंधी निर्णय देण्यासाठी आणि पुढील कार्यक्रम ठरविण्यासाठी १९२० साली कलकत्त्यास काँग्रेसचे जादा अधिवेशन भरले. अमेरिकेहून नुकतेच परतलेले लाला लजपतराय हे अध्यक्ष होते. असहकारितेचे नवोदित तत्त्व त्यांना रुचले नाही व त्यांनी त्याला विरोध केला.

वा. क्र. ९६४८
विषय

# गांधीयुगाचा प्रारंभ

असहकाराचे लाला लजपतराय हे एकटेच विरोधक नव्हते. बडे वजनदार सहकारी त्यांना मिळाले. कॉंग्रेसच्या जुन्या पुढाऱ्यांचे सर्व पथकच्या पथक गांधीजींच्या असहकाराविरुद्ध होते असे म्हटले तरी चालेल. दासबाबूंनी विरोधकांचे नेतृत्व स्वीकारले. ठरावात अंतर्भूत असणारी कल्पना त्यांना अमान्य होती असे नव्हे. ठरावातील मर्यादेपर्यंतच काय, पण त्याच्यापुढेही जाण्याची त्यांची तयारी होती. पण नव्या कायदेमंडळावरील बहिष्काराशी त्यांचा विरोध होता. गांधीजींच्या वतीने जुन्या प्रमुख पुढाऱ्यांपैकी फक्त माझे वडीलच काय ते उभे राहिले.

कलकत्त्याच्या जादा अधिवेशनाच्या पूर्वी माझी व वडिलांची क्वचितच भेट होत होती. पण जेव्हा जेव्हा भेटीचा योग येई, तेव्हा तेव्हा हा प्रश्न त्यांच्या मनात कसा एकसारखा घोळत होता ते माझ्या लक्षात आल्याशिवाय राहात नसे. त्या प्रश्नाला राष्ट्रीय बाजूव्यतिरिक्त वैयक्तिक बाजू होती. असहकार मान्य करावयाचा म्हणजे वकिली सोडणे प्राप्त होते. त्याचप्रमाणे जुन्या आयुष्यक्रमाला मूठमाती देऊन जीवनाला नवीन वळण लावणेही अवश्य होते. या गोष्टींना वयाच्या साठाव्या वर्षी सुरुवात करणे म्हणजे साधे काम नव्हे. राजकारणातील जुने सहकारी, आपला धंदा, अंगवळणी पडलेले सामाजिक जीवन व स्वाभावात भिनून गेलेली खर्चिक राहणी, या सर्वांवर पडदा पाडावयाचा असा त्याचा अर्थ होता.

परंतु त्यांची विचारशक्ती, त्यांचा स्वाभिमान, त्यांच्या अंगाचा पीळ या सर्वांचा परिणाम होऊन हलके हलके प्रगती करीत करीत ते नव्या चळवळीत सर्वतोपरी मिसळून गेले. अनेक प्रसंगांनी साचत गेलेला व पंजाबमधील हत्याकांडामुळे व त्यानंतर घडलेल्या गोष्टींमुळे शिगेस पोचलेला राग, सरकारच्या अन्याय्य आणि असमर्थनीय वर्तनासंबंधी होऊन चुकलेली खात्री आणि राष्ट्राचा अपमान झाल्यामुळे मनात उत्पन्न झालेली चीड या सर्व भावना कोणत्या ना कोणत्या तरी मार्गाने व्यक्त होणे जरूरच होते. वकिलीच्या धंद्यात मुरलेल्या त्यांच्या मनाचा पूर्ण विवेकाअंती जेव्हा एक

ठाम निश्चय झाला, तेव्हाच त्यांनी गांधीजींच्या चळवळीत सामील होण्याचे ठरविले.

गांधीजींबद्दल त्यांना वैयक्तिक आकर्षणही वाटत होते व त्याचा परिणामही त्यांच्या मनावर झाला हे नक्की. ज्या माणसाबद्दल त्यांना प्रेम वाटत नसे, त्याच्याबरोबर खांद्याशी खांदा भिडवून काम करणे त्यांना कधीच शक्य झाले नसते. आवडीनिवडीच्या बाबतीत ते फार काटेकोर असत. परंतु ही जोडी पाहून मात्र नवल वाटण्यासारखे होते. एक संत, विलास-पराङ्मुख, धर्मनिष्ठ, आयुष्यातील शारीरिक व इंद्रियजन्य सुखांचा त्याग करणारा; तर दुसरा थोडासा विलासी, जीवनातील अनेकविध सुखांचा आस्वाद घेण्यात तत्पर व इहलोकीच्या अस्तित्वानंतरच्या गोष्टींबद्दल बेफिकीर ! मानसपृथक्करणाच्या भाषेत सांगावयाचे, तर अंतर्मुख व बहिर्मुख व्यक्तींची ही युती झालेली होती. भेद असूनही दोघांना सामान्य अशा बंधांनी व मनःप्रवृत्तींनी दोघेही निगडित झाले होते. काही दिवसांनी दोघांचे राजकीय पंथ भिन्न झाल्यावरदेखील त्यांच्यातील स्नेहबंध जसाच्या तसा दृढ राहिला.

कलकत्त्याच्या अधिवेशनापासून काँग्रेसच्या राजकारणात गांधीयुगाला प्रारंभ झाला व ते युग अद्यापि चालूच आहे. नाही म्हणावयाला मध्यंतरीच्या काळात आपण मागे राहून देशबंधू दासांच्या स्वराज्यपक्षाला गांधींनी अग्रस्थानी बसविले होते. गांधीयुगापासून काँग्रेसचे स्वरूप अजिबात पालटले. युरोपियन पोषाख गेला व त्याच्या जागी खादीची वस्त्रे आली. काँग्रेसमध्ये कनिष्ठ, मध्यमवर्गीय प्रतिनिधींचा भरणा झाला. अधिवेशनात हिंदुस्थानी भाषा अधिकाधिक प्रचारात येऊन काँग्रेस-अधिवेशनात नवे चैतन्य, नवा उत्साह व नवी कळकळ दृष्टीस पडू लागली.

काँग्रेस संपल्यावर गांधीजी ' अमृतबझार-पत्रिके 'चे वयोवृद्ध संपादक श्री. मोतीलाल घोष यांच्या भेटीस गेले. घोषबाबू त्या वेळेस शरपंजरीच पहुडलेले होते. गांधीजींबरोबर मीही होतो. घोषबाबूंनी गांधीजींना व त्यांच्या चळवळीला आशीर्वाद दिला व ते म्हणाले, " मी तर परलोकी चाललो. तो लोक कोठेही असो, तेथे ब्रिटिश साम्राज्य नसणार याचेच मला समाधान वाटत आहे ! अखेरीस तरी ब्रिटिश साम्राज्याच्या तावडीतून माझी सुटका होत आहे ! "

नंतरच्या तीन महिन्यांत असहकारितेला सर्व देशभर भरती आली. नव्या निवडणुकीवरील बहिष्काराच्या चळवळीला आश्चर्यकारक यश लाभले. अर्थातच कायदेमंडळात शिरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला अडवून धरणे अगर तेथल्या सर्व जागा रिकाम्या पाडणे शक्यच नव्हते. मूठभर लोकांनाही एखाद्या व्यक्तीला निवडून देता येते; परंतु मतदारांपैकी बहुसंख्य लोकांनी मते दिली नाहीत व देशाने धडाडीने पुढे मांडलेल्या मतांची ज्यांना चाड होती, ते उमेदवार म्हणून उभेही राहिले नाहीत. निवडणुकीच्या दिवशी सर व्हॅलेंटाइन चिरोल हे अलाहाबाद येथे होते. ते सर्व मतदानाच्या जागी फिरून आले व बहिष्काराला मिळालेले यश पाहून त्यांना महदाश्चर्य वाटले. अलाहाबाद शहरापासून पंधरा मैलांवर असलेल्या एका खेडेगावातल्या मतदानाच्या जागी त्यांना एकही मतदार आढळला नाही.

जनतेत स्वातंत्र्याचे नवे वारे खेळू लागले आणि फार मोठे ओझे मानेवरून दूर भिरकावून दिल्याचा आनंद लोकांना मिळाला. त्यांना दडपून टाकणारी भीती पार नाहीशी झाली आणि मान वर करून ते हिंडू-फिरू लागले. दूरदूरच्या खेड्यांतून काँग्रेस, स्वराज्य, पंजाब-प्रकरण आणि खिलाफत वगैरेबद्दल सामान्य लोकांतही चर्चा होऊ लागली. स्वतःच्या आर्थिक गाऱ्हाण्यांची चर्चा ते करीतच होते; परंतु असंख्य सभांच्या व परिषदांच्या द्वारा त्यांच्या राजकीय शिक्षणातही भर पडत होती.

आमच्यापैकी जे काँग्रेसच्या कार्यक्रमाचा प्रचार करीत होते, ते १९२१ सालात तर बेहोष होऊन गेले. आमचे जीवन भावना, आशा आणि उत्साह यांनी भरून गेले. एखाद्या कार्यासाठी झिजणाऱ्या व्यक्तीच्या आनंदानुभवाची गोडी आम्ही चाखीत होतो. शंका अथवा संदेह यांना आमच्या मनात थारा नव्हता. आमच्यापुढचा मार्ग स्पष्ट होता व आम्ही पुढे चाललो होतो. इतरांच्या उत्साहाने आमचा उत्साह द्विगुणित होई व त्यामुळे इतरही पुढे ढकलले जात. पूर्वी कधी केले नसेल इतके काम आम्ही उरकीत होतो. कारण आम्हांला अशी आच लागून राहिली होती की सरकारशी आपला झगडा लवकरच सुरू होणार; तेव्हा तुरुंगात जायच्या आधी जेवढे काम करता येईल तेवढे उरकून घ्यावे.

आमच्यात स्वातंत्र्याची भावना उदित झाली व त्या भावनेमुळे आमचा अभिमानही जागृत झाला. गांजवणुकीची व निराशेची जाणीव साफ धुऊन निघाली होती. कानातल्या कानात कुजबुजण्याची, अधिकाऱ्यांशी वळणा-वळणाने व कायदा संभाळून बोलण्याची आवश्यकता उरली नाही. आम्हाला जे वाटे ते खड्या आवाजात चवाठ्यावर आम्ही बोलून दाखवू लागलो. परिणामाची पर्वा आम्ही कशाला करावी? तुरुंगाची भीती ती कसली! आम्ही तेथे जाणार हे आम्हांला अगोदरच कळले होते. बंदिवासाने आमच्या कार्याला उलट मदतच होणार होती. आमच्याभोवती घोंगावणारे असंख्य हेर आणि गुप्त पोलिस ह्यांची आम्हास कीव करावीशी वाटे. कारण त्यांच्या-पासून आम्हास काहीच छपवावयाचे नव्हते. हातातील सर्व पत्त्यांची पाने टेबलावर मांडूनच आमचा खेळ चालला होता!

खिलाफतीच्या चळवळीला प्रामुख्य देण्यात आल्यामुळे पुष्कळ मौलवींनी व मुसलमानांच्या धार्मिक पुढाऱ्यांनी चळवळीत भाग घेतला होता. त्यामुळे चळवळीला थोडेसे धार्मिक वळण लागले. चळवळीच्या धार्मिक व आध्यात्मिक बाजूवर गांधीजी नेहमीच भर देत असत. त्यांच्या धर्मात कडवेपणा अथवा असहिष्णुता नव्हती. परंतु जीवनाकडे धार्मिक दृष्टीने पाहण्याची शिकवणूक त्यापासून मिळत असे. त्याचा परिणाम चळवळीवर फार झाला आणि जनसमुदायात तरी निदान चळवळीला धार्मिक पुन-रुज्जीवनाच्या चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. बहुतेक काँग्रेसचे कार्यकर्ते आपल्या नेत्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत व ते गांधीजी बोलतील तसे बोलत असत.

हिंदू व मुसलमान समाजांत वाढीस लागलेल्या या भावनांकडे पाहून मला थोडीशी काळजीच वाटत असे. मला ही गोष्ट बिलकुल पसंत नव्हती. जाहीर सभांतून हे मौलवी, मौलाना आणि स्वामी जे विचार प्रदर्शित करीत ते फार प्रतिगामी स्वरूपाचे असत. समाजशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास यां-बद्दलच त्यांचे ज्ञान इथूनतिथून चुकीचे वाटत होते. प्रत्येक गोष्टीला धर्माची फोडणी दिल्यामुळे स्पष्टपणे विचार करणे अशक्य होऊन बसे. गांधीजींचे काही काही शब्दही कर्णकटू वाटत. उदाहरणार्थ, 'रामराज्य' हा त्यांचा नेहमी येणारा शब्द व्या. पण त्यांना थोपवण्याची शक्ती माझ्यात नव्हती.

शब्द रूढ आणि जनतेला ज्ञात आहेत म्हणून ते गांधीजी वापरीत असतील, असे स्वतःचे समाधान मी करून घेत होतो. कारण लोकांची अन्तःकरणे काबीज करण्याची कला त्यांना पूर्णपणे अवगत होती. त्यांची भाषा उलगडणे मुष्किलीचे होई. पण ते थोर व असामान्य पुरुष आहेत. विजयी सेनानी आहेत, एवढी गोष्ट आम्हाला समजण्याइतके त्यांच्याविषयीचे ज्ञान आम्हाला होऊन चुकले होते. त्या काळापुरता तरी आम्ही त्यांच्या हाती कोरा चेक दिला होता. त्यांच्या लहरी व त्यांचे छद यांबद्दल आपसांत चर्चा सुरू झाली की आम्ही अर्धवट थट्टेने म्हणत असू की, स्वराज्य मिळाल्यावर मात्र या प्रकारांना पायबंद घातलाच पाहिजे !

तथापि, आमच्यापैकी अनेक व्यक्तींवर राजकीय व इतर बाबतींत त्यांची इतकी छाप पडली होती की, धार्मिक वृत्ती सर्वस्वी टाळणे अशक्य होऊन बसले. धर्माच्या बाह्य भपक्याचा मला तिटकारा होता. धार्मिक समजण्यात येणाऱ्या व्यक्तींकडून जनतेची नागवणूक होई ती मला खपत नव्हती. असे असूनही माझे मन धर्माकडे खेचले गेले; आणि १९२१ साली माझ्या विचारांत धार्मिक प्रवृत्तींनी जितका जोर केला तितका पूर्वी कधीच केला नसेल. परंतु त्या काळातही मी धर्माच्या फारसा जवळ गेलो नाही.

आमच्या चळवळीची व सत्याग्रहाची जी विशुद्ध व नैतिक बाजू, तिच्याविषयी मला फार अभिमान वाटे. राजकारण अध्यात्मपर बनवावे ही कल्पना मला फार रम्य वाटली. अर्थातच या शब्दांचा अर्थ कोणीही संकुचित धर्मभावनेने करू नये. उच्च ध्येयाप्रत नेणारे मार्गही उच्चच असावयास पाहिजेत, हे तत्त्व नैतिक दृष्ट्याच केवळ नव्हे, तर व्यावहारिक राजकारणाच्या कसोटीला उतरण्याच्या दृष्टीनेही विशुद्ध आहे असे मला वाटले. कारण मार्ग चोख नसले की पुष्कळदा ते ध्येयाची नासाडी करतात व मग नव्या समस्या आणि नव्या अडचणी उपस्थित होत जातात. हीन मार्ग पत्करल्यावर व्यक्ती निर्लेप राहणार कशी ? कमरेत लवायचे आणि पोटाने सरपटावयाचे ठरवल्यावर मार्ग झपाट्याने व स्वाभिमानपूर्वक कसा काय काटता येणार ? भगवद्गीतेतील अध्यात्म मला विशेष कळत नसले, तरी गांधीजींच्या आश्रमात दर संध्याकाळी म्हणण्यात येणारा एक श्लोक मला फारच आवडला होता : ' निवाऱ्याच्या जागी ठेवलेल्या दिव्याच्या ज्योती-

प्रमाणे माणसाने शांत, अविचल असावे; कर्मफलाची आकांक्षा न बाळगता आपले कार्य करीत राहावे ' वगैरे स्थितप्रज्ञाचे वर्णन त्यात होते. मी स्वतः शांत अथवा संन्यस्त वृत्तीचा नसल्यामुळे या शिकवणुकीचा परिणाम माझ्या मनावर बराच झाला.

मी चळवळीशी अगदी समरस होऊन गेलो होतो. माझ्याप्रमाणे अनेकांची स्थिती झालेली होती. इतर सर्व संबंध मी सोडून दिले. आवडीची पुस्तके, मित्र, ज्यांचा हातांतील कामाशी साक्षात संबंध येत नसे अशी वर्तमानपत्रे, यांच्याकडे मी पाहातही नसे. चळवळ सुरू होईपर्यंत नवी पुस्तके वाचण्याचा व जागतिक उलाढालींशी परिचय ठेवण्याचा माझा क्रम होता. पण हे सर्व उरकण्यास आता वेळ मिळेनासा झाला. कुटुंबातील मंडळीवर अत्यंत प्रेम असूनही घरच्या माणसांना, पत्नीला व मुलीला मी जवळजवळ विसरूनच गेलो. त्या काळात माझ्यामुळे घरच्या मंडळींना किती त्रास सहन करावा लागला व माझ्या पत्नीला माझ्याशी वागताना किती सोशिकपणा दाखवावा लागला असेल, ह्याची मला नंतर कित्येक वर्षांनी जाणीव झाली. कचेरीत, कमिटीच्या बैठकीत व सभांतूनच माझा सर्व वेळ खर्च होत होता. ' खेड्याकडे चला ' ही घोषणा त्या वेळी सगळीकडे दुमदुमत होती, व आम्ही तिला अनुसरून शेते तुडवीत लांबलांबच्या खेड्यांतून शेतकऱ्यांच्या सभांसाठी जात होतो. जनसमुदायाचा मला अधिकाधिक परिचय होत जाऊन शहरांतील जनता व शेतकरी ह्यांच्यातील भेद मला समजू लागले. धूळ, दगदगीची राहणी, मोठमोठ्या सभांतून होणारी धक्काबुक्की माझ्या अंगवळणी पडली.

मी केलेल्या काही भाषणांमुळे माझ्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात येणार अशी धास्ती वाटत होती. तथापि, त्या वेळी तसा काहीच प्रकार झाला नाही. वर्षाच्या अखेरअखेरीला मात्र निकाराचा प्रसंग येऊन ठेपला. ' प्रिन्स् ऑफ वेल्स् ' हिंदुस्थानला येणार होते व त्यांच्या भेटीनिमित्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या समारंभांवर बहिष्कार घालण्याचा निश्चय काँग्रेसने जाहीर केला होता.

प्रिन्स् ऑफ वेल्स् आमच्या प्रांतात येण्याच्या आधी थोडे दिवस म्हणजे डिसेंबरच्या प्रारंभी सामुदायिक अटकेस सुरुवात झाली.

घटिका अगदी बुडण्याची वेळ आली आहे ह्याची आम्हाला कल्पना

होतीच. सरकार व कॉंग्रेस ह्यांच्यामध्ये अटळ ठरलेला झगडा कोणत्याही क्षणी सुरू होण्याचा रंग दिसू लागला. तुरुंगाची अद्यापि ओळख झालेली नव्हती व बंदिवासाच्या कल्पनेतील नवखेपणा अद्याप कायम होता. एके दिवशी उशीरापर्यंत बसून अलाहाबाद-कॉंग्रेस-कचेरीतील तुंबलेले काम मी आटपून टाकीत होतो. इतक्यात एक कारकून गडबडीने तेथे आला व त्याने झडती-वॉरंट घेऊन पोलिस आले आहेत व इमारतीला त्यांनी गराडा घातला आहे असे सांगितले. अशा प्रकारचा हा माझा पहिलाच अनुभव असल्यामुळे माझेही मन थोडेसे क्षुब्ध झाले. परंतु पोलिस आले अथवा गेले तरी आपणाला त्याची पर्वा नाही, आणि आपली मनाची शांती अथवा सावधानता ढळणार नाही, अशी बतावणी करण्याची मनात प्रबळ इच्छा होती. म्हणून एका कारकुनाला झडतीसाठी आलेल्या पोलिस-अधिकाऱ्याबरोबर जा व त्यांना कचेरीच्या खोल्या दाखवा असे मी फर्माविले; व कचेरीतील बाकीच्या लोकांनी शिपायांकडे लक्ष न देता आपापले काम करीत राहावे असेही मी बजावले. काही वेळाने माझ्या एका सहकारी मित्राला कचेरीबाहेरच पकडले होते तो माझा निरोप घेण्यासाठी आत आला. पोलिस बरोबर होताच. मी अहंमन्यतेने इतका फुगून गेलो होतो की, हे अपरिचित प्रसंग नित्याचेच आहेत असे समजूनच आपण चालले पाहिजे अशी मी कल्पना करून घेतली आणि माझ्या सहकाऱ्यांशी मी अगदी तुसडेपणाने वागलो. मी पत्र लिहीत होतो ते संपेपर्यंत जरा थांबा असे मी मित्राला व पोलिसाला सांगितले व तेही अगदी औपचारिक रीतीने! आणखी धरपकड झाल्याची बातमी आली. शेवटी घरी जाऊन काय झाले आहे ते पाहावे तरी, असे ठरवून मी तिकडे गेलो. तेथे आमच्या मोठ्या घरांपैकी एका भागाची पोलिस झडती घेत होते. माझ्या वडिलांना व मला दोघांनाही पकडण्यासाठी ते आले आहेत असे मला सांगण्यात आले.

प्रिन्स् ऑफ वेल्स्‌च्या भेटीवरील बहिष्कार आमच्या अटकेमुळे जितका यशस्वी झाला, तितका दुसरे काहीही केले असते तरी तो यशस्वी झाला नसता! जेथे जेथे युवराज गेले तेथे तेथे हरताळांनी व ओस पडलेल्या रस्त्यांनीच त्यांचे स्वागत केले!

संयुक्त प्रांत व बंगालमध्ये अटकेचे जनमेजय-सत्रच सुरू झाले. दोन्ही प्रांतांतील झाडून सगळ्या पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली व हजारो स्वयंसेवक तुरुंगांत गेले.

डिसेंबर १९२१ ते जून १९२२ पर्यंत जवळजवळ तीस हजार लोक असहकारितेच्या चळवळीत भाग घेतल्यामुळे तुरुंगांत गेले. बहुतेक मुख्य पुढारी तुरुंगांत पडले असले, तरी चळवळीचे सेनानी महात्मा गांधी अद्यापि बाहेर होते व रोजच्या रोज संदेश देऊन व दिशा दर्शवून लोकांचा उत्साह ते कायम राखीत होते.

१९२२ च्या सुरुवातीला यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणे सर्वच देखावा पालटला. तुरुंगात आम्हाला कळले की, गांधीजींनी चळवळीचे सर्व चढाऊ कार्यक्रम बंद केले असून कायदेभंगाची चळवळ थांबविली आहे. ही बातमी ऐकून आम्ही थक्क झालो, गोंधळून गेलो! वृत्तपत्रात बातमी वाचली की, चौरीचौरा नावाच्या गावी खेडुतांच्या जमावाने पोलिसांचा प्रतिकार करण्याच्या उद्देशाने पोलिसांसकट चौकीला आग लावून दिली आणि त्यामुळे सहासात पोलिस जळून मेले. काही आठवडे गेल्यावर सरकारने गांधीजींना पकडून त्यांना जबरदस्त शिक्षा ठोठावली.

तेव्हा १९२२ मध्ये कायदेभंग बंद केला ही गोष्ट योग्य झाली असली, तरी फार मोठ्या चळवळीचा कासरा ताणून ती एकाएकी थांबविल्यामुळे देशात घातुक मनोवृत्तींची वाढ झाली असण्याचा संभव आहे. राजकीय क्षेत्रात व्यक्त होणारी निष्फळ व पांगलेली हिंसावृत्ती मावळली; पण व्यक्त होण्यासाठी कोठे तरी ती अवकाश शोधीत होतीच. त्यामुळे इतिउत्तरच्या काळात जातीय तंटे विकोपास गेले असावेत. असहकारितेची व कायदेभंगाची नदी दुथडी भरून वाहात होती, तोपर्यंत सर्व प्रकारचे जातिनिष्ठ व राजकीय दृष्ट्या उलट चालीचे लोक लव्हाळ्यासारखे दबून राहिले होते. त्यांनी आता डोके वर उचलले.

माझ्या वडिलांना व मला दोन वेगवेगळ्या कोर्टांनी भिन्न भिन्न आरोपांवरून सहा महिन्यांची शिक्षा दिली होती. चौकशी म्हणजे एक सोंगच होते. वहिवाटीप्रमाणे आम्ही तीत भाग घेतला नाही. तीन महिन्यांनंतर फेरचौकशी अधिकाऱ्याने मला निर्दोषी म्हणून सोडून दिले. वडिलांना सोडून

बाहेर जाणे माझ्या जिवावर आले होते. लगेच अहमदाबादेला जाऊन गांधीजींची भेट घ्यावयाचे मी ठरवले. पण मी तेथे पोचण्यापूर्वीच गांधीजींना अटक झालेली होती. त्यांची भेट साबरमती तुरुंगात झाली. खटल्याच्या वेळी मी हजर राहिलो. तो प्रसंग चिरस्मरणीय होता. आमच्यापैकी तेथे जे लोक हजर होते त्यांच्या आठवणींतून तो जाणे शक्य नाही. जज्ज एक इंग्रज गृहस्थ होते, ते मोठ्या गंभीरपणे व सुजाणपणे वागले. गांधीजींनी कोर्टाला उद्देशून केलेले भाषण चित्ताला अगदी हालवून टाकणारे असे होते. आम्ही परत फिरलो तेव्हा त्यातील अर्थपूर्ण वाक्ये व ठसठशीत कल्पनाशक्ती यांची चित्रे आमच्या डोक्यात तरळत होती.

मी अलाहाबादेस परत आलो. अनेक मित्र व सहकारी तुरुंगांत अडकलेले असल्यामुळे बाहेर मला एकटे एकटे वाटू लागले; मनाला मुळीच करमेना. परदेशी मालावरील बहिष्कारात मी लक्ष घालू लागलो. दोन–तीन दिवसांनी मला व व्यापाऱ्यांशी बोलणी करण्यात ज्यांनी भाग घेतला होता अशा माझ्या सहकाऱ्यांना पकडण्यात आले. मी बचाव केला नाही, पण कोर्टापुढे माझे म्हणणे विस्ताराने मांडले. माझ्यावरील तीन आरोप शाबीत होऊन मला सजा देण्यात आली. मला एकंदर एक वर्ष नऊ महिन्यांची शिक्षा झाली. शिक्षेची ही दुसरी खेप. बाहेर सुमारे सहा आठवडे राहून मी पुन्हा तुरुंगाच्या दारात पाऊल टाकिले.

# लखनौचा तुरुंग ६

राजकीय गुन्ह्यासाठी तुरुंगाची शिक्षा मिळणे ही गोष्ट १९२१ साली नवीन वाटण्याचे कारण नव्हते. विशेषेकरून वंगभंगाच्या चळवळीपासून तुरुंगाकडे जाणारांची अखंड रांगच लागलेली होती. तथापि, १९२१ सालातदेखील आम्हाला तुरुंगाचे अंतरंग अपरिचितच होते. तुरुंगाच्या उग्र दिसणाऱ्या दरवाजाने नव्या राजबंद्याला गिळून टाकले की त्याचे आत काय होते याची जाणीव तेव्हा थोड्यांनाच असेल.

१९२० सालापासून तुरुंगवासाच्या बातम्या सारख्या वाचनात येऊ लागल्या व प्रत्यक्ष आमच्या सहकाऱ्यांपैकीसुद्धा पुष्कळजण तुरुंगांत गेले. त्यामुळे तुरुंगवासाच्या कल्पना पचनी पडून पूर्वी तुरुंग म्हटला की मनात नकळत जी नाखुषीची व तिटकाऱ्याची भावना जागृत होत असे, ती कमी कमी होऊ लागली. परंतु पूर्वतयारी कितीही झालेली असली, तरी तुरुंगाच्या लोहद्वारात पहिल्याच वेळी उभे राहिल्याबरोबर मनोवृत्तींची जी खळबळ उडे व मनाला जो ताण बसे, तो नाहीसा होणार थोडाच? त्या दरवाजात पाऊल ठेवले की मनाची थोडीशी चलबिचल उडते, ओढाताण होते व हृदय धडधडू लागते; आणि बाहेरच्या जगातील वृक्षराजींचे, विस्तीर्ण खुलेपणाचे, लोकांचे व गाड्याघोड्यांचे आणि कित्येक दिवसपर्यंत पुन्हा ज्यांची गाठही पडणार नाही अशा आतेष्टांचे डोळे भरून शेवटचे दर्शन घ्यावे म्हणून नजर न कळतच मागे मुरडल्याशिवाय राहात नाही.

पहिल्या तुरुंगवासाच्या वेळी तीन महिन्यांनंतर माझी अचानकपणे सुटका झाली होती. वडिलांना, दोघा चुलत भावंडांना व मला २०″ × १६″ ची एक लहान पृथक कोठडी देण्यात आली होती. निरनिराळ्या बराकींतून जाण्यायेण्याची आम्हांला बरीच मोकळीक असे. बाहेरच्या आतेष्टांशीसुद्धा पुष्कळदा गाठीभेटी होत. दररोज येणाऱ्या वृत्तपत्रांतील ताज्या धरपकडीच्या व चळवळीच्या बातम्यांमुळे वातावरण उत्साहमय राहात असे. आपसातील चर्चेत पुष्कळ वेळ निघून जाई आणि वाचनासाठी अथवा दुसऱ्या विशेष कामासाठी फारच थोडा वेळ मिळे. आमची कोठडी झाडून लोटून स्वच्छ करण्यात, वडिलांचे व माझे कपडे धुण्यात व सूत कातण्यात माझा सकाळचा वेळ जात असे. ते हिवाळ्याचे दिवस होते. उत्तर हिंदुस्थानात हिवाळ्याचे दिवस म्हणजे सर्वोत्तम. पहिले काही आठवडे स्वयंसेवकांसाठी हिंदी, उर्दू व इतर प्राथमिक विषयांचे वर्ग उघडण्याची आम्हाला परवानगी मिळाली होती. दुपारी आम्ही व्हॉलीबॉल खेळत असू.

हळूहळू निर्बंध वाढू लागले. आमच्या हद्दीच्या बाहेर जाण्याची आणि तुरुंगाच्या ज्या विभागात बहुतेक स्वयंसेवकांना ठेवण्यात आले होते, तिकडे चक्कर मारण्याची आम्हांला बंदी करण्यात आली. साहजिकच वर्ग बंद पडले. तेवढ्यात माझी मुक्तता झाली. मी मार्चच्या प्रारंभी बाहेर गेलो, तो

एप्रिलमध्ये परत आलो. तोपर्यंत परिस्थिती पालटली होती. वडिलांची रवानगी नैनीतालच्या तुरुंगात केल्यानंतर नवे नियम लादण्यात आले. बराकींना परस्परांशी संबंध ठेवता येईना. भेट व पत्र महिन्यातून एकदाच मिळू लागले. अन्नही निकृष्ट प्रकारचे देत. त्यात बाहेरून भर घालण्याची मात्र परवानगी होती.

मी ज्या बराकीत होतो, तेथे सुमारे पन्नास माणसे होती. आम्ही सर्व दाटीवाटीने राहात होतो. दोन अंथरुणांत तीन अगर चार फुटांचे अंतर असे. सुदैवाची गोष्ट म्हणजे बराकीतील बहुतेक व्यक्ती माझ्या परिचयाच्या होत्या व त्यांच्यापैकी बरेचसे माझे मित्रच होते. पण अहोरात्रीत एकान्त असा मुळीच मिळत नसल्यामुळे मोठे अवघड होऊ लागले. तेच तेच लोक आपल्याकडे पाहात असावयाचे, त्याच त्याच लहानसहान कुरापती निघाव-याच्या ! त्यांपासून सुटका करून घेणार कशी ? उघड्यावरच स्नान करावे व तेथेच कपडेही धुवावेत. व्यायाम घ्यावयाचा तर बराकीच्या भोवती पळावे लागत असे. आम्ही इतका वादविवाद केला, की काही नवा युक्तिवाद सांगण्याची ताकद बहुधा कोणातच उरली नाही. ह्या जीवनाचा सर्वांच्याच मनाला त्रास होई. माझा जीव तर पुष्कळ वेळा एकान्तवासासाठी तळमळत राही.

गर्दी होती खरी, पण मित्रांचा सहवास अत्यंत सौजन्यपूर्ण व आनंदमय होता हेही कबूल केले पाहिजे. आमचे एकंदरीत बरे जमत असे. परंतु कधी कधी इतरांची संगत नकोशी वाटे व दूर कोठे तरी जाऊन बसावे अशी इच्छा उत्पन्न होई. त्या वेळी पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे बाहेर जाऊन बसणे शक्य होते, म्हणून एकान्तवासाची इच्छा झाली की बराकीतून उठून आमच्या आवारात उघड्यावर जाऊन बसण्याचा मी क्रम ठेवला होता. ऊन लागे व क्वचित प्रसंगी पावसाची सरही येई. पण ते सहन करून मी शक्य तितका वेळ बराकीच्या बाहेरच घालवीत असे. तेथे उघड्यावर पडल्या पडल्या आकाशाकडे व मेघमालेकडे मी टक लावून बघत असे. त्या वेळी त्यांचे बदलते रंग किती सुंदर दिसतात याची मला चांगली कल्पना आली.

आमच्या दृष्टीने वेळेला काही किंमतच राहिली नव्हती. वेळ इतका

मुबलक असे की त्याचे ओझेच वाटावे ! क्षणोक्षणी बदलणाऱ्या पावसाळी ढगांचे निरीक्षण करण्यात मी जो वेळ घालवीत होतो, तो मात्र अतिशय आनंदात जाई. बराकीतील कोंदट वातावरणातून झालेल्या सुटकेमुळे मला समाधान वाटत असे. त्या वर्षाच्या पावसाळ्याचा माझ्यावर इतका परिणाम का झाला कोणास ठाऊक ! त्यापूर्वी अगर नंतर असे कधीही झाल्याचे मला आठवत नाही. डोंगरावर आणि समुद्रावर झालेले सूर्योदय व सूर्यास्त मी अनेकवार पाहिलेले आहेत व त्यांच्या दिव्य सौंदर्यात अवगाहन करून त्यांच्या भवितव्यामुळे मनाला काही काळ जो उल्हास प्राप्त होतो त्याचाही अनुभव मी घेतलेला आहे. तथापि, असे देखावे नित्य परिचयाचे झाल्यामुळे त्यात विशेष गोडी वाटत नाहीशी झाली असावी. परंतु तुरुंगात सूर्योदय अथवा सूर्यास्त कधीच पाहावयास मिळत नसे. क्षितिजाचे दर्शन आम्हाला कधी घडले नाही. सकाळचा बराच काळ उलटल्यानंतर आमच्या भोवती उभारलेल्या तटावरून जेव्हा सूर्य उगवे, तेव्हा त्याचे किरण प्रखर झालेले असत. रंग-वैचित्र्य तर कुठेच नजरेस पडत नसे. मातीने लिंपलेल्या भकास भिंतींकडे पाहण्याची सवय झाल्यामुळे डोळ्यांची रुचिग्रहणाची शक्ती जवळ जवळ नष्टच झाली होती. मनातून मात्र छाया, प्रकाश आणि रंग यांचे खेळ पाहण्यासाठी ते आतुर झालेले असावेत. त्यामुळे पावसाळी ढगांची शिडे जेव्हा मोठ्या दिमाखाने फडकू लागली, चित्रविचित्र आकारांच्या मेघांच्या रांगा आकाशात गर्दी करू लागल्या, व हरतऱ्हेच्या रंगांत क्रीडा करून त्या न्हाणून निघू लागल्या, तेव्हा आनंदाने बेहोष होऊन अनिमिष लोचनांनी समाधी लागल्याप्रमाणे मी त्यांच्याकडे पाहातच राहिलो ! कधी कधी ढग पांगून जात आणि मग फक्त पावसाळ्यातच दिसणारा मनोहारी देखावा डोळ्यांना दिसत असे. गर्द ढगांच्या फटींतून आकाशाच्या अगाध नीलिम्याचे दर्शन झाले की अनंताचा एक अल्पसा खंडच आपण पाहात आहोत असा भास होई.

कामाचे व व्यायामाचे रहाटगाडगे सुरू होते. व्यायाम व्हावा म्हणून आवारातल्या आवारातच पळण्याचा क्रम आम्ही ठेवला होता. केव्हा केव्हा आमच्यापैकी दोघेजण बैलांप्रमाणे मोटही ओढीत असत. त्यामुळे तेथल्या भाजीपाल्याच्या वाफ्यांना पाणी द्यावयास मिळे. बहुतेक लोक रोज थोडेसे

कातीत असत. परंतु त्या हिवाळ्याच्या दिवसांत माझा मुख्य धंदा म्हणजे वाचनाचा. जेव्हा जेव्हा सुपरिंटेंडेन्टची आमच्या आवारात फेरी येई तेव्हा तेव्हा त्याला मी वाचीत असलेला दिसे. हे वाचनाचे वेड पाहून तो जरा चिडलाच व त्याने माझ्यावर थोडी टीकाही केली. “ माझ्याबद्दल विचाराल, तर वयाच्या बाराव्या वर्षापासूनच मी सर्वसामान्य वाचन सोडून दिले आहे ” असे तो म्हणे.

हिवाळ्यात संध्याकाळ लवकर होई आणि आकाश निरभ्र असल्यामुळे आमचे चित्त साहजिकच ताऱ्यांकडे वेधले जात असे. नकाशाच्या मदतीने आम्ही काही नक्षत्रपुंज हुडकूनही काढले. संध्याकाळी ते उगवण्याची आम्ही वाट पाहात बसत असू. ते दिसू लागले की ओळखीचे मित्र भेटल्याचा आनंद आम्हांला होई.

अशा प्रकारे आमचा काळ चालला होता. दिवसामागून दिवस जाता जाता दिवसांचे आठवडे व आठवड्यांचे महिने झाले. तुरुंगातील दैनिक जीवनाची च्याकोरी अंगवळणी पडली; पण बाहेरच्या जगात आमच्या आयांवर, धर्मपत्नीवर, बहिणींवर संसाराचा भार पडत होता. वर्षानुवर्षे वाट पाहता पाहता त्या कंटाळल्या होत्या, आणि त्यांची प्रिय माणसे तुरुंगात अडकलेली असल्यामुळे बाहेरची मोकळीक त्यांच्या हृदयाला शल्याप्रमाणे बोचत होती.

तुरुंगात अनेक गोष्टींची वाण जाणवते; पण त्यातल्या त्यात स्त्रियांचा आवाज व मुलांचे खिदळणे ह्यांचे ध्वनी कानी न पडल्यामुळे फार चुकल्या-चुकल्यासारखे होते; मला एकदा एका नवीनच गोष्टीची उणीव फार तीव्रतेने भासली. त्या वेळी मी लखनौ-जिल्हा-तुरुंगात होतो. माझ्या मनात आले की गेल्या सात आठ महिन्यांत कुत्र्याचे भुंकणे काही आपण ऐकले नाही !

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र ........ दिनांक ......
विषय क्र

# पुन्हा बाहेरच्या जगात



१९२३ च्या जानेवारीच्या शेवटच्या दिवशी लखनौमधील सर्व राजबंद्यांची मुक्तता करण्यात आली. तुरुंगाच्या दरवाजातून बाहेर पडताना नेहमीच सुटकेचे समाधान व आनंद यांचा अनुभव येतो. मोकळी हवा व खुली मैदाने, रस्त्यावरील वाहतूक व जुन्या मित्रांची भेट या सर्वांचा परिणाम मेंदूवर होऊन तो किंचित तरल बनतो. बाह्य जगाच्या प्रथमदर्शनासरशी माणसाला किंचित उन्माद चढतो असे म्हटले तरी चालेल. आमची मनेही भराऱ्या मारू लागली होती. पण आमचा आनंद क्षणभरच टिकला. कारण, कॉंग्रेसची स्थिती निराशाजनक झालेली होती. ध्येयवाद संपून कारस्थाने सुरू झाली होती व कॉंग्रेस आपल्या हाती यावी म्हणून निरनिराळ्या गटांच्या हालचाली चालल्या होत्या.

मी स्वतः कौन्सिलप्रवेशाच्या सर्वस्वी विरुद्ध होतो; कारण, प्रवेश केला की सामोपचाराचे धोरण स्वीकारणे भाग पडणार हे उघड दिसत होते. परंतु देशापुढे दुसरा कोणताही राजकीय कार्यक्रम नव्हता हेही खरे. प्रत्यक्ष प्रतिकाराची लाट यशस्वी न होताच ओसरून गेल्यावर सनदशीर राजकारणाची अमदानी काही वेळ चालावी हे अपरिहार्य होते. पण कायदेमंडळातील राजकारणही सहकार्याचे व विधायक न ठेवता अडवणुकीचे व चढाईचे असावे, अशीच दासबाबूंची व माझ्या वडिलांची इच्छा होती.

कायदेमंडळात शिरून तेथेही राजकीय लढा चालवावा असे दासबाबूंचे ठाम मत होते. माझ्या वडिलांचे धोरणही जवळ जवळ तसेच होते. आयर्लंडातील सिन्‌फिन्‌नी पार्लमेंटच्या जागा जिंकल्या व नंतर पार्लमेंटात पाऊल टाकावयाचे नाही असे त्यांनी ठरविले. आम्हा नव्या पिढीतील लोकांना सिन्‌फिन्‌चे हे धोरण फार पसंत होते. १९२० च्या उन्हाळ्यात बहिष्काराची ही पद्धती तुम्ही स्वीकारावी असा मी गांधीजींना खूपच आग्रह केलेला मला आठवतो. महंमदअल्ली त्या वेळी खिलाफतीच्या शिष्टमंडळाबरोबर युरोपात गेले होते. परत आल्यावर कौन्सिल-बहिष्काराविषयी त्यांनीही नापसंती दर्शविली. सिन्‌फिन्‌चा मार्गच त्यांना अधिक पसंत होता. मत-

दानावर बहिष्कार घाला हा पुकारा जनतेला जसा चटकन समजेल, तशी सिन्फिन्ची पद्धती समजणार नाही, असा गांधीजींचा आक्षेप होता. शिवाय, निवडून आल्यावर आपले उमेदवार कौन्सिलकडे ओढले जातील, त्यांना मागे खेचून धरण्याचे आवश्यक ते सामर्थ्य व शिस्त आपल्या चळवळीत नाही; त्यामुळे कॉंग्रेसची प्रतिष्ठा नष्ट होईल, असे गांधीजींचे म्हणणे होते.

दोन विरोधी गटांत सख्य निर्माण करण्याचे प्रयत्न काही लोक करीत होते, त्यांना तुरुंगातून सुटल्यावर मी जाऊन मिळालो. मला फारसे यश आले नाही. प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचा चिटणीस या नात्याने मी कॉंग्रेस-संघटनेकडे लक्ष देऊ लागलो. गेल्या वर्षीच्या धकाधकीमुळे पुष्कळच गोष्टी करावयास हव्या होत्या. मी खूप काम करीत होतो. पण त्यात सहेतुकता फारशी नव्हती. माझे स्वतःचे मनच अधान्तरी लोंबकळत होते. लवकरच मला नवीन कार्यक्षेत्र मिळाले. सुटल्यानंतर काही आठवड्यांतच मी अलाहाबाद नगरपालिकेच्या अध्यक्षस्थानी जाऊन बसलो. ही निवडणूक इतकी अनपेक्षितपणे झाली की, निवडणुकीच्या आधी पाऊण तासपर्यंत माझे नावही कोणी सुचवले नव्हते !

नगरपालिकेतील निरनिराळ्या कामांची मला गोडी लागून मी त्यासाठी अधिकाधिक वेळ खर्च करू लागलो. त्या प्रश्नांचा मी अभ्यास केला व नगर-पालिकेने करावयाच्या सुधारणांची भव्य योजनाही मनात आखून ठेविली. पण हिंदुस्थानातील नगरपालिकांची आहे ही घटना कायम असता कोणतीही असाधारण सुधारणा पार पाडणे शक्य नाही, हे मला नंतर कळून आले ! तथापि, करता येण्यासारखेही पुष्कळच होते. नगरपालिकेला अधिक कार्यक्षम करण्यासाठी व जुन्या प्रकरणांचे गदळ काढून टाकण्यासाठी मी खूप मेहनत घेतली. माझे कॉंग्रेसचे कामही वाढत चालले होते व भरीत भर म्हणून ऑल इंडिया कॉंग्रेसच्या चिटणिसाच्या जागीही मला निवडण्यात आले होते. ही सर्व कामे उरकावयाची म्हणजे मला रोज पंधरा पंधरा तास काम करावे लागे. दिवसभर काम केल्यावर सर्व शक्ती खलास होत असे.

तुरुंगातून सुटून आल्यानंतर लवकरच मला स्वराज्यवाद्यांची विचारसरणी पटवून देण्याचा दासबाबूंनी प्रयत्न केला. पुढे काय करावे ह्याबद्दल माझ्या कल्पना यद्यपि स्पष्ट नव्हत्या, तरी त्यांच्या युक्तिवादाच्या आहारी मी गेलो नाही. विशेष आश्चर्याची परंतु वडिलांच्या स्वभावाची निदर्शक अशी गोष्ट

म्हणजे स्वत:ला स्वराज्यपक्षाविषयी अत्यंत तळमळ वाटत असूनही मला त्यांनी त्या पक्षाकडे ओढण्याचा आग्रह धरला नाही. त्यांच्या मोहिमेत मी सामील झालो असतो तर त्यांना फार आनंद झाला असता यात शंका नाही. परंतु फार थोर मन करून त्यांनी मला या बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. माझे वडील व दासबाबू हे जिवलग मित्र बनले ते ह्याच वेळी. त्यांच्यातील संबंध केवळ राजकीय मैत्रीपेक्षा अधिक गाढ स्वरूपाचे होते. ते एकमेकांवर अंत:करणापासून प्रेम करीत.

१९२३ नंतरचे माझे कौटुंबिक जीवन अत्यंत सुखासमाधानाचे गेले. तथापि, कुटुंबात मला फार वेळ घालवता येत नसे. सुदैवाने मला कुटुंबातली मंडळी फार चांगली लाभली आहेत; आणि अडचणीच्या व त्रासाच्या प्रसंगी त्यांनीच मला आसरा देऊन माझा मन:क्षोभ दूर केलेला आहे. १९२० सालापासून माझ्या पत्नीने किती धीरोदात्त वर्तन ठेवले आहे, ते पाहिले की माझ्या नालायकीची मला शरम वाटू लागते. ती अत्यंत अभिमानी व हळवी असूनही तिने माझा तालेवारपणा चालू दिला; इतकेच नव्हे, तर वेळोवेळी मला सुख व समाधान व्हावे म्हणूनही ती झटली.

१९२० सालापासून आमच्या राहणीत थोडासा बदल झाला होता. राहणी बरीच साधी झाली होती, व कित्येक नोकरचाकर कमी करण्यात आले होते. अर्थातच आवश्यक त्या सुखसोयींत काहीच कमतरता नव्हती. गाड्या-घोडे, नव्या जीवनाला आवश्यक अशा घरातल्या काही चीजवस्तू आम्ही विकून टाकल्या होत्या, पोलिसांनी काही फर्निचर आधीच विकले होते. फर्निचर आणि माळी कमी झाल्यामुळे आमच्या घरातला नीटनेटकेपणा कमी झाला व बागही भरमसाट वाढली.

आर्थिक मदतीसाठी वडिलांवर अवलंबून राहावे लागते याचे मला जरा वाईट वाटून जीव संकोचल्यासारखा होई. पण आर्थिक परावलंबनाची कल्पना मला त्रासदायक होते असे मी वडिलांपाशी फक्त एकदाच बोलून दाखवले. त्यांच्या मनाला माझे बोलणे लागू नये म्हणून मी शक्य तितक्या सौम्य शब्दात व आडपडदे मध्ये ठेवून बोलत होतो. पण सार्वजनिक काम करण्याचे सोडून थोडक्या पैशासाठी मी आपला सर्व वेळ अथवा त्यापैकी बराचसा वेळ खर्च करणे अगदी मूर्खपणाचे आहे असे त्यांनी सांगितले. तुझ्या पत्नीला व माझ्या

पत्नीला आणि तुला वर्षभर पुरतील इतके पैसे चार दिवस काम केले की मी सहज मिळवीन असे ते म्हणाले. त्यांचे म्हणणे सत्य होते; पण माझे त्यापासून समाधान झाले नाही. तथापि, मी त्यांच्या म्हणण्याप्रमाणेच वागत होतो.

१९२३ च्या डिसेंबरमध्ये काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन कोकोनाडा येथे भरले. तेथे मौलाना महंमदअली अध्यक्ष होते. एक वर्षापुरता मी ऑल इंडिया काँग्रेसचा चिटणीस व्हावे असा महंमदअलींनी आग्रह धरला. कार्यकारी-पदाची जबाबदारी स्वीरण्याची माझी इच्छा नव्हती. पण मला भीड मोडवेना. सर्व वर्षभर आमचे ठाक जमले. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सर्व सभासदांना पत्रे लिहिताना त्यांची फक्त नावे लिहिण्यात यावीत, मागे अथवा पुढे पदव्या वगैरेचे भालदार-चोपदार ठेवण्यात येऊ नयेत असा प्रघात मी पडला. मौलाना, महात्मा, पंडित, शेख, सय्यद, मुनशी, मौलवी आणि अलीकडे श्रीयुत आणि श्री व त्याचबरोबर मिस्टर आणि एस्क्वायर या पदव्यांचा इतका भरमसाट उपयोग करण्यात येतो की, त्यांना सरसकट चाट देऊन एक नवा पायंडा पाडावा असा माझा बेत होता. पण त्यात मला यश मिळावयाचे नव्हते. महंमदअलींनी तावातावाने मला एक तार केली व अध्यक्ष म्हणून असे बजाविले की, पूर्वीचीच प्रथा चालवण्यात यावी, व विशेषतः गांधीजींना लिहिताना महात्मा असाच त्यांचा उल्लेख करण्यात यावा !

दुसरा नित्य वादविवादाचा विषय म्हणजे सर्वशक्तिमान ईश्वर. काँग्रेसच्या ठरावातदेखील कोठून तरी ईश्वराचा उल्लेख घुसडण्याची महंमद-अलींना विलक्षण सवय होती ! तो उल्लेख प्रार्थनेच्या अथवा कृतज्ञतेच्या स्वरूपाचा असे. मी अशा वेळी विरोध केला की माझ्या पाखंडीपणाबद्दल ते माझ्यावर ताशेरा झाडीत असत. अध्यक्षपदाचे एक वर्ष संपल्यावर महंमद-अली काँग्रेसपासून दूर सरकले, किंवा त्यांच्या धाटणीने बोलावयाचे झाल्यास काँग्रेस त्यांच्यापासून दूर सरकली ! त्यांची सरतेशेवटची भेट लाहोरला १९२९ च्या अधिवेशनात झाली. त्यांनी मोठ्या गंभीरपणे मला बजावले, "हे पाहा जवाहर, मी तुला सूचना देऊन ठेवतो : आत्ताचे हे तुझे सहकारी पुढे तुला एकट्याला सोडून जातील; संकटकाळी तुला ते सोबत करणार

नाहीत. काँग्रेसमधील तुझे स्वतःचेच लोक तुला फासावर चढवतील; याद राख!" किती भीतिप्रद भविष्य आहे हे!

# वडील आणि गांधीजी ८

१९२४ च्या सुरुवातीला गांधीजींच्या जिवावरील दुखण्याची बातमी एकाएकी पसरली. तुरुंगातून त्यांना लगेच रुग्णालयात नेण्यात येऊन त्यांच्या-वर शस्त्रक्रिया करण्यात आली. काळजीने सारा हिंदुस्थान काळवंडला होता. श्वासही न टाकता भयचकित मनाने आम्ही बातमीकडे डोळे लावून बसलो होतो. संकट निभावून गेले. काही ठराविक मित्रांना भेटण्याची त्यांना परवानगी देण्यात आली होती. वडिलांनी व मी त्यांची रुग्णालयात भेट घेतली. रुग्णालयातून त्यांना परत तुरुंगात नेण्यात आले नाही. प्रकृती सुधारत असताच उरलेली शिक्षा सरकारने रद्द केली व त्यांना सोडून दिले. सहा वर्षांच्या शिक्षेपैकी त्यांनी दोन वर्षे भोगली होती. नंतर प्रकृति-स्वास्थ्यासाठी ते मुंबईशेजारी जुहू येथे जाऊन राहिले.

आमचे सर्व कुटुंबच जुहूला गेले व तेथेच समुद्रकाठी एका लहानशा झोपडीत आम्ही राहिलो. तेथे काही आठवडे आमचा मुक्काम होता. किती तरी दिवसांनी विश्रांतीचे पोटभर सुख मला व्यावयास सापडले. पोहणे, पळणे व वाळवंटात घोडदौड करणे यांची हौस मी फेडून घेतली. पण गांधीजींबरोबर विचारविनिमय करणे हा आमचा मुख्य उद्देश होता. त्यांना स्वराज्यपक्षीयांची भूमिका समजावून देऊन त्यांची सक्रिय सहानुभूती मिळ-वता आली नाही, तर निदान त्यांचा आशीर्वाद तरी आपल्या कार्याला मिळवावा, अशी वडिलांची मनीषा होती. माझ्या मनात घर करून सलत राहिलेल्या काही प्रश्नांच्या बाबतीत त्यांच्याकडून खुलासा करून घ्यावा अशी माझीही इच्छा होती.

गांधीजींचे मन वळवण्याचा अथवा त्यांना आपले म्हणणे अंशतः तरी पटवून देण्याचा स्वराज्यपक्षीयांचा हेतू जुहू येथे तडीस गेला नाही. मोठ्या

मित्रत्वाची बोलणी झाली व वागणूकही मोठ्या सौजन्याची राहिली. परंतु तडजोड कोणत्याही प्रकारे होऊ शकली नाही. मीही निराश होऊनच परतलो. कारण, माझ्या एकाही शंकेचे निरसन गांधीजींना करता आले नाही. त्यांच्या सवयीप्रमाणे भविष्यकाळात दूरवर पाहावयास अथवा चिरस्वरूपाचा कार्यक्रम आखून द्यावयास ते तयार नव्हते. धीमेपणाने जनसेवा करीत असावे, कॉंग्रेसच्या विधायक व सामाजिक सुधारणाविषयक कार्यक्रमाच्या प्रचाराचे काम करावे, व चढाईच्या कार्यक्रमास अनुकूल अशा वेळेची मार्गप्रतीक्षा करीत राहावे, हे गांधीजींच्या मते आमचे काम.

१९२४ मध्ये काही काळ खंड पडल्यानंतर पुन्हा वडिलांची व गांधीजींची दिलजमाई होऊन त्यांचे संबंध अधिकच दृढ झाले. त्यांच्यामध्ये कितीही मतभेद असला, तरी एकमेकांविषयी परस्परांच्या मनात आत्यंतिक आदर व आपलेपणा वसत होता. काय म्हणून त्यांना इतका आदर वाटे? गांधीजींचे निवडक लेख "विचार-प्रवाह" या नावाने संग्रहित करण्यात आले होते, त्या पुस्तकाला वडिलांनी लिहिलेल्या प्रस्तावनेवरून या प्रश्नाचा किंचित उलगडा होतो. ते म्हणतात :

"संतांबद्दल व अतिमानवांबद्दल मी पुष्कळ आख्यायिका ऐकल्या आहेत; पण त्यांची भेट होण्याचे भाग्य मला लाभलेले नाही, व ते अस्तित्वात असतील की नाही याविषयीदेखील मला शंकाच आहे, हे कबूल केले पाहिजे. कर्तबगार माणसे व पुरुषार्थ यांच्यावर मात्र माझा विश्वास आहे. या पुस्तकात ग्रथित झालेले 'विचार-प्रवाह' एका मनुष्याच्या अंतःकरणात उदित झालेले आहेत व त्याच्यामध्ये पुरुषार्थाचे पाणी खळाळत आहे. मानवी स्वभावाला भूषणभूत झालेल्या दोन भावनाविशेषांचा—श्रद्धा व सामर्थ्य यांचा—आविष्कार त्यांत पाहावयास सापडतो..."

त्यांना प्रामुख्याने हीच गोष्ट सांगावयाची होती की, संत अथवा महात्मा म्हणून नव्हे, तर थोर पुरुष म्हणून आपणाला गांधीजींबद्दल आदर वाटतो. उन्नत व कणखर अशी त्यांची स्वतःची वृत्ती असल्यामुळे गांधीजींच्या कणखर व तेजस्वी वृत्तीचे त्यांना कौतुक वाटत असे. या दुबळ्या शरीराच्या माणसाचे मन पोलादासारखे आहे. कितीही मोठ्या शारीरिक शक्तीला न जुमानणाऱ्या काळवथरी दगडाप्रमाणे ते घट्ट आहे हे उघड दिसत होते.

मनुष्यनिर्मित वस्तूंमधील सौंदर्य अथवा कला पारखण्याची शक्ती गांधीजींच्या अंगी फारच थोडी होती. नैसर्गिक सौंदर्याचे मात्र ते कौतुक करीत. ताजमहाल म्हणजे जबरदस्तीने राबवण्यात आलेल्या मजुरांच्या घामाचे घनीभूत स्वरूप, याहून त्याची मातब्बरी नाही, असे त्यांना वाटे. त्यांची सुवासाबद्दलची अभिरुचीही फार माफक असे. तथापि, जीवनकलेचे तंत्र त्यांनी आपल्या परीने हुडकून काढले होते; व आपल्या जीवनाला एखाद्या कलाकृतीची प्रमाणबद्धताही प्राप्त करून दिली होती. त्यांची प्रत्येक हालचाल अर्थपूर्ण व निर्दोष अशी असे, व त्यात एक विशिष्ट चारुता प्रत्ययास येई. खडबडीतपणाचा, तीक्ष्णपणाचा लवलेशही त्यांच्यापाशी नव्हता. मध्यमवर्गात भरपेट सापडणाऱ्या हीन व सवंग अभिरुचीचा मागमूसही त्यांच्या अंगी दिसत नसे. मनःशांतीचा जो दिवा त्यांना गवसला, त्याच्या दिव्य तेजाची पखरण त्यांनी इतरांवर केली व त्याच्या उजेडाने उजळलेल्या आयुष्याच्या नागमोडी मार्गावर मोठ्या निश्चयाने व निर्भयतेने ते आपली पावले टाकीत राहिले.

माझ्या वडिलांची स्थिती किती भिन्न होती! पण त्यांच्याही ठिकाणी व्यक्तिमत्त्वाच्या सामर्थ्याची आणि अंतःकरणाच्या ऐश्वर्याची कळा होतीच. कोणत्याही समारंभास ते उपस्थित असले की त्यातले प्रमुख स्थान त्यांच्याकडे यावयाचेच. त्यांच्या अंगी नम्रता नव्हती, सौम्यपणाही नव्हता. आपल्याहून भिन्न मताच्या लोकांना गांधीजी सामोपचाराने वागवीत, तसे वडिलांनी कधी केले नाही. जाणूनबुजून ते चढेल वृत्तीने वागत. त्यामुळे त्यांच्याविषयी एक आत्यंतिक निष्ठा तरी अथवा आत्यंतिक वैरभाव तरी निर्माण होत असे. त्यांच्यावर एक लोभ तरी करावा अथवा त्यांच्याशी वैर तरी साधावे! रुंद कपाळ, घट्ट मिटलेले ओठ आणि करारीपणाची निदर्शक अशी हनुवटी यांनी युक्त असा त्यांचा चेहरा, इटलीतील वस्तुसंग्रहालयात ठेवलेल्या रोमन सम्राटांच्या चेहऱ्याप्रमाणे दिसत असे. विशेषकरून वृद्धापकाळी चकचकीत पांढऱ्या शुभ्र केसांचा थर सर्व डोक्यावर पसरल्यावर—माझ्याप्रमाणे त्यांना टक्कल पडले नव्हते—त्यांच्या ठिकाणी जी एक भव्यता व आचारगौरव दृग्गोचर होई, तो हल्लीच्या जगात दुर्मिळ होत चालला आहे. तसा

आचारगौरव व तशी धीरवृत्ती दृष्टीस पडेल का, म्हणून मी चोहीकडे पाहात असतो, पण व्यर्थ !

मासा पाण्यात वावरतो तितक्या सहजतेने वडील असेंब्लीत वागत असत. त्यांच्या कायदेशीर बुद्धीला कायदेमंडळाची हवा मानवे. कायदेमंडळातील डाव-प्रतिडाव त्यांना चांगले अवगत होते. आपल्या पक्षात ते कडक शिस्त राखीत व इतर पक्षांचे व व्यक्तींचे मन वळवून ते प्रसंगी साहाय्यही मिळवीत असत. पण लवकरच खुद्द पक्षातील लोकांनीच भानगडी उपस्थित केल्या ! प्रारंभी प्रारंभी स्वराज्यपक्षाला नाफेरवाल्यांशी झगडावे लागत होते, तेव्हा कित्येक अनिष्ट माणसे पक्षाची शक्ती वाढावी म्हणून काँग्रेसमध्ये सामील करून घेण्यात आली ! या लोकांमुळे प्रथमपासूनच पक्ष कमजोर बनला. कायदेमंडळात दररोज दुसऱ्या नेमस्त गटाशी मिळते घेणे आवश्यक होऊन बसले. स्वराज्यपक्षाचा पीळ ढिला पडत चालला; माळेतला एक एक मणी ओघळून जाऊ लागला. काही स्वराज्यपक्षीय मंत्री झाले, काहीजण प्रांतिक सरकारच्या कार्यकारी मंडळात गेले, काहीजणांनी एक सवता सुभा थाटून ते स्वतःला प्रतिसहकारवादी म्हणवून घेऊ लागले ! सर्वस्वी भिन्न परिस्थितीत लोकमान्य टिळकांनी हा शब्दप्रयोग उपयोगात आणला होता. त्याचा नवा अर्थ ‘ संधी आली की नोकरी पत्करा व त्यातच समाधान माना ’ असा करण्यात आला !

१९२४ च्या डिसेंबरात बेळगाव येथे जे काँग्रेस-अधिवेशन भरले, त्याचे गांधीजी अध्यक्ष होते. गेली कित्येक वर्षे काँग्रेसचे महाध्यक्ष बनून राहिलेल्या गांधीजींना काँग्रेसचे अध्यक्ष करणे म्हणजे थोडा विडंबनाचाच प्रकार होता ! त्यांचे अध्यक्षीय भाषण मला आवडले नाही. मला ते मुळीच स्फूर्तिदायक वाटले नाही. गांधीजींनी सांगितल्यावरून नव्या वर्षासाठी ऑ. इं. काँ. कमिटीच्या चिटणीसाच्या जागी माझी निवड झाली. मी म्हणजे काँग्रेसचा मिराशी चिटणीस बनत चाललो होतो ! माझ्या इच्छेची कोणी पर्वाच करीत नसे !

हिंदु-मुसलमानांतील संबंध (विशेषत: उत्तर हिंदुस्थानात) बिघडू लागले होते. मोठमोठ्या शहरांतून दंगे घडून आले व क्रौर्य आणि पाशवी वृत्ती यांचा कळस झाला! संतापाच्या व अविश्वासाच्या वातावरणातून भांडणाचे असे नवीन मुद्दे उपस्थित झाले, की जे पूर्वी कोणाच्या ऐकिवातही नसतील! पूर्वी बकरीदच्या दिवशी गोवधाच्या प्रश्नावरून अनेकदा तंटे उपस्थित होत. आता तंट्याचे एक नवीनच मूळ उपस्थित झाले, ते म्हणजे मशिदीपुढील वाद्यवादन. प्रार्थनेत व्यत्यय आणणारे वादन अगर दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा ध्वनी मुसलमानांना खपेनासा झाला.

एकमेकांच्या सलोख्याने व विचारविनिमयाने जे प्रश्न सुटावयाचे, त्यांना उग्र स्वरूप प्राप्त व्हावे व त्यापासून दंगे उत्पन्न व्हावेत, ही मोठ्या नवलाची गोष्ट आहे. तथापि, धार्मिक भावना ही चीजच अशी आहे की, तिच्यावर तर्काची व विचारांची मात्रा चालत नाही; आणि एका गटाविरुद्ध दुसऱ्या गटाला चिथवावयाला तयार असा सत्ताधाऱ्यांचा पक्ष विद्यमान असला की आग लावण्याचे काम फार सोपे होते! हे जातीय तंटे सुरू झाल्याबरोबर मुसलमानांतील राजकीय प्रतिगामी पुढारी—जे असहकारितेच्या काळात मागे दडून राहिले होते ते—पुन्हा प्रामुख्याने चमकू लागले. त्या बाबतीत ब्रिटिश सरकारकडूनही त्यांना मदत झाली. जातीय मागण्यांचा विस्तार रोजच्या रोज अधिक फैलावत जाऊन त्यामुळे हिंदी स्वातंत्र्याच्या व राष्ट्रीय एकीच्या मुळावरच घाव घातला गेला! हिंदूंच्या वतीने पुढे आलेले जातीय पुढारी-सुद्धा राजकीय दृष्ट्या प्रतिगामी बुद्धीचेच होते व हिंदूंच्या हितरक्षणाच्या नावाखाली त्यांनी सरकारलाच मदत केली. काँग्रेस या वेळी पेचात सापडली होती. राष्ट्रीय भावनेचा आविष्कार तिच्यामार्फत होत असला व त्या भावनेचे ध्वनी काँग्रेसमध्ये उमटत असले, तरी जातिनिष्ठ भावनांचा परिणाम तिच्यावर झाल्यावाचून राहिला नाही. राष्ट्रीयत्वाच्या बुरख्याआड कित्येक काँग्रेसवाल्यांची जातिनिष्ठा दडून राहिली होती. परंतु काँग्रेसमधील पुढारी मात्र राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला बळकट धरून राहिले, व सर्वसाधारण

रीतीने कोणत्याही जातिनिष्ठ पक्षाचा कैवार त्यांनी घेतला नाही. साहजिकच दोन्ही टोकांना उभ्या राहिलेल्या जहाल जातिनिष्ठांकडून काँग्रेसचा निषेध होऊ लागला.

तिसऱ्या दशकाच्या मध्याच्या सुमाराला जातीय प्रश्न सोडविण्याकरता परस्परांत पुष्कळ बोलणे-चालणे व चर्चा झाली, आणि ऐक्य-परिषदाही भरल्या. त्यांत १९२४ मध्ये महंमदअलींनी दिल्ली येथे भरविलेली परिषद विशेष महत्त्वाची होती. गांधीजींनी केलेल्या एकवीस दिवसांच्या उपवासाचे वातावरण अद्यापि कायम होते. ह्या परिषदांतून पुष्कळ कळकळीचे व सद्बुद्धीचे लोक येत व एकी करण्याचा ते झटून प्रयत्नही करीत. काही सोज्ज्वळ ठरावही पसार होत. पण मुख्य प्रश्नाचे घोंगडे भिजत पडले होते, ते बाहेर निघेना. बहुमताने प्रश्न सुटणार नसून त्यासाठी एकवाक्यतेची जरुरी होती. पण आपल्याच म्हणण्याचा वेडा आग्रह धरणारे ज्वालामुखी दोन्ही पक्षांत असल्यावर ती साधावी कशी ? खरे म्हणजे पुष्कळ वेळा प्रमुख प्रमुख जातीय पुढाऱ्यांना एकी हवी आहे की नको, याचीच शंका वाटे !

तथापि, वास्तविक अडचणींची मुळे फार खोलवर गेलेली होती. बंगालमध्ये हिंदू जमीनदार व मुसलमान कुळे असा समाज असल्याकारणाने तेथे शेतकऱ्यांच्या चळवळी जातीय लढ्याच्या स्वरूपात पुढे आल्या. पंजाब व सिंधमध्ये श्रीमंत व सावकार लोकांत हिंदूंचाच मुख्यतः भरणा आहे, व ऋणको हे मुसलमान शेतकरी आहेत. तेथे कर्जाची पैन् पै वसूल करणाऱ्या सावकारांबद्दल शेतकऱ्यांच्या मनात जो डूक होता त्याचाही उपयोग जातीय तेढ वाढविण्याच्या कामी झाला. सर्वसाधारणतः मुसलमान लोक त्यातल्या त्यात दरिद्री असल्यामुळे मुसलमानांच्या जातीय नेत्यांनी निर्धनांत व धनिकांत जी विरोधवृत्ती असते तिचा उपयोग जातीय वैमनस्याचा विषवृक्ष जोपासण्याच्या कामी करून घेतला. जातीचे नाव पुढे केल्यामुळे काही प्रमाणात जनता त्यांच्या पाठीशी उभी राहिली व म्हणून ते बळास चढले ही गोष्ट खरी आहे. आर्थिक दृष्ट्या हिंदूंचे जातीय पुढारी हे शेठ-सावकारांचे व उद्योगधंदेवाल्यांचे प्रतिनिधी होते. त्यांना जनतेचे पाठबळ फार थोडे मिळाले; तिची फक्त सहानुभूती मात्र त्यांच्या बाजूस असे.

दिल्लीची ऐक्य परिषद संपते न संपते तोच अलाहाबादेस हिंदु-मुसलमानांचा एक दंगा झाला. दंग्याची लाट आमच्या दाराशी येऊन भिडल्यामुळे मनाला वाईट वाटले. दंगा का उद्भवला ते मला स्मरत नाही. मशिदीपुढे वाद्य-वादनास बंदी केली होती, तिचा निषेध म्हणून रामलीला बंद ठेवण्यात आली. आज आठ वर्षे झाली, रामलीलेचा उत्सव अलाहाबादेत झालेला नाही, व ज्या उत्सवात अलाहाबाद जिल्ह्यातले लाखो लोक आनंदाने भाग घेत असत, तो केवळ स्मृतिशेष होऊन बसला आहे ! सण हिंदूंचा, पण तो उघड्या मैदाना-वर साजरा होत असल्यामुळे मुसलमानांचीही तेथे गर्दी होई, व सगळीकडे उल्हास भरून राही. तो म्हणजे त्यांचा नाचण्या-बागडण्याचा दिवस. पण गेल्या आठ-नऊ वर्षांत अलाहाबादेतल्या मुलांच्या दृष्टीस काही तो सण पडला नाही ! आणि याचे कारण काय? तर क्षुल्लक भांडणे व मारामाऱ्या ! असले धर्म व असला धर्मवेडेपणा म्हणजे आनंदाच्या दुधात पडलेले मिठाचे खडे !

ही १९२५ सालची गोष्ट. त्याच वर्षीच्या हिवाळ्यात माझी पत्नी आजारी पडली. माझ्या पत्नीने शुश्रूषेसाठी स्वित्झर्लंडात जावे असा अभिप्राय डॉक्टरांनी व्यक्त केला. मलासुद्धा ही कल्पना पसंत पडली; कारण हिंदु-स्थानच्या बाहेर जाण्यासाठी मलाही काही तरी सबब हवीच होती ! माझे मन गढूळ होऊन गेले होते व पुढचा मार्गही स्पष्ट दिसत नव्हता. हिंदुस्थानपासून दूर अंतरावर राहिलो, तर वस्तुस्थितीचे अधिक चांगले दर्शन होईल व माझ्या मनाच्या कानाकोपऱ्यांतून घुटमळणारा अनिश्चयाचा अंधार नाहीसा होईल असे मला वाटले.

१९२६ मार्चच्या प्रारंभी आम्ही व्हेनिसला जाण्यासाठी निघालो. माझी पत्नी, मुलगी व मी मिळून आम्ही तिघेजण होतो. माझी बहीण व माझा मेहुणा रणजित एस्. पंडित त्याच बोटीने निघाले. त्यांचा युरोपला जाण्याचा बेत आमच्या आधी किती तरी दिवस निश्चित झाला होता.

तेरा वर्षांहून अधिकच काळ लोटल्यानंतर मी युरोपात पुन्हा पाऊल टाकले. महायुद्ध, क्रांती,—कल्पनातीत उलथापालथी यांनी खचून भरलेली तेरा वर्षे उलटून गेली होती. युद्धकालीन रक्ताच्या व अत्याचारांच्या समुद्रात माझ्या परिचयाच्या जुन्या जगाने जलसमाधी घेतली असून माझ्या स्वागता-साठी नवेच जग उभे होते. सहा-सात महिने युरोपात वास्तव्य होईल, फार

फार तर वर्षअखेर राहावे लागेल, अशी माझी कल्पना होती. पण तब्बल एक वर्ष नऊ महिने आमचा मुक्काम झाला.

हिवाळा सुरू झाला तसे हिवाळी खेळांत माझे मन रंगून गेले. पुढचे काही महिने तरी मला दुसरे-तिसरे सुचतच नव्हते. मला काही उद्योग राहिला नव्हता. बर्फावरील स्केटिंग मी पूर्वी केले होते, पण स्किइंगचा मला अभ्यास नव्हता. मला त्याची फारच चटक लागली. बरेच दिवसांपर्यंत त्याचा मला त्रास झाला, पुष्कळ वेळा साष्टांग नमस्कारही घालावा लागला, तरी मी त्याचा पिच्छा सोडला नाही. त्या खेळात माझे मन रंगून जाई.

जिनिव्हाला श्यामजी कृष्ण वर्मा आपल्या रुग्ण पत्नीसह एका घराच्या अगदी वरच्या मजल्यावर राहात असत. त्या वृद्ध पतिपत्नींच्या घरात कायमचे नोकरचाकर वगैरे कोणीच नसावे. बिऱ्हाडाच्या खोल्या अंधाऱ्या व कोंदट होत्या. हरएक वस्तूवर धुळीचा जाड थर बसलेला असे. त्या सर्व जागेवर औदासीन्याचे व वार्धक्याचे वातावरण इतके पसरले होते की, तेथे जिवंतपणाचा तोंडावळादेखील आगंतुक पाहुण्याप्रमाणे अनिष्ट वाटावा! त्यांच्या खोलीकडे जाणाऱ्या निःशब्द व अंधाऱ्या अशा वाटेने जाऊ लागले, की कोपऱ्याआडून मृत्यूची सावली दत्त म्हणून पुढे उभी तर राहणार नाही ना, असा विचार मनात येई! आणि त्या घराच्या बाहेर पडल्यावर मोकळा वारा अंगाला लागला की जिवाला सुटकेचा आनंद होत असे.

श्यामजी व त्यांची बायको यांचे आयुष्य एकान्तवासात व्यतीत होत होते. मुलेबाळे नाहीत, मित्रबांधव नाहीत, ओळखीदेखील नाहीत; मनुष्यांशी जवळ जवळ संबंधच नाही! पुरातन काळच्या अवशेषाप्रमाणे त्यांची अवस्था झाली होती. त्यांचा काळ संपला तरी ते हयात होते, असेच म्हटले पाहिजे! वर्तमान-काळाशी त्यांचे पटत नसे म्हणून जगाचा लोंढादेखील जणू काही त्यांना टाळून, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून वाहात चालला होता. पण केव्हा केव्हा त्यांच्या डोळ्यांत पूर्वीची ठिणगी लकाकत असे. त्यांच्यात व माझ्यात समान भूमी अशी कोणत्याच प्रकारची नसली, तरी त्यांच्याविषयी मला सहानुभूती व अनुकंपा वाटल्याशिवाय राहिली नाही.

मी दुसऱ्याही एका गृहस्थांचे नाव अनेकवार ऐकले होते. ते गृहस्थ म्हणजे राजा महेन्द्रप्रताप होत. त्यांना मी स्वित्झर्लंडात पहिल्यांदाच भेटलो.

ते फार आशावादी दिसले. त्यांचे विचार सदोदित नभोमंडळात विहार करीत असत. वस्तुस्थितीशी त्यांची पूर्ण फारकत झालेली होती ! बहुरूप्या-प्रमाणे असलेला त्यांचा वेष मी प्रथम पाहिला, तेव्हा मी जरा चकितच झालो. तिबेटच्या कडेपठारावर अथवा सैबेरियाच्या सखल प्रदेशात तो पोशाख शोभला असता. अर्धवट लष्करी असा त्यांचा पेहेराव होता. गुडघ्या-पर्यंत येणारे रशियन बूट त्यांनी घातले होते. त्यांच्या कोटाला मोटमोठे किती तरी खिसे होते, व सर्व खिशांत कागदपत्रे, फोटोग्राफ वगैरे वस्तू कोंबलेल्या होत्या ! जर्मन चॅन्सेलर बेथमान होलोवेग यांचे एक पत्र, सही केलेला कायसरचा फोटोग्राफ, तिबेटच्या लामाचे एक पत्र, व अशीच शेकडो भेंडोळी व छायाचित्रे त्यांतच ठेवलेली असत. त्यांच्या खिशांतून इतिहास-संशोधक मंडळाचे एक प्रदर्शनच होते म्हणा ना ! ते म्हणाले की, एकदा चीनमध्ये असताना महत्त्वाच्या पत्रांची एक पेटी गहाळ झाली; तेव्हापासून सगळी कागदपत्रे अंगावरच वागवावयाची असे मी ठरवून टाकले ! इतके खिसे त्यांना लागतात ते का, ह्याचा उलगडा अशा रीतीने झाला ! मध्य-युगीन अद्भुतरम्य कथेतील एखादे पात्र अथवा विसाव्या शतकात चुकून जन्मलेला डॉन क्विक्झोटच आपल्यासमोर उभा आहे, असे त्यांच्याकडे पाहिले की मनात येई ! पण त्यांच्या स्वभावात सरळपणा व कळकळ दिसून येई.

मादाम कामा ह्या पॅरिस येथे भेटल्या. त्या वृद्ध झाल्या होत्या. जवळ येऊन आपल्या चेहऱ्याकडे त्या अगदी निरखून पाहात व एकदम 'तुम्ही कोण ?' असे तुसडेपणाने विचारीत. बाई फार उग्र व भयंकर दिसायची ! त्या बहिऱ्या झाल्या असाव्यात. कारण त्यांच्या प्रश्नाला काहीही उत्तर दिले तरी त्याचा परिणाम कोणताच होत नसे ! इटलीमध्ये काही वेळा मौलवी ओबीदुल्लांची भेट झाली. ते चलाख, म्हणजे जुन्या तऱ्हेच्या राजकीय कार-स्थानांच्या कामात चलाख दिसले. आधुनिक जगाची त्यांना ओळख नव्हती. "हिंदुस्थानच्या संयुक्त घटने"ची त्यांनी एक योजना आखली होती. त्यात जातीय प्रश्न व्यवस्थित रीतीने सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसला. इस्तंबूल-मधील आपल्या कामगिरीची हकीगत त्यांनी सांगितली. पण मला त्यात विशेष गोडी नसल्यामुळे मला तिचे स्मरण राहिले नाही. बरकत-उल्ला

नावाचे दुसरे एक मौलवी होते; पण ते अगदी निराळ्या सदरातले. माझी–त्यांची भेट प्रथम बर्लिन येथे झाली. गृहस्थ वृद्ध, मोठे रसाळ, अति उत्साही व कोणालाही हवेसे वाटतील असे होते. स्वभाव जरा भाबडाच; फारशी बुद्धिमत्तेची देणगी नाही; पण नवे विचार जाणून घेण्याची, नवे जग समजून घेण्याची त्यांची तयारी होती. आम्ही स्वित्झर्लंडमध्ये असताना १९२७ साली सॅन्फ्रान्सिस्को येथे ते वारल्याची बातमी ऐकून मला वाईट वाटले.

महायुद्धकालीन गटांपैकी पुष्कळसे लोक बर्लिनला राहात असत. ह्या हिंदी लोकांपैकी पुष्कळजण बैठे मध्यमवर्गीय उद्योग करीत होते. क्रांतिकारक वृत्ती त्यांच्यात मुळीसुद्धा उरलेली नव्हती व ते राजकारणात यत्किंचितही लक्ष घालीत नसत. १९१४ साली त्यांच्यापैकी बहुतेकजण जर्मनीतील निरनिराळ्या विश्वविद्यालयांतून शिकत होते. महायुद्धाला तोंड लागल्यानंतर आणखी काही जागृत क्रांतिवादी हिंदी लोक स्वित्झर्लंडच्या वाटेने जर्मनीत उतरले. ह्या लोकांनी एक समिती बनवून हरदयाळांना पाचारण केले. असे दिसते की, जर्मन परराष्ट्रीय खात्याने त्यांच्याबरोबर तहनामाही केलेला होता. जय झाला तर हिंदुस्थानचे स्वातंत्र्य आपण मान्य करू, असे वचन व इतरही काही अटी त्या तहनाम्यात नमूद करण्यात आल्या. सरकार या समितीचा सर्व प्रकारे मान–इतमाम ठेवीत असे व तिच्या प्रतिनिधींना तर जवळ जवळ परराष्ट्रीय वकिलांच्या दर्जाने वागविण्यात येई.

या गटातील अननुभवी तरुण माणसांना अशा प्रकारचे महत्त्व एकाएकी प्राप्त झाल्यामुळे त्यांपैकी काहीजण जरा शेफारल्याप्रमाणे वागू लागले. त्यापैकी पुष्कळांना साहसाची कामे करावी लागली व पुष्कळदा त्यांच्यावर जिवावरचे प्रसंगही गुदरले. पण महायुद्धाच्या उत्तरकाण्डात त्यांचे महत्त्व कमी कमी होत जाऊन सरकार त्यांच्याकडे दुर्लक्ष करू लागले. महायुद्ध संपले व त्याचबरोबर या समितीचे वैभवही संपले. त्यांच्या सर्व आशा भग्न झाल्या. नंतरच्या जीवनात काही गोडी उरली नाही. आता वेळ अशी आली की, चारचौघांसारखे पोटभरू जीवनही महाग झाले. त्यांना हिंदुस्थानची वाट बंद झाली होती. तो मोठा कठीण प्रसंग होता. ते कोणत्याच राष्ट्राचे नागरिक राहिले नाहीत ! जर्मनीच्या बाहेर प्रवास करणे कठीण होत असे व

जर्मनीत राहावे तर तेथेही अनेक अडचणी येत. सन १९३३ च्या सुरुवातीला नाझी सत्ता प्रस्थापित झाली व तेव्हापासून त्यांच्या दुर्दैवात भर पडली. जर्मनीतील युद्धकालीन संघापैकी एक प्रमुख गृहस्थ आम्हाला बर्लिन येथे भेटले. त्यांचे नाव चंपकराम पिलाई. दुसरे गृहस्थ म्हणजे वीरेन्द्रनाथ चट्टोपाध्याय. हिंदुस्थानातील एका प्रसिद्ध घराण्यांपैकी ते एक होते. लोकांत ते चट्टो या नावाने ओळखले जात. अतिशय कर्तबगार व अतिशय गोड अशी ती व्यक्ती होती. त्यांची नेहमी ओढघस्त स्थिती असे. कपडे फाटके असत व पुष्कळ वेळा त्यांना एक वेळच्या जेवणापुरते पैसे मिळण्याचीही पंचाईत पडे. मी हॅरो येथे गेलो, तेव्हा ते ऑक्सफर्डला शिकत होते. तेव्हापासून ते हिंदुस्थानात आलेच नाहीत.

परदेशांत मला जे राजकीय निर्वासित भेटले, त्यांच्याबद्दल माझे विशेष चांगले मत बनले नाही, हे कबूल केले पाहिजे. फारच थोड्यांची नावे आपणाला ऐकून तरी माहिती असतील. बाकीचे हिंदुस्थानी जगातून पार नष्ट झाले असून ज्या देशबांधवांच्या भल्यासाठी त्यांनी खटपट केली, त्यांना त्यांची आठवणही उरलेली नाही ! जी माणसे मला भेटली, त्यांपैकी दोनच व्यक्ती विशेष बुद्धिमत्तेच्या अशा वाटल्या. एक वीरेन्द्र चट्टोपाध्याय व दुसरे एम्. एन्. रॉय. रॉय यांची मॉस्को येथे फक्त अर्धा तासच भेट झाली. त्या वेळी ते प्रमुख कम्युनिस्ट समजले जात. नंतर त्यांचा कम्युनिझम, कट्टर कम्युनिझमहून जरा निराळा झाला.

१९२६ च्या अखेरीस एक भयंकर दुःखद प्रसंग घडून येऊन सर्व हिंदुस्थानभर भीतियुक्त तिरस्काराची एक प्रचंड लाट उठली. जातीय भावना वेळ-प्रसंगी किती हिडिस स्वरूप धारण करते, ही गोष्ट त्या प्रसंगाने स्पष्ट झाली. एका धर्मवेड्या मुसलमानाने स्वामी श्रद्धानंदांचा ते बिछान्यावर पडले असताना खून केला ! गुरख्यांच्या संगिनीपुढे आपली छाती उघडी करून जो वीरपुरुष गोळ्यांचा वर्षाव झेलण्यास तयार झाला, त्याला असे मरण यावे अं ! सुमारे आठ वर्षांपूर्वी एक आर्यसमाजी पुढारी म्हणून दिल्लीच्या सुविख्यात जुम्मा-मशिदीच्या व्यासपीठावरून हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याची व हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची घोषणा ह्याच पुरुषाने केली होती. त्या वेळी अफाट श्रोतृसमुदायाने ‘ हिंदु—मुसलमान की जय ’ अशा

आरोळ्यांनी त्यांचे स्वागत केले व बाहेर रस्त्यावर आपले रक्त एकत्र सांडून त्या घोषणेची पूर्णता केली. पण आता स्वतःच्या देशबांधवांकडून मारले गेलेले तेच स्वामी श्रद्धानंद मृत्युशय्येवर पहुडले होते !

भगव्या वस्त्रांनी मंडित व वृद्धापकाळाच्या दराऱ्यापुढे यत्किंचितही न वाकलेला असा त्यांचा भव्य आणि थोराड बांधा, तेजाने धगधगणारे त्यांचे डोळे व कधी कधी इतरांची दुर्बलता पाहून त्रासिकपणाने व संतापाने किंचित काळ क्रुद्ध भासणारी त्यांची ती चर्या, हे त्यांचे चित्र मला किती स्पष्टपणे आठवत आहे ! अजूनही किती वेळा तरी त्यांची प्रतिमा माझ्या डोळ्यांसमोर उभी असल्याचा मला भास होतो !

१९२७ च्या उन्हाळ्यात माझे वडील युरोपमध्ये आले. मी त्यांना व्हेनिस येथे भेटलो. नंतर कित्येक महिनेपर्यंत आम्ही एके ठिकाणीच राहात होतो. वडील, माझी पत्नी, माझी धाकटी बहीण व मी, असे सर्वजण सोव्हिएट रशियाच्या दहाव्या वाढदिवसाच्या समारंभासाठी नोव्हेंबर महिन्यात मॉस्को येथे गेलो. मॉस्कोत आम्ही फक्त तीन किंवा चारच दिवस मुक्काम केला. मॉस्कोला जाण्याचेसुद्धा अगदी शेवटच्या क्षणी ठरले. पण आम्ही गेलो त्याचा आम्हांला फारच आनंद झाला. कारण तेथे जे काही अल्पस्वल्प पाहावयाला सापडले, तेसुद्धा फार महत्त्वाचे होते. नव्या रशियासंबंधी आम्हाला विशेष बोध झाला नाही. आणि इतक्या थोड्या दिवसांच्या भेटीत तो होणेही शक्य नव्हते. पण येथील सर्वच सोव्हिएट व सांघिक कल्पना माझ्या वडिलांना आजिबात नवीन अशा वाटल्या. त्यांचे सगळे शिक्षण कायद्याच्या व सनदशीर राजकारणाच्या चौकटीत झालेले असल्यामुळे त्या चौकटीतून स्वतःची सुटका करून घेणे त्यांना फार अवघड होत असे. पण मॉस्को येथे पाहिलेल्या दृश्यांचा त्यांच्या मनावर खूपच परिणाम झाला.

## लाठीचा प्रसाद ! १०

मी युरोपहून परतलो तेव्हा माझे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य उत्तम प्रकारचे होते. माझ्या उत्साहाला व चैतन्याला बहर आला असून मनातील विरोधाच्या व वैकल्याच्या भावनांचा कोलाहल शांत झाल्यामुळे काही काळ तरी चित्त प्रसन्न झाले होते. माझी दृष्टी फाकून केवळ राष्ट्रवाद हा खात्रीनेच अपुरा व संकुचित आहे असे वाटू लागले. राजकीय स्वातंत्र्य अवश्यमेव पाहिजे ह्यात शंका नाही; पण योग्य स्थळाकडे नेणारी एक वाट, एवढेच तिचे महत्त्व. सामाजिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय आणि समाजाचे व शासन-यंत्राचे स्वरूप समाजवादानुसारी बनविल्याशिवाय देशाचा अगर व्यक्तीचा फारसा उद्धार होणे अशक्य आहे, असे वाटू लागले. जागतिक व्यवहाराविषयी मला अधिक स्पष्ट कल्पना आली व सदोदित बदलणाऱ्या आधुनिक जगाचे मर्म मला जास्त चांगल्या तऱ्हेने समजू लागले.

मद्रासला पाय ठेवतो तोच राजकारणाच्या चक्रात मी गुरफटलो. स्वातंत्र्य, युद्ध-संभाव्यता व साम्राज्यविरोधी लीग यांच्या बाबतीत वर्किंग कमिटीपुढे मी ठरावांचे एक भेंडोळेच नेऊन ठेवले ! त्यांपैकी बहुतेक सर्वांचा स्वीकार होऊन वर्किंग कमिटीचे अधिकृत ठराव म्हणून ते मांडण्यात यावेत असे ठरले, व खुल्या अधिवेशनात ते ठराव मांडण्याचे काम माझ्यावर सोपवण्यात आले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्यांपैकी सर्व ठराव जवळजवळ एकमताने मंजूर झाले. स्वातंत्र्याच्या ठरावाला बेझंटबाईंनीसुद्धा पाठिंबा दिला. गांधीजी त्या वेळी मद्रासलाच होते. ते अधिवेशनाला हजर राहिले, परंतु धोरण आखण्याच्या कामी त्यांनी भाग घेतला नाही. तथापि, त्यांचा सल्ला मात्र नेहमी घेण्यात येई. त्यांना कळविल्याशिवाय सहसा कोणतीच महत्त्वाची गोष्ट घडत नसे. मी कॉंग्रेसपुढे मांडलेले ठराव त्यांच्या पसंतीला कितपत उतरले ते मला माहिती नाही; पण असे वाटते की त्यांना ते मान्य झाले नसावेत. ठरावांतील भाषा नव्हे, तर त्या ठरावांत व्यक्त होणारा दृष्टिकोण व ठरावांची एकंदर घडण हीच त्यांना नापसंत

वाटली असावीत. तथापि, कोणत्याही प्रसंगी ठरावांवर त्यांनी प्रतिकूल टीका केली नाही.

मी पुन्हा एकवार कॉंग्रेसचा चिटणीस झालो. त्याला वैयक्तिक कारणे होती. कॉंग्रेसचे त्या वर्षीचे अध्यक्ष डॉ. अन्सारी ह्यांचा व माझा दाट स्नेह होता. शिवाय, माझे बरेचसे ठराव पास झालेले असल्याकारणाने ते तडीला पोचवण्यासाठी काम करणेही अवश्य झाले होते. कॉंग्रेस संदेहात पडलेली असून ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत ती गोते खात होती. माझी मनीषा अशी की, हा लेखक नेमस्त वृत्तीच्या बिंदूकडे झुकू लागला तर आपण त्याला प्रतिरोध करावा, व स्वातंत्र्याच्या ध्येयापासून त्याला चळू देऊ नये.

१९२८ साल राजकीय घडामोडींनी समृद्ध असे होते. सर्व देशभर खूप धामधूम चालू होती. काही एक नवी प्रेरणा लोकांना पुढे ढकलीत होती. अगदी निरनिराळ्या अशा गटांत एकाच वेळी काही तरी नवीन चैतन्य दृष्टोत्पत्तीस येऊ लागले होते. मी कित्येक महिने देशाबाहेर होतो त्या काळात हा बदल हळूहळू होत गेला असावा व तो परत आल्यावर साकल्याने माझ्या दृष्टीस पडला असावा. १९२६ च्या प्रारंभी हिंदुस्थान निश्चेष्ट व प्रतिकारशून्य असा दिसत होता, तोच देश १९२८ साली ताजातवाना, चैतन्यमय व उत्साहाने मुसमुसत असलेला असा दिसला. कारखान्यातील मजुरांत, शेतकऱ्यांत, मध्यमवर्गीय तरुणांत व सर्वसाधारणतः पांढरपेशांत, जिकडे तिकडे ह्या नव्या तेजोलहरींची चमक दिसून येत होती.

ट्रेड युनियन चळवळीची चांगली प्रगती झाली होती व सात-आठ वर्षांपूर्वीच प्रस्थापित झालेली अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेस सामर्थ्यवान व प्रातिनिधिक अशी संस्था बनली होती. तीत सामील झालेल्या संघांची संख्या व संघटना वाढली होती; इतकेच नव्हे, तर तिची विचारसरणी अधिकाधिक मूलग्राही व लढाऊ बनत चालली होती. संपांचे प्रमाण चढते होते व वर्गजागृतीची वाढ होत होती. गिरणी-मजूर व रेल्वे-मजूर यांच्या संघटना सर्वांत सरस होत्या. त्यातल्या त्यात अतिशय बलिष्ठ व अत्यंत पुढारलेल्या संघटना म्हणजे मुंबईच्या गिरणी-कामगार-युनियन व जी. आय. पी. रेल्वे-युनियन ह्या होत.

शेतकरीसुद्धा हातपाय हालवू लागला होता. संयुक्तप्रांत व विशेषतः

औंध भागात जागृती विशेष आढळत होती. गुजरातमध्ये शेतकरी व सरकार यांच्यामध्ये सारावाढीच्या प्रकरणी मोठाच लढा झुंपून राहिला होता. सरदार वल्लभभाई पटेलांच्या नेतृत्वाखाली चाललेला हा लढा बार्डोली-सत्याग्रह या नावाने ओळखला जातो. लढा अशा शर्थीने लढवला गेला की, सर्व हिंदुस्थानचे डोळे गुजरातकडे लागून राहिले होते. हिंदी शेतकऱ्यांच्या मनात 'बार्डोली' हा शब्द तेव्हापासून आशा, सामर्थ्य व विजय ह्यांचा निदर्शक बनून राहिला आहे. हिंदुस्थानात त्या साली दुसरी लक्षात भरण्यासारखी गोष्ट घडत होती, ती म्हणजे युवक-चळवळ. जिकडे तिकडे युवक-संघ प्रस्थापित होत होते व युवक-परिषदा भरत होत्या. त्यांत अनेक प्रकार होते. काही संघ अर्धेमुर्धे धार्मिक स्वरूपाचे होते, तर काहींनी क्रान्तीची विचारसरणी व तंत्र यांचा खल चालविला होता.

राजकारणापुरताच विचार केला, तर ते वर्ष सायमन-सप्तकावरील बहिष्कारामुळे व (बहिष्काराची विधायक बाजू असे जिला नामाभिधान देण्यात आले होते त्या) सर्वपक्षीय परिषदेमुळे गाजले. बहिष्कारात नेमस्त गटांनी काँग्रेसबरोबर सहकार्य केले व बहिष्कार पूर्णपणे यशस्वी झाला. जेथे जेथे सायमन कमिशन जाई, तेथे तेथे खवळलेला जनसमूह "सायमन, गो बॅक!" ह्या शब्दांनी त्याचे स्वागत करीत असे. या देशव्यापी बहिष्कारामुळे हिंदी जनतेच्या तोंडी सर जॉन सायमनचे नाव तर बसलेच, पण इंग्रजी भाषेतील दोन शब्दही तिला तोंडपाठ झाले!

काळ्या निशाणांचे व "गो बॅक"च्या आरोळ्यांचे स्वागत स्वीकारीत सायमन-कमिशनचा दौरा सुरूच राहिला. प्रसंगोपात्त पोलिस व जनता यांच्यात किरकोळ झटापटी होत. पण लाहोरला निकराचा प्रसंग येऊन ठेपला व लोकांच्या मनात संतापाची तिडीक उठली. लाहोर येथे सायमन-विरोधी मिरवणुकीच्या अग्रभागी लालाजी उभे होते. हजारो लोकांच्या शिरोभागी रस्त्याच्या कडेला ते उभे राहिले असता एका इंग्रज पोलिस-अधिकाऱ्याने त्यांच्यावर हल्ला चढवला व दंड्याने त्यांच्या छातीवर प्रहार केले. आमच्यापैकी मोठ्यांतला मोठा पुढारी, पंजाबातला सर्वश्रेष्ठ व अत्यंत लोकप्रिय पुरुष अशा प्रकारे अपमानित व्हावा ही पैशुन्याची परिसीमा आहे, असे आम्हांला वाटले! सर्व हिंदुस्थानभर व विशेषतः उत्तर हिंदुस्थानात

विषादाची घनदाट छाया पसरली. देशाच्या मोहऱ्यांचेसुद्धा रक्षण आम्हाला करता येऊ नये हा केवढा दुबळेपणा ! किती मुलुखावेगळा नादानपणा !

त्या मारहाणीमुळेच त्यांचे मरण जवळ ओढवले असे डॉक्टरांचे मत होते. शरीरावर मार पडत असताना त्यांना ज्या मानसिक यातना झाल्या, त्यांचा लालाजींवर फार मोठा परिणाम झाला असावा याबद्दल मला संशय वाटत नाही. स्वतःची मानहानी झाली म्हणून नव्हे, तर आपल्यावरील हल्ल्यामुळे देशाची जी मानहानी करण्यात येत आहे, तिचा विचार मनात येऊन त्यांना संताप व खेद वाटला असावा. ही राष्ट्रीय अपमानाची भावना जनतेच्या मनाला अंगाराप्रमाणे झोंबली. त्यांच्या मृत्यूमुळे दुःख होण्याऐवजी राग व चीड ह्या भावनाच मनात उद्भवल्या. त्यानंतर घडलेल्या प्रसंगांचे यथार्थ आकलन होण्यासाठी ही वस्तुस्थिती ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. त्या-वाचून भगतसिंग-प्रकरण व भगतसिंगाला उत्तर-हिंदुस्थानात मिळालेली असामान्य लोकप्रियता यांचे गूढ उकलणार नाही.

भगतसिंग लोकांचा प्यारा बनला, तो त्याच्या हिंसक कृत्यामुळे नव्हे; तर त्याने लाला लजपतरायांचे व राष्ट्राचे नाव राखले अशी लोकांची कल्पना झाली म्हणून. तो एक प्रकारे प्रतीक बनला. त्याच्या कृत्याचे लोकांना विस्मरण झाले, पण प्रतीक अवशिष्ट राहून थोड्या महिन्यांच्या अवधीत पंजाबातील सर्व शहरां—खेड्यांत व थोड्या कमी प्रमाणात सर्व उत्तर-हिंदुस्थानात त्याचे नाव दुमदुमू लागले. त्याच्यावर असंख्य कवने रचण्यात आली व त्याला इतकी लोकप्रियता मिळाली की माणूस आश्चर्याने थक्क व्हावा.

लालाजींवरील हल्ला व त्यांचा मृत्यू यांच्या योगाने सायमन-कमिशन-वरील बहिष्काराचा जोर मात्र अधिकच वाढला. कमिशन लखनौला यावयाचे होते व तेथील कॉंग्रेस कमिटीने त्याच्या "स्वागता"ची जय्यत तयारी केली होती. प्रचंड मिरवणुकी, सभा वगैरे गोष्टींची व्यवस्था कित्येक दिवस आधी करून ठेवण्यात आलेली होती. मी लखनौला गेलो, वाहतुकीला अडथळा येतो ह्या सबबीवर मिरवणुकींना बंदी करण्यात आली होती. ह्या बाबतीत तक्रारीला जागा राहू नये म्हणून आम्ही सोळा-सोळांचे गट करून सभेच्या जागी आड रस्त्याने पृथक्पणे जावयाचे ठरविले. कायद्याप्रमाणे पाहिले, तर हा हुकूम मोडण्याचाच एक प्रकार होता. कारण १६ इसम एक निशाण घेऊन निघाले

म्हणजे ती मिरवणूकच झाली. एका गटाचा मी नायक होतो, व पुष्कळ अंतर टाकून माझे सहकारी गोविंद वल्लभ पंत यांच्या नेतृत्वाखाली दुसरा एक गट येत होता. आम्ही सुमारे दोनशे यार्ड चालून गेलो. रस्त्यावर एकही माणूस दिसत नव्हता. इतक्यात पाठीमागून घोड्यांच्या टापांचा ध्वनी ऐकू आला. आम्ही वळून पाहिले, तो तीस-पस्तीस स्वारांची टोळी मोठ्या वेगाने आमच्यावर चाल करून येत होती. थोड्याच वेळात ते आमच्याशी येऊन भिडले व त्यांच्या हल्ल्यामुळे आमच्या गटाची पांगापांग झाली. तदनंतर आमच्या स्वयंसेवकांना मोठमोठ्या दंडुक्यांनी व लाठ्यांनी झोडपून काढण्यास घोडेस्वारांनी सुरुवात केली. तो मार चुकविण्यासाठी स्वयंसेवक स्वाभाविकपणे रस्त्याच्या कडेला सरकले. काहीजण तर बाजूच्या लहान दुकानांतूनही शिरले. त्यांचा पाठलाग करून त्यांना मार देण्यात आला. घोडेस्वारांचा हल्ला आपल्यावर येत आहे असे पाहताच स्वतःचे रक्षण करण्याची सहज-प्रेरणा माझ्याही मनात जागृत झाली. हल्ला पाहून धीर सुटला. परंतु दुसऱ्या कोणत्या तरी सहज-प्रेरणेने मला त्या विचारापासून परावृत्त करून तेथेच थांबवले असावे. अशा मनःस्थितीत पहिल्या हल्ल्याला तर मी तोंड दिले. पण नंतर रस्त्याच्या मध्यभागी मी एकटाच उभा आहे याची मला एकाएकी जाणीव झाली. माझ्यापासून काही यार्डांच्या अंतरावर निरनिराळ्या जागी स्वयंसेवकांना पोलिस पिटून काढीत होते. आपल्याकडे फारसे लक्ष जाऊ नये म्हणून मी अगदी आपोआप रस्त्याच्या बाजूला सरकू लागलो. पण पुनः मी थांबलो. मनातल्या मनातच थोडीफार प्रश्नोत्तरे झाली, व अशा रीतीने पळून जाणे नामुष्कीचे होईल असे मनाने ठरविले. हा सर्व प्रकार चार-दोन सेकंदांतच घडला; परंतु त्या वेळी मनात चाललेल्या ओढाताणीची व शेवटी झालेल्या निर्णयाची आठवण मला अगदी स्पष्टपणे राहिली आहे. माझ्या स्वाभिमानाला नामर्दाप्रमाणे पळून जाण्याची कल्पना रुचली नाही, म्हणूनच तशा प्रकारचा निर्णय मनाने घेतला असावा. परंतु शौर्य व भित्रेपणा यांच्यातील भेद किती सूक्ष्म होता ! कदाचित माझे पाऊल भित्रेपणाच्या घसरणीवरही पडले असते. मनाचा निश्चय झाला न झाला इतक्यात मी मागे वळून पाहिले, तो एक घोडेस्वार आपली लांब लाठी परजीत माझ्याकडे दौडत येताना दिसला.

'चालू दे तुझे काम' असे मी त्याला म्हणालो आणि माझे डोके जरा बाजूला वळविले. सहज-प्रेरणेनेच डोके व तोंड बचावण्यासाठी मी हा प्रयत्न केला. त्याने माझ्या पाठीवर दोन सणसणीत रट्टे लगावले. मला भोवळ आली व माझे सर्व शरीर थरथरू लागले. पण आश्चर्याची व समाधानाची गोष्ट अशी की, मी त्याही स्थितीत तसाच उभा राहिलो होतो ! लवकरच पोलिस दूर निघून गेले व आमच्यासमोरचा रस्ता त्यांनी अडवून धरिला. स्वयंसेवक पुनः एके ठिकाणी जमले. त्यांच्यापैकी कित्येकांची डोकी फुटून ते रक्तबंबाळ झाले होते. पंतही तुकडीसह आम्हाला येऊन मिळाले. त्यांनाही मार बसलाच होता. आम्ही सर्वजण पोलिसांच्या समोर बैठक मारून बसलो. सुमारे तासभर याप्रमाणे बसल्यावर अंधार पडला. एका बाजूला बडे बडे अधिकारी जमले होते, तर आमच्या बाजूला लाठीमाराची बातमी पसरू लागली, तसे लोकांचे प्रचंड समुदाय जमू लागले. अखेरीस आमच्या ठरा-विक रस्त्याने आम्हाला जाऊ देण्याचे अधिकाऱ्यांनी कबूल केल्यावर आम्हाला ज्या पोलिसांनी हल्ला करून झोडपून काढले होते त्यांच्याचबरोबर आम्ही पुढे गेलो.

इतर कशानेही झाली नसती इतकी जागृती लखनौमध्ये आदल्या दिवशी-च्या या प्रसंगाने झाली. सूर्य वर येण्यापूर्वीच हजारो लोक स्टेशनवर जमले. शहराच्या मोहल्ल्या-मोहल्ल्यांतून लहान लहान अशा असंख्य मिरवणुकी निघाल्या व कॉंग्रेस-कचेरीपासून मुख्य मिरवणुकीला प्रारंभ झाला. हजारो माणसे चारचारांच्या रांगा धरून चालली होती. आम्ही ह्या मुख्य मिरवणुकीत होतो. स्टेशनजवळ आल्यावर आम्हाला पोलिसांनी अडवले. स्टेशनच्या समोर अर्ध्या चौरस मैलाएवढे मोठे विस्तीर्ण पटांगण होते. ( नव्या रेल्वे स्टेशनची इमारत ह्याच जागेवर आहे. ) ह्या मैदानाच्या एका बाजूला आम्हाला कतार धरून उभे करण्यात आले आमची मिरवणूक दाखवलेल्या जागीच थांबली. रेटारेटी करून आम्ही पुढे घुसण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. पायदळ व घोडदळ यांची मैदानावर गर्दी झालेली होती. आमच्याविषयी सहानुभूती दाखवणाऱ्या बऱ्यांची गर्दी फुगू लागली व त्यांपैकी पुष्कळजण दोघा-दोघांच्या व तिघा-तिघांच्या गटांनी हळूच मैदानात सरकले. एकाएकी लांब अंतरावर हालचाल दिसू लागली. घोडदळाच्या किंवा स्वार—शिपायांच्या

दोन-तीन लांबलचक रांगा आमच्या बाजूला वेगाने येत होत्या. वाटेत मैदानावर रेंगाळणाऱ्या लोकांना मारपीट करीत अगर आपल्या हल्ल्या-खाली दडपीत ते दौडत निघाले होते. भरधाव सुटलेल्या त्या घोडेस्वारांचे दृश्य फार मनोहर दिसले. त्यात वाईट होते ते इतकेच की, वाटेतले बेसावध आणि निरुपद्रवी प्रेक्षक घोड्यांच्या टाचांखाली गवसून त्यांच्यावर दुःखद प्रसंग ओढवत होता. घोडदळाच्या रांगा पुढे निघाल्या व हे लोक तसेच मागे पडून राहिले. काहींना हालचालदेखील करता येत नव्हती व काही दुःखाने दुमडत, कळवळत होते. सर्व मैदानाचा देखावा एखाद्या रणक्षेत्रा-प्रमाणे दिसू लागला! पण तिकडे पाहण्यास अथवा विचार करण्यास आम्हाला सवड मिळाली नाही. घोडदळाची लाट आमच्या अंगावरच आली, व त्यांच्या पहिल्या रांगेची जवळ जवळ दौडती धडक मिरवणुकीच्या अग्र-भागी असणाऱ्या लोकांवर येऊन आदळली! आम्ही जागा सोडली नाही. आम्ही हटत नाहीसे पाहिल्यावर शेवटच्या क्षणाला घोड्यांचे लगाम खेच-ण्यात आले. त्यामुळे घोडे मागच्या पायांवर खडे होऊन त्यांचे पुढचे पाय आमच्या डोक्यावर अंतराळी थयथयू लागले! नंतर मारपिटीला सुरुवात झाली. लाठीचे व दंडुक्याचे तडाखे उडू लागले. पायदळ व स्वार दोघेही प्रहार करीत होते. वळवाच्या थेंबांसारखे सडासड घाव पडत होते. आदल्या दिवशीची माझ्या मनाची निश्चलता नाहीशी झाली. धरलेली जागा सोडा-वयाची नाही, शरण जावयाचे नाही, मागे फिरावयाचे नाही, एवढी एकच जाणीव मनात उरली. घावामुळे दृष्टी गढूळ होऊन एक प्रकारच्या मुक्या रागाने मन व्याप्त होऊन गेले, व परत घाव मारण्याची इच्छा बळावू लागली. समोरच्या पोलिस-अधिकाऱ्याला घोड्यावरून ओढून आपणच खोगिरात बसणे किती सोपे आहे असाही विचार मनात आला; पण शिस्त व शिक्षणाचा परिणाम नष्ट झाला नाही व फक्त चेहऱ्याचे रक्षण करण्या-व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही कारणास्तव मी हात वर उचलला नाही. शिवाय, आम्ही चढाई केली की भयंकर प्रसंग ओढवेल, आमच्याच असंख्य लोकांवर गोळीबाराने मरण्याची पाळी येईल, ही कल्पना मला होतीच.

किती तरी वेळ मार सहन केल्यानंतर—वस्तुतः थोडीशी मिनिटेच झाली

होती– आमची रांग पांगून न जाता हळूहळू मागे हटू लागली. त्यामुळे मी पुढे राहिलो, माझ्या कुशी उघड्या पडल्या. आणखी मार पडू लागला; इतक्यात मला कोणी तरी उचलून लांब नेले. मला ह्याचा फार राग आला. माझ्यावरच पोलिस तुटून पडत आहेत असा काही सहकाऱ्यांचा समज होऊन माझा अशा प्रकारे बचाव करण्याचे त्यांनी ठरविले असावे.

मूळ जागेच्या मागे सुमारे शंभर फुटांवर आम्ही पुन्हा रांग करून उभे राहिलो. पोलिसही मागे हटले व आमच्यापासून पन्नास फुटांच्या अंतरावर रांगेत उभे राहिले. ह्या सर्व बखेड्याचे आदिकारण जे सायमन-कमिशन, ते लांब अंतरावरून चोरट्याप्रमाणे निघून जाईतोपर्यंत आम्ही तेथे थांबलो. पण इतके करूनही त्यांच्या नशिबातील काळी निशाणे काही चुकली नाहीत ! नंतर लगेच कॉंग्रेस-कचेरीपर्यंत आम्ही पूर्ववत मिरवणूक घेऊन आलो व नंतर लोक घरोघर निघून गेले. वडील काळजी करीत होते, म्हणून मी त्यांच्याकडे गेलो.

# समाजवादाचे सूतोवाच ११

हिंदुस्थानात समाजवादी मते मीच प्रथम प्रतिपादन करू लागलो असे नव्हे. खरे बोलावयाचे तर त्या बाबतीत जरा मागासलेलाच राहिलो होतो. इतर अनेकांनी तो मार्ग झाडून साफ केला असला, तरी त्यावर मी मोठ्या कष्टाने एकेक पाऊल पुढे टाकीत चाललो होतो. विचारसरणीच्या दृष्टीने कामगार-चळवळ ही निःसंशय समाजवादी मताची होती; व बहुसंख्य युवक-संघांतही तीच विचारप्रणाली दिसून येत असे. युरोपातून मी जेव्हा १९२७ च्या डिसेंबरात परतलो, तेव्हा हिंदी वातावरणात समाजवादाचा अस्पष्ट दरवळ आधीच पसरलेला दिसला.

कॉंग्रेसमध्ये मोठ्या अधिकारावर असलेला मी एक प्रमुख कॉंग्रेसवाला असल्यामुळे माझ्या समाजवादी मतांना महत्त्व मिळाले. माझ्यासारखा

विचार इतरही काही प्रमुख काँग्रेसवाल्यांच्या मनात येऊ लागला होता. संयुक्तप्रांतीय काँग्रेस कमिटीत हा विचार विशेष फैलावत असून १९२६ सालीच आम्ही एक सौम्यसा समाजवादी कार्यक्रम आखण्याचा प्रयत्न केला. आमच्या प्रांतात जमीनदारी व तालुकादारी चालू असल्यामुळे आम्हाला जमिनीच्या प्रश्नालाच मुळारंभी हात घालणे प्राप्त झाले. वर्तमान पद्धती नाहीशी झाली पाहिजे आणि सरकार व जनता यांच्या दरम्यान मध्यस्थ राहता उपयोगी नाहीत, असे आम्ही जाहीर केले. असले विचार अवतीभोवतीच्या लोकांना अगदीच अपरिचित असल्यामुळे मोठ्या सावधगिरीने आम्हांला पावले टाकावी लागत होती.

१९२८ सालच्या अखेरीचे दिवस आले. कलकत्ता-काँग्रेसला थोडा अवधी उरला होता. तेथे वडील अध्यक्ष व्हावयाचे होते. स्वातंत्र्याच्या प्रश्नावर तडजोड करण्यास मी तयार नाही हे ठाऊक असल्यामुळे ते अस्वस्थ झाले होते. दोघांचे मार्ग भिन्न होऊ लागले होते. पूर्वीही अनेकवार तीव्र मतभेद होऊन भिन्न भिन्न राजकीय गटांत आम्ही सामील झालो होतो. परंतु त्यापूर्वी अगर नंतर केव्हाही मनावर इतका ताण पडलेला मला आठवत नाही.

कलकत्ता-काँग्रेसच्या आधी काही दिवस कोळशाच्या खाणीच्या केन्द्रस्थानी झरिया येथे 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस'चे अधिवेशन भरविण्यात आले. मी हजर राहून पहिल्या दोन दिवसांच्या कार्यक्रमात भाग घेतला. नंतर मला कलकत्त्याला जावे लागले. ही माझी पहिलीच ट्रेड युनियन काँग्रेस. शेतकऱ्यांतील व अलीकडे कामकऱ्यांतील माझ्या कार्यामुळे मला थोडीशी लोकप्रियता प्राप्त झाली असली, तरी ट्रेड युनियन काँग्रेसमध्ये मी नवखाच होतो. सुधारणावादी व क्रांतिकारक गटांमधील जुने भांडण तसेच पुढे चालू असल्याचे मला दिसून आले.

झरिया येथे क्रांतिवादी गटाकडे माझी सहानुभूती झुकत असली, तरी नवखा असल्यामुळे तेथील आपापसांतील झगडे पाहून मी हतबुद्ध झालो, व त्यांच्यापासून चार हात दूर राहण्याचे मी ठरविले. मी झरिया सोडल्या-नंतर ट्रेड युनियन काँग्रेसच्या वार्षिक निवडणुकी झाल्या व नव्या वर्षासाठी अध्यक्षस्थानी माझी निवडणूक करण्यात आली. हे वृत्त मला कलकत्ता येथे समजले. क्रांतिवादी गटाने त्याच जागेसाठी उमेदवार म्हणून एका कामगाराला

उभा केला होता. त्यावर मात करता यावी म्हणून नेमस्त गटाने माझे नाव पुढे केले. निवडणुकीच्या दिवशी मी झरिया येथे उपस्थित असतो, तर त्या कामगारासाठी मी माझे नाव खात्रीनेच मागे घेतले असते. एका नवख्या व बिगर कामगार माणसाला एकदम अध्यक्षपदावर नेऊन बसविणे, ही गोष्ट माझ्या दृष्टीने शिष्टपणाला शोभणारी नाही.

त्या साली पुष्कळच संप व मजुरांच्या चळवळी झाल्या. पुढील साली तोच प्रकार चालू राहिला. मुंबईच्या दरिद्री व लढाऊ कामगारांनी या संपात बिनीवरचे काम केले. बंगालच्या ज्यूट गिरण्यांतही एक मोठा सार्वत्रिक संप घडून आला. त्याचप्रमाणे जमशेदपूरच्या लोखंड-कारखान्यात व रेल्वेवरही संप झाले. जमशेदपूर येथील टिन प्लेटच्या कारखान्यातील संप फार दिवसपर्यंत मोठ्या शर्थीने लढविण्यात आला. जनतेची सहानुभूती या संपाला असताही कारखानदारांनी संपवाल्यांना दडपून टाकले.

१९२९ च्या मार्चमध्ये क्रांतिवादी गटांतील काही प्रमुख कार्यकर्त्यांना अटक करून सरकारने मजुरांच्या संघटनेवर एकाएकी एक जबरदस्त टोला लगावला. मुंबईच्या गिरणी कामगार-युनियनचे आणि बंगाल, संयुक्त प्रांत व पंजाब या प्रांतांतील मजुरांचे पुढारी पकडले गेले. त्यांपैकी काही शंभर टक्के कम्युनिस्ट होते, काही अर्धेकच्चे कम्युनिस्ट, तर काही केवळ कामगारसंघवादी होते. पुढे साडेचार वर्षे चालू राहिलेल्या मीरत-खटल्याचा प्रारंभ हा अशा प्रकारे झाला. मीरत-खटल्यातील आरोपींच्या बचावासाठी एक समिती स्थापण्यात येऊन माझ्या वडिलांची अध्यक्षस्थानी योजना करण्यात आली. डॉ. अन्सारी व इतर काही लोक सभासद होते; त्यांत मीही एक होतो. मीरत-समितीप्रमाणेच एम्. एन्. रॉयच्या व इतरांच्या बचावासाठी नेमलेल्या समित्यांवरही मी काम केलेले आहे. प्रत्येक प्रसंगी माझ्या पेशाच्या लोकांचा म्हणजे वकिलांचा लोभीपणा पाहून आश्चर्य करण्याची पाळी मजवर आली! १९१९ साली पंजाबमधील लष्करी कायद्याच्या खटल्याच्या वेळी मला पहिला जबरदस्त धक्का बसला. लष्करी कायद्याच्या खटल्यातील आरोपींतर्फे काम चालविण्यासाठी एका अतिशय प्रख्यात वकिलाने भरमसाट फीची मागणी केली. आरोपींपैकी एकजण तर वकील, म्हणजे त्याचा व्यवसाय-

बंधूच होता. पुष्कळांना कर्ज काढून व मालमत्ता विकून त्याच्या फीची भर करावी लागली ! यानंतर मला आलेले अनुभव तर यापेक्षाही खेदजनक आहेत. कामगारांपासून पैसा-पैसा जमवावा व वकिलांच्या नावाने अगडबंब रकमांचे चेक फाडून द्यावेत, ही गोष्ट मनाला असह्य होत असे. मीरत-कटातील आरोपींशी व्यवहार करण्याचे कामही सोपे नव्हते. आरोपी मंडळीत सात ऋषींची सात मते; व त्यांच्या बचावाच्या तऱ्हाही वेगवेगळाल्या ! परस्परांत मुळीच एकमत होत नसे. काही महिन्यांनी ही समिती विसर्जन करण्यात आली.

# मेघांचा गडगडाट १२

१९२९ सालचे कॉंग्रेसचे अधिवेशन लाहोर येथे व्हावयाचे होते. दहा वर्षांनी पंजाबात कॉंग्रेसचे आगमन होत होते; तेव्हा दहा वर्षांचे दहा पडदे बाजूला सारून लोकांची दृष्टी जणू काय १९१९ च्या जालियनवाला बागेच्या अपमानात बुडवून टाकणाऱ्या लष्करशाहीच्या, अमृतसर येथील कॉंग्रेसच्या व नंतर लवकरच सुरू झालेल्या असहकारितेच्या चित्रपटावर खिळून राहिली.

गांधीजी अजून राजकारणापासून अलिप्तच राहिले होते. नाही म्हणा-वयास कलकत्ता-कॉंग्रेसमध्ये त्यांनी जो काय भाग घेतला असेल तेवढाच. तथापि, सर्व घडामोडींकडे त्यांचे लक्ष असे. कॉंग्रेसचे पुढारी त्यांचा सल्लाही वारंवार घेत. खादी-प्रचारासाठी सर्व देशभर त्यांनी मोठमोठे दौरे काढले. त्यांनी लहानसहान शहरे व खेडीपाडीदेखील सोडली नाहीत. त्यांना पाहण्या-साठी अलोट जनसंमर्द लोटत असे. अशा प्रकारे सर्व हिंदुस्थानभर अनेक-वार हिंडून हिमालयापासून रामेश्वरापर्यंत व कराची ते कलकत्त्यापर्यंत पसर-लेल्या या अफाट भूभागाचा पूर्ण परिचय त्यांनी करून घेतलेला आहे. हिंदुस्थानचा त्यांच्याइतका प्रवास केलेली दुसरी एकही व्यक्ती विद्यमान असेल, असे मला वाटत नाही.

१९२९ च्या ऐन उन्हाळ्यात ते संयुक्तप्रांती आले होते. पण मी त्यांच्या-

बरोबर सदोदित राहात नव्हतो. राजकीय परिस्थितीला जोर चढत चालला असता खादीचे काम करीत राहणे दुय्यम दर्जाचे आहे, असे मानणारांपैकी मी एक होतो. गांधीजींच्या या छंदाची मला केव्हा केव्हा चीड येई; त्यांच्या विचारांचा उलगडा मला करताच येत नसे. त्या काळात खादीसाठी ते फंड गोळा करीत व दरिद्रनारायणासाठी मी पैसे गोळा करीत आहे, असे ते सांगत असत. छोट्या छोट्या धंद्यांत गरिबांना काम लावून द्यावे असा त्या म्हणण्याचा अर्थ असावा. पण दारिद्र्याचे देव्हारे माजवण्याची कल्पनाही त्या शब्दात दिसून येई. देव हा खास दीनांचा वाली आहे, त्याला दरिद्री लोक सर्वांहून आवडते आहेत, अशा धार्मिक समजुती सगळीकडे आढळून येतात. मला ते तत्त्वज्ञान पसंत पडण्याजोगे नव्हते. दारिद्र्याचा मला तिटकारा वाटे. भांडून झगडून ते समूळ उपटून टाकले पाहिजे, कोणत्याही प्रकारे त्याला उत्तेजन मिळता कामा नये, असे माझे मत होते.

ह्या प्रश्नाची चर्चा गांधीजींबरोबर करण्याचा सुयोग प्राप्त झाला म्हणजे 'श्रीमंतांनी आपली संपत्ती गरिबांसाठी निधी म्हणून धारण करावी' हा मुद्दा ते आग्रहाने प्रतिपादन करीत. हा विचार फार पुरातन कालापासून युरोपात व हिंदुस्थानात मांडण्यात आलेला आहे. ही गोष्ट घडेल व तीमुळे समाजातील एक बिकट समस्या सोडविता येईल अशी कल्पना तरी कशी करवते, ते मला तरी मुळीच समजलेले नाही.

इकडे दिल्लीच्या असेंब्लीचे काम पेंगत चालले असता भगतसिंग व बटुकेसर दत्त यांनी प्रेक्षकांच्या गॅलरीतून दोन बॉंब फेकले. त्यामुळे उल्कापात झाल्याप्रमाणे जनता खडबडून जागी होऊन असेंब्लीकडे पाहू लागली. बॉंबमुळे कोणाला कोठेही विशेष दुखापत झाली नाही. आरोपींनी नंतर सांगितल्याप्रमाणे ते बॉंब घायाळ करण्यासाठी नसून आवाजाने केवळ धामधूम उडवून देण्यासाठी फेकण्यात आले असावे. लाला लजपतराय यांच्यावर ज्या तरुण इंग्रज अधिकाऱ्याने लाठीचे प्रहार केले अशी समजूत होती, त्याच्यावर गोळी झाडून त्याला ठार करण्यात आले होते. बंगालमध्ये व इतरत्र दहशतवादी कृत्यांना जोर चढला. कटाचे खटले भरण्यात आले व चौकशीविना स्थानबद्ध केलेल्यांची संख्या फुगत चालली. कोर्टातील व तुरुंगातील वागविण्याच्या पद्धतींचा निषेध म्हणून बहुतेक आरोपींनी अन्न-सत्याग्रहाला सुरुवात केली.

आठवड्यामागून आठवडे उलटले तरी सत्याग्रह चालू होता. मी लाहोरला पोचलो, तेव्हा अन्नसत्याग्रहाचा एक महिना संपून गेला होता. सत्याग्रह्यांपैकी काहींना तुरुंगात भेटण्याची मला परवानगी मिळाली. भगतसिंग, जतीन्द्र दास वगैरे मंडळींना मी प्रथमच भेटत होतो. सगळे जण अगदी अस्थिपंजर होऊन अंथरुणाला खिळले होते. त्यांच्याशी फार वेळ बोलणे शक्यच नव्हते. भगतसिंगाचा चेहरा मोठा गोड व पाणीदार होता. तो शांत व गंभीर असा दिसला. वैमनस्याचा भाव त्याच्या चेहऱ्यावर उमटलेला नव्हता. तो अत्यंत सौजन्याने बोलत होता व त्याची दृष्टीही सौजन्यपूर्ण दिसत होती. जतीन्द्रदास तर भगतसिंगापेक्षाही सौम्य दिसला. एखाद्या निष्पाप बालिकेप्रमाणे त्याचा चेहरा मृदू व सालस होता. मी त्याला भेटलो तेव्हा त्याला फार वेदना होत होत्या. पुढे एकसष्ट दिवसांच्या उपोषणानंतर तो मृत्यू पावला.

जतीन्द्र दासाच्या मृत्यूमुळे देशात मोठी खळबळ उडाली. राजबंद्यांच्या वागवणुकीच्या प्रश्नाला चालना मिळून त्यासाठी *सरकारने एक समिती* नेमली. तिच्या शिफारशीवरून नवीन नियम करण्यात आले. कैद्यांचे तीन वर्ग पाडण्यात येऊन राजबंद्यांचा स्वतंत्र असा वर्ग मानण्यात येऊ नये असे ठरले. ह्या नियमामुळे काही सुधारणा होतील असे वाटत होते; पण तसे काहीही घडून आले नाही. अद्यापि तुरुंगातील स्थिती पूर्वीप्रमाणेच अत्यंत असमाधानकारक अशी आहे.

उन्हाळा व पावसाळा संपून थंडीचे दिवस आले व ठिकठिकाणच्या प्रांतिक काँग्रेस-कमिट्या लाहोरच्या अधिवेशनासाठी अध्यक्ष निवडण्याच्या तयारीला लागल्या. त्या साली गांधीजींची निवड जवळ जवळ एकमताने करण्यात आली. पण गांधीजींनी तिला नकार दिला. पुढे लखनौ येथे ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक भरली, तेव्हा आम्हा सर्वांची शेवटच्या क्षणापर्यंत ते होय म्हणतील अशी अपेक्षा होती; पण ते ऐकेनात, व शेवटच्या क्षणी त्यांनी माझेच नाव पुढे ढकलले. शेवटी दुसरे कोणी सापडत नाही म्हणून वैतागून कमिटीने माझीच निवड केली ! त्या वेळी मला जितका राग व चीड आली, तितकी पूर्वी क्वचित आली असेल. नेहमीच्या सांध्या मार्गाने मी निवडून आलो असतो, तर त्या गौरवाचा आनंद मला मनापासून झाला असता. पण मी त्या अधिकाराच्या जागी राजरस्त्याने तर राहोच पण

बाजूच्या रस्त्यानेही आलो नाही. एकदम चोरदाराने वर यावे तसा काहीसा प्रकार झाला.

वडिलांच्या पाठोपाठ मुलगा अध्यक्षाच्या जागेवर चढावा हे दृश्य अभूत-पूर्व होते. मी अध्यक्ष झालो, तेव्हा माझे चाळिसावे वर्ष नुकते कोठे संपले होते. लाहोर-कॉंग्रेस समीप येऊन ठेपली. प्रसंग तर जणू काही आपल्या अंगभूत गतीने व अनिवार्य क्रमाने पुढे पुढे लोटले जात होते. व्यक्तिमात्रांनी कितीही शेखी मिरवली, तरी त्यांचे कार्य अल्प आहे असे वाटे, आणि अविरत वेगाने फिरत राहिलेल्या एका प्रचंड यंत्राचे आपण केवळ घटक आहो, अशी कल्पना मनास येई.

लाहोर-कॉंग्रेसच्या जरा आधी कॉंग्रेस व सरकार ह्यांच्यामध्ये काही तड-जोड निघाली तर पाहावी यासाठी एक शेवटचा प्रयत्न म्हणून व्हाइसरॉयशी मुलाखतीचा योग जुळवून आणण्यात आला. मुलाखतीच्या वेळी कॉंग्रेसतर्फे माझे वडील व गांधीजी, जिना, सप्रू व अध्यक्ष पटेल इतकी मंडळी हजर होती. त्या मुलाखतीतून काहीएक निष्पन्न झाले नाही. तेव्हा कॉंग्रेसला पुढे पाऊल टाकण्याशिवाय गतीच राहिली नाही. स्वातंत्र्य हेच कॉंग्रेसचे ध्येय आहे, अशी घोषणा करून त्याच्या प्राप्तीसाठी कराव्या लागणाऱ्या झगड्याच्या तयारीकरिता आवश्यक ते प्रयत्न सुरू करणे क्रमप्राप्त झाले.

लाहोर-कॉंग्रेसचे चित्र माझ्या स्मृतिपटावर अगदी स्पष्ट व भडक रंगांत रंगविले गेले आहे. ही गोष्ट स्वाभाविकच होय. कारण तेथे अग्रपूजेचा मान मला मिळालेला होता व अधिवेशनाच्या केंद्रस्थानी माझी स्थापना झाली होती. लाहोरच्या जनतेने माझे जे भरगच्च स्वागत केले, ते विसरणेच शक्य नाही. स्वागताचा थाट मोठा होता व त्यातील जिव्हाळा गाढ होता. एका प्रतीकाचे, एका कल्पनेचे स्वागत करावे म्हणून हा उत्साहसागर उचंबळला आहे, व्यक्ती-साठी नव्हे, ह्याची ओळख मला पटली होती.

स्वातंत्र्याची व स्वातंत्र्ययुद्धाची प्रगती व्हावी म्हणून संकल्पित कार्याच्या ठरावाला जवळ जवळ एकमताने पाठिंबा मिळाला. हजारो लोकांपैकी पंधरा-वीस इसमांनी विरुद्ध मत दिले. योगायोग असा की, जुने वर्ष संपून नव्या वर्षाचे पाऊल उंबरठ्यावर पडत असता म्हणजे ३१ डिसेंबर रोजी रात्री बरोबर बाराच्या ठोक्याला हा मुख्य ठराव मंजूर करण्यात आला. चाके

फिरू लागली, पण सुरुवात कोठे व कशी करावी ह्याची अटकळ अद्यापि आलेली नव्हती. अजूनही भविष्याविषयी आम्ही अंधारातच होतो. लाहोर–कॉंग्रेसमध्ये उत्साहाचे वातावरण दिसले खरे; पण प्रतिकाराचा कार्यक्रम सुरू केला तर किती पाठिंबा मिळेल, याची कोणालाही अटकळ होईना. आम्ही घरावर तुळशीपत्र ठेवून बाहेर पडलो; आता माघारी फिरणे शक्य नव्हते; पण पुढचा रस्ता व प्रदेश सर्वच अपरिचित. मोहिमेचा प्रथमारंभ व लोकांच्या उत्साहाची चाचणी म्हणून २६ जानेवारीला स्वातंत्र्यदिन साजरा करावा व सर्व देशभर स्वातंत्र्याची शपथ घेण्यात यावी, असे ठरले.

२६ जानेवारी १९३० रोजी स्वातंत्र्य-दिन साजरा झाला, व विजेच्या चमकेबरोबर सारा भूभाग दृष्टीला पडावा, त्याप्रमाणे जनतेचा उत्साह व तळमळ दिसून आली. आता मोठा प्रश्न उरला तो हा की, पुढे पाऊल टाकायचे खरे, पण ते कसे? सुरुवातीचा घाव घालायचा कोठे? परिस्थितीशी जुळता व जनतेला लोकप्रिय होईल असा कायदेभंगाचा कोणता कार्यक्रम आखावा? असे कोडे पडले असता महात्माजींनी आपला बेत सांगितला, आणि 'मीठ' या शब्दाला नवेच महत्त्व आले. त्या शब्दात सामर्थ्य प्रतीत होऊ लागले. मिठावरील करावर हल्ला चढवावयाचा, मिठाचे कायदे मोडून टाकावयाचे असे ठरले. त्यानंतर गांधीजींचा व्हाइसरॉयशी पत्रव्यवहार झाला व पुढे 'दांडी-कूच' सुरू झाले. दांडीकडे निघालेल्या सत्याग्रहींसंबंधी रोजच्या रोज प्रगतीच्या बातम्या ऐकू येऊन देशातील उत्साहाचा पारा वरवर चढत चालला. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक अहमदाबादला भरविण्यात आली. लढ्याला साधारणतः सुरुवात झालीच होती. तेव्हा त्याबद्दल शेवटची व्यवस्था लावण्यासाठीच ही बैठक बोलावण्यात आली होती. परंतु आमचे सेनापती तेथे हजर राहिले नाहीत. त्यांचे कूच सुरू होते, ते सोडून येण्याचे त्यांनी नाकारिले! अहमदाबादेला शेवटची निरवानिरव करून ऑ. इं. कॉं. कमिटीच्या सभासदांचा आम्ही निरोप घेतला. वाटेत वडील व मी गांधीजींना भेटण्यासाठी गेलो, त्या वेळी ते आपल्या पथकानिशी जंबूसर येथे होते. काही तास आम्ही त्यांच्या सहवासात घालविले. नंतर ते आपल्या पथकाबरोबर नव्या मुक्कामी निघून गेले. हातात काठी घेऊन ते आपल्या पथकाच्या अग्रभागी चालत होते. त्यांची

पावले खंबीरपणे पडत होती आणि मुद्रा शांत पण खंबीर दिसत होती. ते त्या वेळी मी घेतलेले त्यांचे शेवटचे दर्शन. ते दृश्य पाहून आमची मने थरारून गेली.

जंबूसर येथे गांधीजींचा विचार घेऊन आमचे अलाहाबाद येथील जुने घर राष्ट्राला देणगी म्हणून देण्याचा व 'स्वराज्यभवन' असे त्याचे नूतन नामकरण करण्याचा बेत वडिलांनी नक्की केला. अलाहाबादेस पोचल्यावर ही गोष्ट जाहीर करण्यात आली व त्यांनी लागलीच काँग्रेसला घराचा ताबाही देऊन टाकला.

एप्रिल महिना आला; गांधीजी समुद्राच्या जवळ जवळ जाऊ लागले. मिठाच्या कायदेभंगाने सत्याग्रहाच्या चळवळीला सुरुवात करण्याची अनुज्ञा मिळण्याची वाट आम्ही पाहात बसलो. जालियनवाला बागेच्या स्मरणार्थ पाळण्यात येणाऱ्या राष्ट्रीय सप्ताहाचा प्रारंभ ६ एप्रिल रोजी होतो, त्याच दिवशी गांधीजींनी दांडी येथे मिठाचा सत्याग्रह केला व त्यानंतर चार दिवसांनी सर्व काँग्रेस-संस्थांना आपापल्या ठिकाणी सत्याग्रह सुरू करण्याची अनुज्ञा देण्यात आली.

आणि स्प्रिंगवरील दडपण एकदम काढून घेतल्याप्रमाणे झाले! सर्व देशभर शहरा-खेड्यांतून मीठ तयार करण्याची गडबड उडाली व ते तयार करण्याच्या अनेक विचित्र पद्धती लोकांनी अमलात आणल्या. आमचे तर त्या विषयाचे ज्ञान अगाधच होते! तेव्हा आम्ही माहिती जमवून पत्रके प्रसिद्ध केली, भांडीकुंडी जमविली व सरतेशेवटी काळाबेंद्रा काही तरी एक पदार्थ तयार झाला! तोच घेऊन आम्ही विजयोन्मादाने नाचलो व भरमसाट किंमतीला ते मीठ विकले! मीठ पांढरे झाले की काळे झाले हा प्रश्नच नव्हता; मिठाच्या जुलुमी कायद्याचा भंग करणे हा मूळ मुद्द्याचा प्रश्न, तो आम्ही तडीला नेला; मग मीठ कसेही का दिसेना! लोकांचा अमर्याद उत्साह व कुरणातील वणव्याप्रमाणे सारखी पसरत चाललेली चळवळीची आग पाहिल्यानंतर, प्रथम गांधीजींनी हा कार्यक्रम सुचवला त्या वेळी शंका घेत बसल्याबद्दल आम्हाला खेद व लज्जा वाटू लागली! जनतेला लगामी लावून, तिच्याकडून पद्धतशीर रीतीने काम करवून घेण्याची त्यांची हातोटी विलक्षण खरीच.

मध्यप्रांतातील रायपूर येथील परिषदेला जाण्यासाठी ता. १४ एप्रिल

रोजी मी आगगाडीत चढलो होतो. इतक्यात मला अटक करण्यात आली. त्याच दिवशी माझा खटला चालून मला सहा महिन्यांची शिक्षा झाली. अटकेची कल्पना असल्यामुळे मी माझ्यामागून कॉंग्रेसच्या अध्यक्षस्थानी गांधीजींची व त्यांनी नकार दिल्यास वडिलांची नेमणूक केली होती. गांधीजीं-कडून अपेक्षेप्रमाणे नकार आला व वडीलच कॉंग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष झाले.

मिरवणुकी, लाठी-हल्ले, गोळीबार, प्रमुख पुढाऱ्यांच्या अटकेनिमित्त अनेकदा पाळण्यात आलेले हरताळ, पेशावर-दिन, गढवाली-दिन, वगैरे रोमांचकारी बातम्यांची त्या काळी रेलचेल होती. परदेशी व ब्रिटिश मालावर काही दिवस अगदी कडकडीत हरताळ पडला. माझी वयोवृद्ध आई माझ्या बहिणीसमवेत भर उन्हात निरोधनासाठी दुकानासमोर उभी राहात असल्याचे वृत्त मी ऐकिले, तेव्हा माझे मन उचंबळून आले. कमला निरोधन तर करीत होतीच, पण त्याव्यतिरिक्त आणखीही बरीच कार्ये ती उरकीत होती. मला तिची इतक्या वर्षांची माहिती, पण अलाहाबाद शहरात व जिल्ह्यात चळवळीचे काम तिने अशा अपूर्व तडफेने व निश्चयाने चालवले होते की, ते पाहून मलादेखील आश्चर्याने तोंडात बोट घालावे लागले. आजारबिजार ती जसा काही विसरलीच !

प्रारंभीच्या काळातील सर्वांत महत्त्वाची बातमी म्हणजे २३ एप्रिल रोजी पेशावर येथे व नंतर सर्व सरहद्दप्रांतांत घडलेले प्रसंग. मशिनगन्स आग ओकीत असता अशा प्रकारचे शिस्तवार धैर्य हिंदुस्थानातील कोठल्याही भागात प्रकट झाले असते तरी सर्व देशभर खळबळ उडाली असती. पण सरहद्द प्रांतात असा प्रसंग घडला म्हणून त्या प्रसंगाला विशेष महत्त्व होते. पठाणांचे शौर्य विख्यात असले, तरी शांतिप्रिय म्हणून ते प्रसिद्ध नाहीत. पण सर्व हिंदुस्थानला आदर्शभूत असे उदाहरण ह्या पठाणांनी त्या प्रसंगी घालून दिले. नागरिकांवर गोळ्या झाडण्याचे गढवाली सैनिकांनी नाकारिले, ते-देखील सरहद्द प्रांतातच.

त्या काळी अनेक विलक्षण प्रसंग घडले. पण सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे या चळवळीत स्त्री-समाजाने घेतलेला भाग. घराच्या एकान्तवासातून त्या बाहेर पडल्या व सार्वजनिक कामाचा अभ्यास नसताही त्यांनी चळ-वळीच्या ऐन पुरात उडी घेतली. सर्वसामान्यपणे असे म्हणण्यास हरकत

नाही की, पुरुषांपेक्षा स्त्रियांनी अधिक गंभीरपणा दाखविला. अनेक ठिकाणी त्या प्रांताच्या सर्वाधिकारी झाल्या होत्या.

गांधीजींना ५ मे रोजी अटक झाली. त्यानंतर पश्चिम किनाऱ्यावरील मिठागरांवर व मिठाच्या वखारींवर हल्ले चढविण्यात आले. त्या प्रसंगी पोलिसांनी आपल्या क्रौर्याचे जे प्रदर्शन केले ते फार दुःखप्रद होते. त्यानंतरच्या चळवळीत तेथील प्रचंड हरताळामुळे, मिरवणुकीमुळे व लाठी-हल्ल्यामुळे मुंबईला अग्रस्थान प्राप्त झाले. लाठी हल्ल्यात घायाळ झालेल्या लोकांची शुश्रूषा करण्यासाठी तात्पुरती रुग्णालयेही उघडण्यात आली. पुष्कळसे प्रमुख प्रसंग मुंबईलाच घडून येत, व शहर फार मोठे असल्यामुळे त्या प्रसंगाची प्रसिद्धीही मोठ्या प्रमाणात होई. लहान शहरांतून अगर खेड्यांतून मुंबईच्याच तोलाचे कार्यक्रम झाले, पण त्यांना तितकीशी प्रसिद्धी मिळाली नाही.

# नैनी तुरुंग १३

सुमारे सात वर्षांनंतर मी परत तुरुंगात आलो. तुरुंगातील जीवनाच्या आठवणी थोड्याशा बुजून गेल्या होत्या. कैद्यांची वस्ती असणाऱ्या मोठ्या आवारापासून स्वतंत्र अशा आवारात माझी व्यवस्था लावण्यात आली. हे आवार छोटेसे व वर्तुलाकार होते. आवाराच्या मध्यभागी एक विद्रूप व भकास अशी चार खोल्यांची इमारत होती; त्यांपैकी एकमेकांस जोडलेल्या दोन खोल्या मला देण्यात आल्या. बाहेरच्या भरगच्च कार्यक्रमाच्या व उत्साहमय अशा जीवनानंतर मला येथे अगदीच एकाकी व कंटाळवाणे वाटू लागले. मी आलो तेव्हा फार दमून गेलो होतो; म्हणून पहिले दोन-तीन दिवस पुष्कळशी झोप घेण्यातच निघून गेले. उन्हाळा केव्हाच सुरू झाला होता. माझ्या खोलीच्या बाहेर, इमारतीच्या व तटाच्या दरम्यानच्या जागेत मला रात्री उघड्यावर निजण्याची परवानगी देण्यात आली. माझा बिछाना साखळदंडांनी जखडून टाकलेला होता. तो काखोटीला मारून मी

निघून जाईन अथवा तटाची भिंत चढून जाण्याकडे मी त्याचा उपयोग करीन अशी शंका तुरुंगावरील अधिकाऱ्यांना आली असावी ! रात्रभर काही विलक्षण आवाज कानांवर येत. मुख्य तटबंदीचे रक्षण करणारे कैदी निरनिराळ्या सप्तकांत परस्परांना साद घालीत असत ! कधी कधी ते इतके लांबलचक हेल काढीत की, झाडांच्या पानांतून आक्रोश करीत हिंडणाऱ्या वाऱ्याप्रमाणे त्यांचा आवाज ऐकू येई. बराकीतून देखरेख करणारे पहारेकरी आपल्या भसाड्या आवाजात कैद्यांची ' गिंती ' करीत असत व ' ऑलवेल ' असे ओरडत. माझे आवार बऱ्याच अंतरावर असल्यामुळे मला हे सर्व आवाज स्पष्टपणे ऐकू येत. प्रथम प्रथम हे कसले आवाज आहेत ते मला कळेना. कधी कधी मला असे वाटे की, मी अरण्याच्या अगदी जवळ असून आपल्या शेतातून जंगली जनावरांना पिटाळण्यासाठी शेतकरी हाकाटी करीत आहेत; तर कधी अशी कल्पना होई की, श्वापदेच आपले निशागीत आळवीत असून त्यांना सगळे अरण्य जणू काही साथच देत आहे !

चौकोनी आवारापेक्षा वाटोळ्या आवारात बंदीवासाची कल्पना अधिक तीव्रतेने होते असे मला वाटते. ही माझी केवळ कल्पनाच आहे, की खरोखर वस्तुस्थिती तशीच आहे कोणाला ठाऊक. कोनेकोपरे कोठेच दिसत नाहीत, त्यामुळे मनावर दडपण पडते. त्या भिंतीमुळे दिवसा वर आकाशही संकुचित झाल्याप्रमाणे भासावे. आकाशाचा अगदी लहानसा तवाच तेवढा त्या आवारातून दिसावयाचा !

**" नील सान ते वितान, । म्हणति बंदि ज्यास गगन**
**संथ जाइ जलद्-यान । शिडांवर रुपेरी."**

रात्री तर ती भिंत अधिकच जवळ आल्यासारखे होऊन मी एखाद्या विहिरीच्या तळाशी पडलो आहे असे वाटू लागे; अथवा माझ्या दृष्टीला पडणारा आकाशाचा तारकांकित चांदवा खरा नसून ते कृत्रिम आकाश असावे अशी शंका उत्पन्न होई !

व्यायामासाठी अथवा इतर कोणत्याही कामासाठी आवाराच्या बाहेर जाण्याची मला काही दिवस मनाई करण्यात आली होती. नंतर अगदी सकाळी झुंजूमुंजू असताना अर्धा तासपर्यंत बाहेर जाऊन रपेट करण्याची किंवा पळण्याची परवानगी मला मिळाली. दुसऱ्या कैद्यांशी संबंध येऊ नये

व मी त्यांच्या दृष्टीला पडू नये, म्हणून पहाटेची वेळ नेमण्यात आली होती. ती वेळ मोठ्या आनंदात जाई व त्यामुळे मन अगदी ताजेतवाने होत असे. थोड्या वेळात पुष्कळसा व्यायाम उघड्या हवेत घेता यावा म्हणून मी पळण्यास सुरुवात केली व हळूहळू पळण्याचे प्रमाण वाढवीत वाढवीत मी रोज दोन मैलांपेक्षा अधिक पळू लागलो. अगदी पहाटेस म्हणजे सुमारे चार अथवा साडेचार वाजता चांगला अंधार असतानाच मी उठत असे. रात्री वाचनासाठी पुरेसा उजेड मिळत नसल्यामुळे लवकरच अंथरुणावर पडावे लागे. लवकर जाग येण्याचे काही अंशी हेही कारण होतेच. ताऱ्यांकडे टक लावून बसण्याची मला आवड होती. काही मुख्य मुख्य तारका-पुंजांच्या स्थानावरून वेळेचीही कल्पना येत असे. आवाराच्या तटावरून डोकावून पाहणारा ध्रुवतारा अंथरुणावर पडल्या पडल्या डोळ्यांना दिसत असे. सदोदित त्याच ठिकाणी तो नजरेस पडत असल्याकारणाने त्याच्या दर्शनापासून मला फार समाधान होई, व बदलत्या आकाशाच्या मध्यभागी उभा ठाकलेला हा अविचल तारा म्हणजे चिकाटी व आनंदपूर्ण धिमेपणा या गुणांचे एक प्रतीकच आहे, असे मला वाटत असे.

तुरुंगात जर कशाचा विशेष खेद होत असेल, तर तेथे पंधरा वर्षांपासून वयाचे किती तरी तरुण नजरेस पडतात ह्या गोष्टीचा. त्यांच्यापैकी बहुतेक चांगले चलाख दिसतात, आणि संधी मिळाली तर ते नाव काढतील असे वाटते. खेळण्यासवरण्याला संधी नाही, वृत्तपत्रांना बंदी, आणि पुस्तकावर करडी नजर! संध्याकाळ झाली की तेव्हापासून बारान् बारा तास कैदी बराकीत डांबून पडलेला असतो.

पण असल्या मारक वातावरणात वावरणाऱ्या कैद्यांच्या मनातसुद्धा नांदणारी मैत्री व दानत पाहिली की मात्र आश्चर्य वाटते. १२ वर्षांची शिक्षा भोगल्यावर एका आंधळ्या कैद्याची सुटका झाली; तुरुंगातून बाहेर पडताना त्याच्याजवळ सुतळीचा तोडादेखील नव्हता. जगात कोणी मित्रही उरले नव्हते. त्याच्या कैदी बंधूंची खूप इच्छा की आपण त्याला मदत करावी; पण ते कितीशी मदत करू शकणार? कोणी त्याला आपला सदरा दिला, कोणी दुसरे काही दिले. त्याच दिवशी सकाळी एका कैद्याला नवीन चप्पल-जोडी मिळाली. तेव्हा ती त्याने मला मोठ्या अभिमानाने दाखविली

तुरुंगात चप्पलजोडी मिळणे म्हणजे मोठ्या भाग्याची गोष्ट ! परंतु हा म्हातारा आंधळा अनवाणी जाणार असे पाहून त्याने आपल्या नव्या कोऱ्या चपला त्याला देऊन टाकल्या. ‘ तुरुंगाच्या आत बाहेरच्यापेक्षाही अधिक दयाळू माणसे आहेत म्हणायची ! ’ असा विचार त्या वेळी माझ्या मनात आला.

अनेक अनपेक्षित व स्फूर्तिदायक प्रसंगांनी ते साल भरून गेले होते. परंतु जनतेच्या मनात चैतन्य खेळवण्याची जी शक्ती गांधीजींच्या ठिकाणी दिसून आली तिचे मला सर्वांत अधिक आश्चर्य वाटले. मोहिनी विद्येचाच प्रकार त्या वेळी मला पाहावयास सापडला व त्यांच्यासंबंधी गोखल्यांनी काढलेल्या उद्गारांची आठवण झाली. गोखले म्हणाले होते की, ‘ मातीच्या गोळ्याला शूराचे कार्य करावयाला लावील, अशी शक्ती गांधीजींच्या अंगी आहे.’ चळवळीत भाग घेत होते त्यांच्याच मनात नव्हे, तर कैद्यांच्या मनातही रोमांचकारी सुखस्वप्ने तरंगू लागली व ‘ हे आलेच स्वराज्य ’ असे साधे कैदीदेखील म्हणू लागले.

एक महिनापर्यंत माझ्या बराकीत मी एकटाच होतो. नंतर नर्मदाप्रसाद सिंह नावाचे एक गृहस्थ तेथे आले. ते माझे मित्र होते. जूनच्या शेवटच्या दिवशी आमच्या लहानशा आवारात मोठी धामधूम उडाली. काही कल्पना नसता सकाळी पाहतो तो माझे वडील व डॉ. सय्यद महमूद तेथे आलेले ! उठण्यापूर्वी अंथरुणात असतानाच त्यांना आनंदभवनात गिरफदार करण्यात आले होते.

असले प्रसंग सोडले, तर तुरुंगातील आमचे आयुष्य सुरळीतपणे चालले होते. हिवाळ्यात अलाहाबादेची हवाही फार सुंदर असते. रणजित पंडित आमच्या बराकीत आला हा सुयोगच म्हटला पाहिजे. कारण त्याला माळी-कामाची बरीच माहिती होती. त्यामुळे स्मशानभूमीप्रमाणे दिसणारे आमचे आवार थोड्याच दिवसांत रंगीबेरंगी फुलांनी भरून गेले. त्या चिंचोळ्या जागेत त्याने एक गोल्फची जागाही थाटून दिली !

१ जानेवारी १९३१ रोजी कमलेला पकडल्याची बातमी आम्हाला समजली. आपले इतके सहकारी तुरुंगात गेले, त्यांच्या मागोमाग आपणही गेले पाहिजे, अशी तिला तळमळ लागून राहिली होती. तिला, माझ्या बहिणींना व इतर स्त्रियांना त्या पुरुष असत्या तर केव्हाच तुरुंग दिसला

असता ! पण आता तिची इच्छा पूर्ण झाली. पकडल्यावर तिला आनंद झाला असेल; पण तिची प्रकृती नाजुक आहे, तुरुंगवासामुळे ती बिघडेल, अशी भीतीही मला वाटली.

वडील कलकत्त्याला आजारीच होते. पण कमलेच्या अटकेची व शिक्षेची बातमी ऐकून त्यांचे मन व्यथित झाले, आणि त्यांनी अलाहाबादेला परत यावयाचे निश्चित केले. १२ जानेवारी रोजी ते नैनी येथे मला भेटण्यासाठी आले. त्यांना दोन महिन्यांपूर्वी मी पाहिले होते. या खेपेला त्यांना पाहिल्याबरोबर मी दचकलोच. त्यांचा तो सुजलेला चेहरा माझ्या डोळ्यांपुढून जाता जाईना. ते असे कधीच दिसत नसत. त्यांच्या प्रकृती-संबंधी खरी चिंता अशी त्या वेळी प्रथमच माझ्या मनात आली. ते आणि मृत्यू ही जोडीच असंभाव्य वाटे. मृत्यूच्या कल्पनेची ते टर उडवीत व मी आणखी खूप वर्षे जगणार आहे, असे आम्हाला सांगत असत. त्यांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाची व सर्वंकष प्रेमाची आम्हा कुटुंबातील मंडळींना इतकी सवय झाली होती की, ते गेल्यावर जग कसे दिसेल याची कल्पनाही आम्हाला असह्य होत असे !

२६ जानेवारीला नैनीच्या तुरुंगात गत व आगामी वर्षाविषयी विचार करीत आम्ही बसलो होतो. इतक्यात वडिलांची प्रकृती अधिक बिघडली असल्यामुळे मी ताबडतोब घरी जावे, असे मला अकस्मात सांगण्यात आले. अधिक चौकशी केल्यावर असे कळले की, मला सोडून देण्यात येत आहे. रणजितची सुटकाही माझ्याबरोबरच झाली. २६ दिवसांचा तुरुंगवास भोगल्यावर कमलेचीही त्याच दिवशी लखनौ-तुरुंगातून सुटका झाली.

नैनीच्या तुरुंगात मला वडील भेटले, त्यानंतर पंधरा दिवसांनी त्यांची ही भेट होत होती. तुरुंगातील भेटीच्या वेळी त्यांच्या सुजलेल्या चेहऱ्याकडे पाहून माझ्या अंतःकरणात चर्र झाले होते; आता तर त्यांची स्थिती अधिक बिघडलेली दिसली. त्यांना बोलताना त्रास होई व त्यांच्या विचारांचाही गोंधळ उडत असे. पण पूर्वीची इच्छाशक्ती अद्यापि तग धरून होती. तिच्या बळावरच त्यांच्या मनाचे व शरीराचे व्यापार चालले होते.

वर्किंग कमिटीचे मूळचे सभासद व बदली सभासद सर्व सुटून आले असून बैठकीच्या हुकुमाची ते वाट पाहात राहिले होते. वडिलांची भेट

घेण्याची पुष्कळांची इच्छा असल्यामुळे अलाहाबादलाच बैठक भरविण्याचे निश्चित झाले. दोन दिवसांनंतर तीस-चाळीस सभासद दाखल होऊन आमच्या घराशेजारीच स्वराज्यभवनात सभा भरली. मधून मधून मीही सभेला जात होतो. परंतु सभेत भाग घ्यावयाला मन ठिकाणावरच नव्हते. तेथे काय निर्णय ठरला ते मला आता मुळीच आठवत नाही. कायदेभंग चालू ठेवण्याचा निर्णय तेथे झाला असावा.

अगदी शेजारीच वर्किंग कमिटीची बैठक चालू होती. पण त्याविषयी वडिलांनी जवळजवळ मुळीच आस्था दाखविली नाही. हीच बैठक पंधरा दिवसांपूर्वी चालू असती, तर त्यांचे सारे लक्ष तिकडे लागून राहिले असते; पण असल्या गोष्टींपासून आपण आता फार दूर चाललो आहोत, असे त्यांना वाटत असावे. "महात्माजी, मी आता लवकरच जाणार; येथे राहून स्वराज्य मिळालेले पाहण्याचे माझ्या नशिबी नाही. पण स्वराज्याचा लढा तुम्ही जिंकला आहे. ते थोडक्याच दिवसांत तुमच्या पदरात पडेल हे निश्चित," असे ते गांधीजींपाशी म्हणाले होते. ४ फेब्रुवारी रोजी त्यांच्या प्रकृतीत जरा सुधारणा दिसली; तेव्हा क्ष-किरणांच्या विशिष्ट उपचाराची सोय लखनौला होती, तेथे त्यांना हालवावे असे ठरून आम्ही मोटरीने त्यांना लखनौला घेऊन गेलो. गांधीजी वगैरे मंडळी मोटरीने मागून येत होती. मोटर अगदी बेताने हाकली तरीही वडिलांना फार थकवा आला. दुसऱ्या दिवशी प्रवासाचा शीण गेलासा दिसला खरा, पण इतर लक्षणे दिसू लागली ती जरा चिंता-जनकच होती. दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ फेब्रुवारी रोजी पहाटे मी त्यांच्या-जवळ बसलो होतो. सबंध रात्र त्यांची तगमग सुरू होती. पण एकाएकी त्यांची मुद्रा शांत झाली; चेहऱ्यावरील धडपडीच्या ऊर्मी निमाल्या. त्यांना झोप लागली असेल अशी कल्पना होऊन मला हायसे वाटले. परंतु आईने बरोबर ताडले व हुंदका दिला. अशाने त्यांची झोप मोडेल, आपले रडे आवर, म्हणून मी तिला विनविले. पण त्यांची ती अखेरची चिरनिद्रा होती, त्यातून जाग कोठून येणार ?

त्याच दिवशी त्यांचा मृत देह आम्ही मोटरीतून अलाहाबादेस घेऊन आलो. मी मोटरीत बसलो होतो, आणि रणजित मोटर हाकीत होता. वडिलांचा खास आवडता नोकर हरि त्याच मोटरीत होता. आईची व

गांधीजींची मोटर मागोमाग येत होती. सर्व दिवसभर माझे डोके सुन्न झाले होते. काय घडले त्याची नीटशी कल्पनाही मला आली नाही, आणि लोक-समुदायाच्या खेचाखेचीमुळे व गोष्टीमागून गोष्टी घडत असल्यामुळे विचार करण्यास वेळही मिळाला नाही. त्यांच्या शवाभोवती राष्ट्रीय निशाण लपेटलेले होते. मोटरीवरही एक भले मोठे निशाण फडकत होते. अलाहाबादेला आलो तेव्हा त्यांच्या मृत देहाचा सत्कार करण्यासाठी लक्षावधी लोक जमा झाले. घरी थोडेसे धार्मिक विधी उरकण्यात आल्यावर गंगेच्या तीराकडे एक अफाट स्मशानयात्रा निघाली. शिशिरकालीन संध्येची सावली गंगातीरावर पसरत असता चितेच्या ज्वाळा भडकल्या आणि आम्हाला व लाखो हिंद-वासीयांना मोलाचा वाटणारा तो देह भस्मीभूत झाला! डोळे टिपावयास लावील असे छोटेसे भाषण गांधीजींनी केल्यावर आम्ही सर्वजण हळूहळू परत फिरलो. खिन्न व शून्य अंतःकरणाने आम्ही घरी येत असता आकाशात तारे चमचमत होते.

आईला व मला हजारो लोकांनी सहानुभूतीचे संदेश पाठविले. लॉर्ड व लेडी आयर्विन यांनीही मोठा सौजन्यपूर्ण असा संदेश आईकडे धाडला होता. इतक्या अलोट स्नेहभावाचा आणि सहानुभूतीचा वर्षाव झाल्यामुळे आमच्या दुःखाची दाहकता थोडी कमी झाली. पण त्या संकटकाली गांधी-जींचा स्नेहदिग्ध सहवास मिळाला म्हणूनच आईचे व आमचे सर्वांचे दुःख हलके झाले व हृदयाने घाव भरून निघाले.

# दिल्ली-करार व कराची-काँग्रेस १४

वडिलांनी देह ठेवला, त्याच दिवशी व जवळ जवळ त्याच घटकेला मंडलाकार परिषदेला गेलेले बरेचसे प्रतिनिधी मुंबई बंदरात येऊन दाखल झाले. शास्त्री व सप्रू थेट अलाहाबादला आले. गांधीजी व वर्किंग कमिटीचे काही सभासद तर तेथे होतेच. आमच्या घरीच खाजगी बैठक होऊन मंडलाकार परिषदेत काय घडले ते निवेदन करण्यात आले. अलाहाबाद येथे

झालेल्या चर्चेतून काहीसुद्धा निष्पन्न झाले नाही. मंडलाकार परिषद म्हणजे नुसता पाचोळा आहे हा आमचा पूर्वग्रह मात्र ठाम झाला. गांधीजींनी व्हाइसरॉयकडे मुलाखत मागावी व त्यांच्याशी मोकळेपणाने चर्चा करावी असे कोणी तरी सुचविले. गांधीजींनी पत्र लिहिण्याचे कबूल केले; पण मुलाखतीपासून काहीएक निष्पत्ती होईल अशी आशा त्यांच्या मनात होती असे मला वाटत नाही. पण वाकडी वाट करावी लागली तरी आपल्या विरोधकांना भेटावे व त्यांच्याशी बोलावे, ही पद्धती तत्त्वतः त्यांना मान्य होती. अंतःकरणपालट घडावा, राग व गैरविश्वास यांचे अडसर निखळून पडावेत, विरोधकांच्या पोटात व मनात रिघावे अशी त्यांची इच्छा असे. असा पालट झाला की खात्री पटविणे सोपे होते; खात्री नच पटली तर निदान विरोधाचे तणावे ढिले पडतात, आणि कलहाच्या नांगीचा काटा झडून जातो, हे गांधीजी जाणून होते. केवळ व्यक्तित्वाच्या जोरावर ते विरोधकांना आपलेसे करीत, ही आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळे हतबल होऊन अनेक टीकाकार व निंदक त्यांचे चहाते बनले.

भेटीची व्यवस्था करण्यात मुळीच दिरंगाई झाली नाही. व्हाइसरॉय-बरोबरच्या संभाषणात तात्पुरत्या तडजोडीविषयी काही महत्त्वाचे बोलणे निघाले, तर वर्किंग कमिटीच्या सभासदांना मी बोलावून घेईन असे सांगून गांधीजी दिल्लीला निघून गेले. थोड्याच दिवसांत आम्हाला दिल्लीचे आमंत्रण आले. तीन आठवडे आम्ही तेथे होतो. दररोज बैठकी भरून लांब-लचक आणि कंटाळवाण्या चर्चा चालत.

गांधीजी व व्हाइसरॉय अर्विन यांच्या वाटाघाटी काही काळ चालून पुनः एकाएकी बंद पडल्या. कित्येक दिवस गांधीजींना व्हाइसरॉयकडून निमंत्रण आले नाही व तडजोड फिसकटली असे वाटून वर्किंग कमिटीचे सभासद घरोघर जाण्याच्या तयारीला लागले. पुढील कार्यक्रमाविषयी व कायदेभंगाविषयी एकत्र जमून आम्ही पुनः विचार केला. कारण, तडजोड फिसकटल्याचे जाहीर झाल्यावर पुनः भेटणे शक्य होणार नाही, हे उघडच दिसत होते. आम्ही जावयास निघालो. पण इतक्यात लॉर्ड अर्विनकडून पुनः बोलावणे आले व वाटाघाटींना पुनः सुरुवात झाली. ४ मार्च रोजी मध्यरात्री-

पर्यंत गांधीजींची वाट पाहात आम्ही बसलो होतो. पण ते सुमारे दोन वाजता परत आले व आम्हाला उठवून तडजोड निश्चित झाल्याचे वृत्त त्यांनी आम्हाला कळविले. आम्ही मसुदा पाहिला. त्यांतील बहुतेक मुद्दे मला माहीत होतेच; परंतु, संरक्षक बंधनांविषयीचे त्यातील दुसरे कलम पाहून मात्र मी थक्क झालो. त्या विषयावर विचार केलेला नसल्यामुळे मी त्या वेळी काही बोललो नाही; आणि आम्ही सर्वजण झोपण्यासाठी निघून गेलो.

माझ्या अस्वस्थतेची कुणकुण गांधीजींच्या कानी गेली व दुसऱ्या दिवशी सकाळी फिरावयास जाताना त्यांनी मला बोलावून घेतले. आम्ही खूप वेळ चर्चा केली. कोणताही मुख्य मुद्दा आपण गमावलेला नाही व आपल्या हातून कोणत्याही प्रकारची तत्त्वच्युती झालेली नाही, हे पटवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे माझी खात्री पटली नसली, तरी माझी अस्वस्थता बरीच कमी झाली. ‘ तडजोडीच्या मसुद्याचे गुणावगुण काहीही असोत, पण आम्हाला आश्चर्यचकित करून टाकण्याची तुमची ही रीत पाहून मला तुमचे थोडे भय वाटू लागले आहे. १४ वर्षांच्या दाट परिचयानंतरही आम्हाला ज्यांचा थांग लागलेला नाही, अशा कित्येक अज्ञात गोष्टी तुमच्यात दडलेल्या असल्यामुळे प्रसंगी काय घडेल, याविषयी मन साशंक होते ’ असे मी बोलून दाखविले.

विचारांचा हिंदोळा एकदोन दिवस असाच खालवर होत होता. काय करावे ते सुचेना. पुष्कळ शारीरिक व मानसिक तगमगीनंतर तडजोड मान्य करून ती टिकविण्यासाठी मनापासून झटावयाचे, असे. सरतेशेवटी मी ठरविले. दुसरा-तिसरा मार्गच मला दिसत नव्हता.

कायदेभंगाव्यतिरिक्त इतर कारणांनी तुरुंगात पडलेल्या राजकीय कैद्यांच्या मुक्ततेविषयी तडजोडीपूर्वी व नंतरही गांधीजी आर्विन यांच्याशी बोलले होते. राजकीय वातावरण शांत व्हावे व बंगालमधील व्यवहार अधिक सुरळीत चालावेत म्हणून अशा राजबंद्यांची सुटका करणे आवश्यक आहे, असा आग्रह गांधीजींनी धरला होता; पण सरकारने त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या. जनतेतील असंतोष लक्षात घेऊन भगतसिंगाची फाशीची शिक्षा रद्द करावी यासाठी गांधीजींनी परोपरीने विनविले, पण त्याचाही उपयोग झाला नाही.

तडजोड झाल्यानंतर मी लखनौला गेलो. सर्व देशातील कायदेभंग थांबविण्याचे हुकूम आम्ही ताबडतोब सोडले, व ते सर्व कॉंग्रेस-संस्थांनी अत्यंत शिस्तीने अमलात आणले. आमच्यापैकी पुष्कळ लोक ज्वलज्जहाल होते, ते असंतुष्ट झाले. जुन्या कार्यक्रमापासून त्यांना परावृत्त करण्याचे कोणतेच साधन कॉंग्रेसपाशी नव्हते. पुष्कळांनी तडजोडीवर टीका केली. तथापि, कॉंग्रेसचा आदेश सगळीकडे निरपवादपणे पार पाडण्यात आला. आमच्या प्रांतात करबंदीच्या चळवळीला जोर लागला असल्यामुळे या नव्या धोरणाची अंमलबजावणी तेथे कशी होते, इकडे माझे विशेष लक्ष लागून राहिले होते. कायदेभंग करून तुरुंगांत गेलेल्या राजबंद्यांना सोडवून आणणे हे आमचे कर्तव्य होते. दररोज हजारो कैद्यांची सुटका होऊ लागली.

मुक्त झालेले कैदी आपआपल्या शहरी अथवा गावी गेले की स्वागत-समारंभ करण्यात येई. गावकरी ध्वजापताका लावीत, मिरवणुकी काढीत, सभा भरवीत, अभिनंदनाची भाषणे होत. ह्या सर्व गोष्टी अगदी स्वाभाविक अशाच होत्या; पण नित्य डोळ्यांना दिसणारे लाठी-राज्य व सभा-विध्वंसाचा काळ आणि हे समारंभ यांत एकाएकी जमीन-अस्मानाचा फरक पडला. तो डोळ्यांत खुपून पोलिसांना शरमिंदेपणा वाटू लागला! तुरुंगांतून बाहेर पडणारे लोक विजयी मुद्रेने बाहेर पाऊल टाकीत. गर्व वाटण्यासारखे काही घडलेले होते असे नाही; पण तुरुंगात माणूस सफाई खची झाला नसेल, तर सुटकेनंतर तो थोडा तरी खुलतोच; व हजारोंची मुक्तता एकदम झाली म्हणजे तर आनंदाला चांगलीच भरती येते.

संयुक्त प्रांतात आमच्यापुढे शेतकऱ्यांचा प्रश्न खडा होता. शक्य तेवढा खंड भरा, करबंदी थांबली आहे, असे प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने शेतकऱ्यांना सांगितले. पण इकडे शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून ते सरकारकडे जात तेव्हा मात्र सरकारने भर-पसा सूट द्यावी अशी मागणी करीत. बराच काळ सरकारने काही निर्णय दिला नाही. गव्हर्नर सर माल्कम हेली रजेवर अगर काही खास कामावर गेले होते, त्यामुळे घोंगडे भिजत पडले असावे. या चालढकलीमुळे आधीच बिकट असलेली परिस्थिती अधिक बिकट झाली व शेतकऱ्यांचे फार नुकसान झाले.

कराची हिंदुस्थानच्या एका टोकाला व आडबाजूला असूनही तेथे दूर-

दूरहून पुष्कळच लोक आले होते. देशाच्या त्या वेळच्या मनःस्थितीचे उत्तम प्रतिबिंब कराची-अधिवेशनात दिसून आले. हिंदुस्थानातील राष्ट्रीय चळवळीचा वाढता आणि जोरदार कोंब पाहून शांत व गंभीर समाधानाची छटा तेथे उमटलेली होती. जनतेविषयी विश्वास वाटत असल्यामुळे उत्साहातदेखील धिम्मेपणा दृग्गोचर होत होता. पण पुढ्यात पसरलेल्या प्रचंड प्रश्नांच्या व संकटांच्या जबाबदारीची विस्मृती मात्र मनाला झाली नाही. काँग्रेसच्या शब्दागणिक व ठरावागणिक देशव्यापी कार्ये चालू व्हावयाची असल्याकारणाने ते सहजासहजी उच्चारणे अथवा पसार करणे शक्य नव्हते. काँग्रेस उद्यावर येऊन ठेपली; इतक्यात एक अतिशय क्षोभजनक प्रकार घडला. भगतसिंगाला फाशी देण्यात आले. त्यामुळे उत्तर हिंदुस्थानातील जनता विशेष क्षुब्ध झाली.

पूर्वीच्या कोणत्याही काँग्रेसमध्ये मिळाला नाही एवढा वैयक्तिक विजय गांधीजींना कराची-काँग्रेसमध्ये मिळाला. अध्यक्ष वल्लभभाई पटेल हे हिंदुस्थानातील अतिशय लोकप्रिय आणि वजनदार पुढारी होते; व गुजरातमधील विजयामुळे त्यांची उदंड कीर्ती झालेली होती. परंतु कराची अधिवेशनातील खरे सूत्रचालक महात्माजीच होते. अबदुल गफारखान यांच्या नेतृत्वाखाली "लाल डगलेवाल्यां"ची फौजही कराचीला आली होती. ते फार लोकप्रिय झाले. १९३० सालापासून चाललेल्या गांजणुकीला मोठ्या विलक्षण धैर्याने व शांत मनाने त्यांनी तोंड दिल्याकारणाने हिंदुस्थानभर त्यांची वाहवा झाली होती. त्यामुळे ते जात तेथे त्यांचे सहर्ष स्वागत होई.

कराची-काँग्रेसमधील मुख्य ठराव दिल्ली-समेट व मंडलाकार परिषद यांच्यासंबंधी होता. माझ्या भावना काय आहेत व मी ठरावाला पूर्णपणे का पाठिंबा देत आहे, याचे स्पष्टीकरण मी त्या अफाट जनसमुदायापुढे अगदी मोकळेपणाने केले, व ठरावाला श्रोतृवर्गानेही पाठिंबा द्यावा अशी विनंती केली. माझ्या अंतःकरणाचे बोलच त्या भाषणात उमटले होते; त्यात अलंकार अथवा शब्दलालित्य नसूनही ते फार उत्तम वठले. पूर्वतयारीनंतर केलेल्या माझ्या अनेक भाषणांहून ते भाषण सरस झाले. ह्याशिवाय भगतसिंगाच्या ठरावावर व मूलभूत हक्कांच्या व आर्थिक धोरणासंबंधीच्या ठरावावरदेखील मी भाषणे केली. आर्थिक धोरणाच्या ठरावाकडे माझे

विशेष लक्ष होते. त्या ठरावात एका नव्या दृष्टीचा अंतर्भाव झालेला होता. कराचीच्या ठरावाप्रमाणे मुख्य धंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निश्चय करून कॉंग्रेसने समाजवादाच्या दिशेने अत्यंत अल्प अशी प्रगती केली. अर्थातच त्या ठरावात समाजवाद असा यत्किंचितही नव्हता. एखाद्या भांडवलदार राष्ट्रालासुद्धा त्या ठरावातील सर्व मुद्दे मान्य झाले असते.

आम्ही कराचीस असतानाच कानपूर येथील हिंदु-मुसलमानांच्या दंग्याचे वृत्त आम्हाला कळले. लोकांना मदन करण्याचे कार्य करीत असता गणेश शंकर विद्यार्थी यांना जातीय भावनेने बेहोष झालेल्या लोकसमुदायाने जीवे मारल्याचे वृत्तही त्यानंतर लगेच आमच्या कानी आले. त्या भीषण व पाशवी दंग्याची बातमी मुळात खेदजनक होतीच; परंतु गणेशजींच्या मृत्यूमुळे आमच्या अंतःकरणाला असह्य वेदना झाल्या. जनतेच्या अज्ञानाने त्यांचा बळी घेतला आणि कानपूरचे व सर्व प्रांतांचे एक अत्यंत तेजस्वी रत्न हरपून गेले ! त्यांच्या निधनामुळे कराची येथील संयुक्तप्रांतीय लोकांच्या छावणीत दुःखाचा अंधार पसरला. आनंद लोपून गेल्याप्रमाणे आम्हाला वाटले. पण मृत्यूच्या छातीशी धैर्याने छाती भिडवून त्यांनी वीरोचित मरण पत्करले, ह्याबद्दल आम्हाला अभिमानही वाटला.

# समेटाच्या कालातील कटकटी १५

मंडलाकार परिषदेला गांधीजींनी जावे न जावे, ह्या प्रश्नाची भवति न भवति एकसारखी सुरू होती. पण काही निश्चित उत्तर मिळेच ना. देशातील परिस्थिती भराभर बदलत होती. बंगाल, संयुक्त प्रांत, आणि सरहद्द प्रांत यांतील बदल चांगलाच लक्षात येण्याजोगा होता. बंगालमधील हजारो राजबंदी तसेच तुरुंगात राहिले. दिल्ली-समेटाचा त्यांना काहीच फायदा झाला नाही. शिवाय, स्थानबद्ध कैदी होते ते निराळेच. राजद्रोहाच्या निमित्ताने नव्या नव्या लोकांची धरपकड सुरूच होती. सरकारने अगदी

समेटापूर्वीच्याच नेटाने दडपशाहीचे सत्र चालू ठेविले आहे असे दिसून येत होते.

संयुक्त प्रांतातील शेतकऱ्यांचा प्रश्न फारच बिकट होत चालला होता. ह्या संबंधात प्रांतिक सरकारने कालहरणाचे धोरण स्वीकारले होते. धाकदपटशा देऊन वसुलीला सुरुवातही करण्यात आली. जप्त्या वगैरेंचे सत्र सरसकट सुरू झाले होते. सरहद्द प्रांतातही बंगालप्रमाणेच परिस्थिती होती. तेथील राज्यकारभार नेहमीच लष्करी स्वरूपाचा असे, व खास कायद्याप्रमाणे व वटहुकुमाप्रमाणे व्यवस्था चालत असून साध्या गुन्ह्याबद्दल भयंकर कडक शिक्षा देण्यात येई. त्यामुळे तेथे नेहमीच आग धुमसत असायची. अशा प्रकारच्या जुलमी राज्यकारभाराचा प्रतिकार करण्यासाठी अब्दुल गफारखान यांनी फार मोठी चळवळ सुरू केली. लवकरच सरकारच्या डोळ्यात ते सलू लागले. सहा फूट तीन इंच उंचीचा त्यांचा धिप्पाड देह खेडोपाडी नजरेस पडू लागला. त्यांना 'फक्र-इ-पठाण' म्हणजे 'पठाणांचा अभिमान' अथवा 'गांधी-इ-सरहद्द' म्हणजे 'सरहद्द-गांधी' असे संबोधण्यात येई. आपल्या धीम्या व चिकाटीच्या प्रयत्नांच्या जोरावर त्यांनी विलक्षण लोकप्रियता संपादन केली होती. सरकारच्या दडपशाहीमुळे त्यांचे धैर्य अणुमात्र खचले नाही. नेहमीच्या अर्थाने त्यांना मुत्सद्दी म्हणता येणार नाही; शरीराने जसे ते सरळ, तसे ते मनानेही सरळ आहेत. अवडंबर अथवा पाल्हाळ माजवण्याचा त्यांना तिटकारा आहे. गांधीजींनी शांततामय मार्गाने चढाई कशी करावी, हे दाखवून दिले होतेच; तो मार्ग अब्दुल गफारखानांना पटला. पण चढाई करावयाची तर संघटना हवी; म्हणून ते संघटनेच्या उद्योगाला लागले. संघटनेचे नियम करण्याची विशेष फिकीर न करता त्यांनी संघटनेला सुरुवात केली व त्यात त्यांना अपूर्व असे यशही मिळाले.

मंडलाकार परिषदेसाठी शक्य तर कॉंग्रेसचा प्रतिनिधी मिळविण्याचे प्रयत्न चालू होते. दोन वेळा सिमल्याला जाऊन गांधीजींनी व्हाइसरॉय व इतर अधिकारी यांच्याबरोबर चर्चा केली. बंगालव्यतिरिक्त सरकारच्या घशात खवखवत असणारे दोन प्रश्न म्हणजे एक लाल डगलेवाल्यांचा, व दुसरा संयुक्त प्रांतातील शेतकऱ्यांचा. त्याविषयीसुद्धा ऊहापोह झाला. सिमल्याहून

गांधीजींनी मला बोलावणे पाठविले म्हणून तेथे जाऊन मी सरकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. आमची चर्चा संयुक्त प्रांतातील प्रश्नापुरतीच मर्यादित होती. आम्ही अगदी दिलखुलास बोललो. वरकरणी चाललेल्या आरोप–प्रत्यारोपाच्या तळाशी दडलेल्या विरोधांविषयीसुद्धा तेथे बोलणे-चालणे झाले. १९३० च्या फेब्रुवारीमध्ये सरकारची अशी संगीन तयारी होती की, अधिकात अधिक म्हणजे तीन महिन्यांच्या आत कायदेभंगाची चळवळ सरकारला पाळामुळांसकट नांगरून काढता आली असती, असे मला सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले. दडपशाहीचे सारे यंत्र जय्यत तयार होते. एक झटका दिला, एक कळ दाबली, की यंत्र सुरू !

गांधीजी पहिल्या खेपेला सिमल्यास गेले तेव्हा मंडलाकार परिषदेला जाण्या न जाण्याचा प्रश्न तसाच अनिर्णित राहिला होता. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात ते दुसऱ्यांदा सिमल्यास गेले. तेव्हा मात्र काही तरी निर्णय करणे भागच होते. पण हिंदुस्थान सोडून जाण्यास त्यांचे मन अद्यापि तयार होईना. कारण बंगाल, संयुक्त प्रांत व सरहद्द प्रांत या ठिकाणी वादळ होणार अशी स्पष्ट चिन्हे दिसू लागली होती. सरते शेवटी उभय पक्षांना मान्य असा मसुदा एकदाचा तयार झाला व तो एका पत्रकात नमूद होऊन काही पत्रोत्तरेही झाली. मंडलाकार परिषदेचे प्रतिनिधी ज्या बोटीने निघणार होते त्या बोटीनेच गांधीजींना जाता यावे म्हणून अगदी शेवटच्या क्षणी मसुदा तयार करण्यात आला. तसे म्हटले तर शेवटचा क्षणही उलटून गेला होता. कारण, सिमल्याहून निघणारी शेवटची गाडी आधीच निघून गेली होती. पण सिमला ते काल्कापर्यंत खास गाडीची व्यवस्था करण्यात येऊन गांधीजींना पुढील गाडी गाठता यावी म्हणून इतर गाड्यांची खोटी करण्यात आली. मी गांधीजींबरोबर सिमल्याहून मुंबईपर्यंत गेलो. ऑगस्टच्या अखेरीअखेरीला एके दिवशी सकाळी मी त्यांना निरोप दिला. पश्चिम समुद्राकडे नाळ फिरवून बोटीचे पंखे पाणी कापू लागले. त्या वेळी स्वच्छ ऊन पडले होते. त्यानंतर दोन वर्षे मला त्यांचे दर्शन झाले नाही.

काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून गांधीजी मंडलाकार परिषदेला गेले. खूप ऊहापोह होऊन शेवटी असे ठरले होते की, त्यांच्याव्यतिरिक्त दुसरा प्रतिनिधी पाठवावयाचा नाही. परिस्थितीत बिघाड होऊ नये व आमची

संघटना शाबूत राखावी अशा दृष्टीने आम्ही प्रयत्न चालू ठेवले. एकमेव प्रतिनिधी लंडनला पाठविण्याचे खरे कारण हेच एक होते असे नव्हे. अवश्य व इष्ट दिसले असते तर इतरही लोकांना आम्ही धाडले असते. पण असे करण्याचे आम्ही मुद्दामच टाळले. राज्यघटनेतील बारीक पापुद्रे सावकाशपणे सोलीत व सोडवीत बसण्यासाठी आम्ही मंडलाकार परिषदेला हजर राहणार नव्हतो. लोकसत्ताक हिंदुस्थानच्या हाती किती सत्ता पडणार, हा खरा महत्त्वाचा प्रश्न होता. नंतरचे तपशील ठरविण्याचे व मसुदा तयार करण्याचे काम एखाद्या सॉलिसिटरनेसुद्धा उरकून टाकले असते.

पण मुद्द्याच्या गोष्टीवरच मतभेद झाला तर विगतवार चर्चा करण्याची जरूरीच नव्हती. आणि मंडलाकार परिषदेसाठी अधिक प्रतिनिधी पाठविण्याचेही कारण नव्हते. म्हणून एकट्या गांधीजींनाच पाठवावयाचे ठरले. सरोजिनी नायडू परिषदेला गेल्या होत्या; पण त्यांना हिंदी स्त्रियांच्या प्रतिनिधी म्हणून सरकारने निमंत्रण केले म्हणून त्या गेल्या. वर्किंग कमिटीनेही त्यांना जाण्याची परवानगी दिली.

आमच्या विरुद्ध बाजूचे पारडे कमालीचे जड होते. तेथे काही फलनिष्पत्ती होईल अशी अपेक्षा आम्ही अगोदरपासून बाळगलीच नव्हती; तरीसुद्धा परिषदेतील घडामोडींकडे पाहून आम्ही आश्चर्यमूढ होऊन गेलो. मनाला शिसारी वाटू लागली. राष्ट्रीय व आर्थिक प्रश्नांच्या वर्मी घावांवर मलमपट्टी लावण्याचे वरपांगी प्रयत्न चालले होते. डावपेच आणि कारस्थाने सुरू होती, आमचेच काही देशबांधव कट्टर साम्राज्यवादी ब्रिटिशांच्या गळामिठी पडत होते, क्षुद्र प्रश्नांचा काथ्याकूट चालला होता, जिव्हाळ्याचे प्रश्न अडगळीत लोटण्यात येत होते, आपसातील डोकेफोड थांबली नव्हती, मेजवान्या व अहोरूपमहोध्वनीच्या मजलशी झडत होत्या. हा सारा हमामा पाहून परमावधीचा खेद झाला. नोकऱ्यांसाठी गोळा झालेल्या गिधाडांची पंगत तेथे बसली होती—मोठ्या नोकऱ्या, छोट्या नोकऱ्या, हिंदूंसाठी नोकऱ्या, मुसलमानांसाठी नोकऱ्या, शीखांसाठी नोकऱ्या, अँग्लो-इंडियनांसाठी नोकऱ्या, युरोपियनांसाठी नोकऱ्या;—पण ही सर्व नोकऱ्यांची कावकाव वरच्या लोकांसाठी. पंक्तीत जनतेसाठी एकही पाट नव्हता! संधिसाधूपणाचा तेथे कळस झाला. भुकेलेल्या लांडग्याप्रमाणे निरनिराळे गट नव्या राज्य-

घटनेनुसार मिळणाऱ्या मांसखंडाच्या आशेने जिभा चाटीत अवतीभोवती वावरत होते. स्वातंत्र्य म्हणजे नोकरीचा बाजार—त्याचे गोंडस नाव 'हिंदीकरण' हे आहे—असा अर्थ होऊन सैन्यखाते व मुलकीखाते यांत अधिक हिंदी लोकांची वर्णी लावा, असा गोंगाट सुरू झाला.

सरकारने त्या वेळी डाव साधला हे निःसंशय. साम्राज्य टिकविण्यास अवश्य ती दंडशक्ती आमच्यापाशी आहेच, पण त्याच्या जोडीला मुत्सद्देगिरी व आवडाव हेही आहेत याचे प्रत्यंतर सरकारने पटवून दिले. हिंदी लोकांना अपयश आले याचे कारण असे की, लक्ष्यासंबंधी त्यांची विचारसरणी पक्की झालेली नसल्यामुळे त्यांची दिशाभूल सहज करता आली. आमच्या प्रगतीच्या आड पदोपदी येणाऱ्या वरिष्ठ वर्गातील लोकांच्या स्वार्थाचे जू फेकून देण्याइतकी शक्ती आमच्या अंगात आलेली नव्हती, तेही आमच्या अपयशाचे कारण आहे. धार्मिक भावनेचा कडवेपणा, व छू म्हणता उत्तेजित करता येण्यासारखी जातिनिष्ठा या गोष्टीदेखील आम्हाला आलेल्या अपयशाच्या बुडाशी आहेतच.

# समेटाची इतिश्री १६

संयुक्त प्रांतातील घडामोडींत मी गुंतून पडलो असलो, तरी जी दुसरी दोन वादळाची केंद्रे बंगाल व सरहद्द प्रांत, तेथे जाऊन यावे असे अनेकदा मनात येत असे. जाग्यावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती अवलोकन करावी, सहकाऱ्यांना भेटावे, असा माझा विचार होता. पण त्याहूनही बलवत्तर इच्छा अशी होती की, त्या प्रांतातील लोकांनी राष्ट्रीय चळवळीत जे शौर्य व तेज प्रकट केले, त्याविषयी कृतज्ञता आपण व्यक्त करावी. सरकारी धोरणामुळे सरहद्द प्रांतात जाण्याचा नाद मला सोडून द्यावा लागला.

बंगालमधील परिस्थितीही विनसत चालली होती. गांधीजी लंडनला पोचल्यावर अचानकपणे हिजली व चितगाव येथे असे दोन प्रसंग घडून आले की, सर्व हिंदुस्थानचे डोळे बंगालवर खिळून राहिले.

हिजली येथे स्थानबद्ध राजबंद्यांचा एक खास तुरुंग होता. तेथे दंगा उद्भवून राजबंद्यांनी अधिकाऱ्यांवर हल्ला चढविला, तेव्हा निरुपायाने अधिकाऱ्यांना गोळीबार करणे भाग पडले, असे वृत्त सरकारमार्फत जाहीर करण्यात आले. या गोळीबारात एक बंदी मरण पावला व बऱ्याच जणांना जखमा झाल्या. तदनंतर सरकारमार्फत नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने अधिकारी सर्वतोपरी निर्दोषी आहेत असा निर्णय दिला. पण तत्संबंधी ज्या काही बातम्या बाहेर फुटल्या, त्यांचा सरकारी हकीकतीशी मेळ बसेना. तेव्हा कसून अधिक चौकशी करण्यात यावी म्हणून सगळीकडून ओरड सुरू झाली. आपल्या नेहमीच्या वहिवाटीला सोडून सरकारने न्यायखात्यातील उच्च अधिकाऱ्यांची एक चौकशी-समिती नेमली. समिती सरकारनियुक्त खरी, पण तिचा निर्णय मात्र तुरुंगावरील अधिकाऱ्यांच्या विरुद्ध गेला !

चितगाव प्रकरणाचे स्वरूप ह्यापेक्षा बरेच गंभीर होते. एका दहशतवाद्याने एका मुसलमान पोलिस-अधिकाऱ्याला गोळी झाडून ठार केले. असे प्रसिद्ध झाले की त्यानंतर हिंदु—मुसलमानांचा दंगा झाला. दहशतवाद्यांच्या कृत्याचा जातीय प्रश्नाशी काहीएक संबंध नव्हता, हे निःसंशय. पोलिस-अधिकाऱ्यावर त्याला हत्यार चालवावयाचे होते; मग तो हिंदू असो की मुसलमान असो. दंग्याला सुरुवात कोणी केली, निमित्त काय घडले, वगैरे गोष्टींचा खुलासा झाला नाही. दंग्याच्या वेळी विशेष प्रकार घडला तो असा की, ॲंग्लो-इंडियन वगैरे गटांनी दंग्यात बराचसा भाग घेतला. श्री. सेनगुप्त वगैरे बंगालमधील पुढाऱ्यांनी या प्रकरणाच्या बाबतीत रोखठोक आरोप केले व दंग्याची चौकशी व्हावी अगर आमच्यावर अब्रूनुकसानीची फिर्याद लावावी असे आव्हान दिले; पण सरकारने हू की चू केले नाही.

१९३१ च्या नोव्हेंबरमध्ये मी कलकत्त्याला काही दिवस राहिलो होतो. तेथील माझा कार्यक्रम भरगच्च झाला. व्यक्तींना व निरनिराळ्या गटांना मी खाजगी रीतीने भेटलोच; पण जाहीर व्याख्यानेही बरीचशी झाली. ह्या सर्व सभांतून दहशतवादासंबंधी मी चर्चा केली, आणि तो किती चुकीचा व निष्फळ आहे आणि हिंदी स्वातंत्र्याला तो किती विघातक होईल, हे पटवून देण्याचा मी प्रयत्न केला.

शेवटच्या दिवशी संध्याकाळी स्टेशनवर निघण्याच्या आधी काही वेळ दोन

तरुण मुले मला भेटण्यासाठी आली. त्यांचे वय वीस-एक वर्षांचे असेल नसेल. त्यांचे चेहरे फिकट व भावनापूर्ण आणि डोळे फार पाणीदार असे दिसत होते. त्यांची नावे मला माहीत नसली, तरी त्यांचे काय काम असावे हे मी ताबडतोब ओळखले. दहशतवादाविरुद्ध मी मतप्रचार केला, म्हणून ते माझ्यावर अतिशय संतापले होते. तरुणांच्या मनांवर तुमच्या भाषणाचा अतिशय वाईट परिणाम होत आहे, तुमची ही लुडबुड आम्हांला खपणार नाही, असे त्यांनी बजाविले. आमच्यात थोडी चकमक उडाली आणि माझी निघण्याची वेळ झाली असल्यामुळे उत्तर-प्रत्युत्तर फार घाईघाईने करावे लागले. मला वाटते, दोन्ही बाजूंचे आवाज व संतापाचा पारा चढला असावा. त्यांना लागतील असे काही शब्दहा माझ्या तोंडून निघून गेले. " तुमचा हा अनिष्ट उद्योग तसाच चालू राहिला तर इतरांप्रमाणेच तुमचीही वाट लावल्या-वाचून आम्ही राहणार नाही " असा इषारा त्यांनी मला निघताना देऊन ठेवला ! कलकत्ता स्टेशनवरून गाडी हालली व मी अंथरुणावर जाऊन पडलो. पण किती वेळ तरी त्या मुलांचे संतापाने लाल झालेले चेहरे माझ्या डोळ्यांपुढून हालेनात. त्यांच्या डोळ्यांत तेजाची आणि उत्साहाची चमक होती. मी इतक्या घाईघाईने व डाफरून त्यांच्याशी बोललो, ह्याबद्दल मला पश्चात्ताप झाला. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी व सेवेसाठी जरा निराळ्या मार्गाने आपले तेजस्वी जीवन समर्पण करा, असा उपदेश करून मला त्यांची कदाचित खात्रीही पटविता आली असती; कारण इतर मार्गाने गेले, तरीही धाडस व त्याग करण्याची संधी त्यांना हवी तितकी मिळण्यासारखी होती. त्यानंतरच्या काळात त्या मुलांविषयी पुष्कळदा माझ्या मनात विचार येऊन गेले. कधी कधी मनात विचार येतो की, ते मुलगे गतप्राण तर झाले नसतील ना ? अंदमानमधील एखाद्या कोठडीत ते खितपत तर पडले नसतील ना ?

डिसेंबर उजाडला. अलाहाबादची दुसरी शेतकरी परिषद आटोपली व मी घाईघाईने कर्नाटकच्या दौऱ्यावर गेलो. स्वयंसेवकदलाचे मुख्य ठिकाण कर्नाटक प्रांतात हुबळी येथे होते. हुबळीचे काम संपल्यावर कर्नाटकमध्ये मी ठिकठिकाणी हिंडलो. सर्वत्र दिसून येणारा जनतेचा उत्साह पाहून मी चकित झालो. परत येताना वाटेत लष्करी कायद्यामुळे प्रसिद्धीस आलेल्या सोलापूर शहरासही मी भेट दिली. माझा कर्नाटकातील दौरा म्हणजे निरोपाच्या

समारंभाप्रमाणे झाला. तेथील माझी भाषणे अखेरचीच ठरली ! संयुक्त प्रांतातून आलेल्या बातम्यांचे स्वरूप अगदी उघड होते. सरकारने खूप निकराचा हल्ला चढविला होता.

अलाहाबादला जाण्यासाठी मी अगदी उतावीळ झालो होतो. संयुक्त प्रांतात जाऊन माझ्या सहकाऱ्यांच्या खांद्यांशी खांदा लावून उभे राहणे हे कर्तव्य आहे, असे मला वाटले. पुरुषोत्तमदास टंडन वगैरेंच्या अटकेची बातमी अलाहाबादेहून आली होतीच. शिवाय त्या आठवड्यात आमची प्रांतिक परिषद इटावा येथे भरण्याचेही नक्की झाले होते. प्रथम अलाहाबादला जावे व नंतर गांधीजींना भेटण्यासाठी व वर्किंग कमिटीच्या बैठकीसाठी आपण मोकळे असलो तर मुंबईला परत यावे, असा विचार मी ठरविला. मुंबईहून मी निघालो तेव्हा कमला अंथरूण धरूनच होती. अलाहाबादला पोचण्यापूर्वी चौकी-स्टेशनवरच नव्या वटहुकुमान्वये माझ्यावर निर्बंध बजावण्यात आला. नंतर अलाहाबाद स्टेशनवर त्याच हुकुमाची दुसरी एक नक्कल व माझ्या घरी तिसरी एक नक्कल मजवर बजावण्यात आली. कोठेही फट राहू द्यावयाची नाही असा सरकारचा उद्देश असावा. मी अलाहाबाद नगरपालिकेच्या हद्दीत राहावे, कोणत्याही सार्वजनिक सभेला अथवा समारंभाला उपस्थित राहू नये आणि तेथे भाषण करू नये, कोणत्याही वृत्तपत्रात अथवा हस्तपत्रकात लिहू-सवरू नये, असा त्या निर्बंधाचा आशय होता. इतरही अनेक बंधने लादण्यात आली होतीच.

मी असे ठरविले की, २६ डिसेंबर रोजी सकाळी अलाहाबादहून निघून मुंबईस जावे. संयुक्त प्रांतातील परिस्थितीसंबंधी विचारविनिमय करण्यासाठी शेरवाणींना मुद्दाम बोलावण्यात आले होते. अलाहाबाद शहर सोडून न जाण्याचे निर्बंध आम्हा दोघांवरही होतेच. गाडीत बसल्यावर लगेच सकाळच्या वृत्तपत्रांत सरहद्द प्रांतातील नव्या वटहुकुमासंबंधी व खान अब्दुल गफारखान, डॉ. खानसाहेब, व इतर लोक यांच्या अटकेसंबंधी बातमी वाचावयास मिळाली. थोड्याच वेळात आमची बॉम्बे मेल इरादतगंज येथे एकाएकी थांबली. बॉम्बे मेल तेथे थांबत नसे. पोलिस अधिकारी आमच्या डब्यात शिरले व त्यांनी आम्हाला अटक केली. रस्त्यावर

पोलिसांची मोटर उभी होतीच. तीत आम्हांला बसविल्यावर मोटर नैनी तुरुंगाकडे वेगाने निघाली.

४ जानेवारी १९३२ हा संस्मरणीय दिवस ठरला; कारण सगळाच वाद-विवाद आणि चर्चा त्या दिवशी बंद पडली. त्या दिवशी पहाटे गांधीजी व वल्लभभाई यांना अटक करून चौकशीविना दरबारी बंदी म्हणून तुरुंगात टाकण्यात आले. चार नवीन वटहुकूम निघून मॅजिस्ट्रेट व पोलिस अधिकारी यांना व्यापक अधिकार देण्यात आले. सर्व हिंदुस्थानभर लष्करी कायदा पुकारल्याप्रमाणे परिस्थिती निर्माण झाली.

नैनीच्या तुरुंगात आमचा खटला ४ जानेवारी रोजीच सुरू झाला. शेरवाणी यांना सहा महिने सक्तमजुरी व १५० रुपये दंड, व मला दोन वर्षे सक्तमजुरी व ५०० रुपये दंड (दंड न दिल्यास सहा महिने शिक्षा), अशा शिक्षा झाल्या. आमचा गुन्हा एकच होता. आमच्यावरील निर्बंधही एकाच प्रकारचे होते. आम्ही दोघेही मुंबईला जात होतो. आम्हांला अटकदेखील एकदमच करण्यात आली व एकाच वेळी आमची चौकशी झाली. पण शिक्षा झाल्या, त्यात मात्र इतका फरक पडला !

त्या दिवशी सर्व देशभर अनेक उत्पात घडले. आमचा खटला सुरू होता तेथून नजिकच असणाऱ्या अलाहाबादेत प्रचंड जनसमुदायाची व पोलिस-लष्कराची चकमक उडाली. नेहमीप्रमाणे लाठीमार झाला, काही लोकांचे मुडदे पडले, व काही लोकांना जखमा झाल्या. सत्याग्रही कैद्यांमुळे तुरुंग भरून गेले. कॉंग्रेस बेकायदा ठरविण्यात आली. वर्किंग कमिटीपासून ते थेट किरकोळ स्थानिक संस्थांपर्यंत असंख्य संघटना बेकायदा ठरल्या. किसान-सभा, युवक-संघ, विद्यार्थी-मंडळे, राष्ट्रीय विश्वविद्यालये, रुग्णालये, स्वदेशी उद्योगधंदे, वाचनालये,— एकंदरीत ज्यांचा ज्यांचा म्हणून कॉंग्रेसशी काही संबंध पोचत होता, अशा सर्व संस्था बेकायदा ठरविण्यात आल्या. अशा संस्थांची संख्या हजारांनी मोजता येईल. ही कॉंग्रेसची व राष्ट्रीय चळवळीची थोरवी नव्हे तर काय ?

माझी पत्नी मुंबईलाच दुखण्यामुळे पडून होती. कायदेभंगात भाग घेता येत नाही याबद्दल तिच्या जिवाला यातना होत. माझी आई व माझ्या दोन बहिणी यांनी कामाचा धूमधडाका सुरू केला, व थोड्याच दिवसांत

दोन्ही बहिणींना एक एक वर्षाची शिक्षा झाली. नवे सत्याग्रही आले की त्यांच्या तोंडून व आम्हाला मिळणाऱ्या साप्ताहिक वर्तमानपत्रांतून बाहेरच्या घडामोडींच्या तुटक्याफुटक्या बातम्या आम्हाला कळत.

बाहेरच्या वादळापासून अलिप्त असे आम्ही नैनीच्या तुरुंगात मुकाट बसलो होतो. तरीही आमचे मन बाहेरच्या वातावरणाशी अनेक रीतींनी निगडित झालेले असे. कातण्यात, वाचण्यात अथवा इतर काही तरी करण्यात आमचा वेळ निघून जाई. काही गोष्टींवर चर्चाही होई, पण आमचे सारे लक्ष भिंतीपलीकडे काय घडत आहे तिकडे होते. शरीराने रणक्षेत्राच्या बाहेर, पण मनाने रणक्षेत्राच्या आत अशी आमची स्थिती होती. उद्या काय दंगल उडते, कसली रणधुमाळी माजते, कोणत्या प्रकारचा उत्साह दृष्टीस पडतो, कसल्या प्रकारच्या दडपशाहीची व भ्याडपणाची बातमी कानी पडते, असे विचार मनात घोळत राहात. हे गाडे जाणार तरी कोठे? आम्ही कोणीकडे चाललो आहोत? एका गोष्टीची मात्र आम्ही पक्की खूणगाठ बांधून ठेवली होती की, सध्या व पुढेही झुंजण्याचे, कष्टाचे, त्यागाचे प्रसंग सदोदित येत राहणार आहेत.

**होईल पुनरपी झुंज उद्या मैदानी**
**झळकेल अतिरथी पलाश-पुष्पावाणी**
**ते समर-धुरंधर वावरतील सलील**
**त्रैलोक्य-सुंदरी तटावरुनि पाहील**
**मग झळकू आम्ही रणी होउनी गाजी**
**वा सडून जाऊ कृतान्तछायेमाजी !**
**आंदोलत आशानिराशेमधी अंध**
**लाविले पणाला प्राण अम्ही बेबंद—**
**काळजी कुणाला देहाची असणार**
**पसरला भविष्यावरी घोर अंधार !**

**—मॅथ्यू आर्नल्डच्या इंग्रजी कवितेवरून**

~~~~
~~~~

वा. क्र. ९६८७ दिनांक
विषय ९।८।७



## भावतरंग

बरेलीच्या तुरुंगातून माझी व गोविंद वल्लभ पंत यांची डेहराडून जेलकडे रवानगी झाली. लोकांची गर्दी वगैरे टाळण्याकरिता आम्हाला बरेली येथे गाडीत न बसविता ५० मैलांवरील एका आड-स्टेशनवर नेण्यात आले. रात्रीच्या वेळी आम्हास गुप्तपणे मोटरीतून स्टेशनवर पोचते करण्यात आले. पुष्कळ महिन्यांच्या एकान्तवासानंतर रात्रीच्या थंड वेळचा तो मोटरीतील प्रवास आम्हाला फारच आल्हाददायक वाटला.

नैनी व बरेलीच्या तुरुंगात माझ्याबरोबर पुष्कळ सहकारी होते. डेहराडून येथे सुरुवातीला गोविंद वल्लभ पंत, काशीपूरचे कुंवर आनंदसिंग व मी असे तिघेजण होतो. १९३३ च्या जानेवारीत माझे सर्व सहकारी सुटले. तेव्हा-पासून तो ऑगस्टअखेर माझी सुटका होईपर्यंत जवळ जवळ आठ महिने मला एकट्यालाच तेथे राहावे लागले. हा सर्व काळ मोठा रूक्ष असा गेला. गाठीभेटी पुनः सुरू झाल्यावर जिवाला थोडासा विरंगुळा मिळाला. मला वाटते, माझ्यावर खास मेहेरबानी म्हणून बाहेरून ताजी फुले व चारदोन फोटो खोलीत ठेवण्याची मला परवानगी देण्यात आली होती.

तुरुंगात असले म्हणजे मनुष्याला बारीकसारीक गोष्टींचे महत्त्व समजून येते व बाहेरच्या जगात ज्या चिजा आपण केराच्या टोपलीत फेकून देऊ, त्या तुरुंगात माणूस मोठ्या आस्थेने जवळ बाळगून ठेवतो. मालकी सांगण्या-सारखी व जतन करण्यासारखी चीजवस्तू जवळ नसली, तरीदेखील मनातली मालकी-हक्काची भावना काही नष्ट होत नाही !

कधी कधी जीवनातील सुखोपभोगासाठी शरीर तृषार्त होते. शारीरिक सुख मिळावे, भोवती रम्य वातावरण असावे, मित्रमंडळींचा सहवास घडावा, चमकदार संभाषणाची माधुरी चाखावी, मुलाबाळांबरोबर खेळात दंग व्हावे, इत्यादी इत्यादी...... वर्तमानपत्रातील एखादे चित्र पाहून अगर एखादा परिच्छेद वाचून तरुणपणच्या निष्काळजी जीवनाचे दृश्य डोळ्यांपुढे ... मन: घराकडे धाव घेऊ लागे. अशा वेळी सर्व दिवस—

भर मन अस्वस्थ ...

दररोज थोडेसे सूत कातण्याचा मी क्रम ठेवला होता. मानसिक श्रम फार झाले म्हणजे अशा तऱ्हेच्या हस्तव्यवसायामुळे मनाला आराम मिळतो. परंतु लेखन व वाचन हाच माझा मुख्य उद्योग होता. निर्बंधाच्या चाळणीतून मला हवी ती सर्वच पुस्तके सुटत नसत. तथापि एकंदरीत बरीच पुस्तके माझ्या संग्रहाला असत; तेव्हा मला तक्रार करण्यास जागा नाही. एका विषयाचे वाचन संपले की दुसरा विषय घ्यावा, असे चालले होते. पण विषय बहुधा "जाडे"च असत. कादंबऱ्यांमुळे मन सुस्त होत जाते म्हणून त्या मी फारसा वाचीत नसे. वाचनाचा कंटाळा आला की लेखणी उचलायची. माझ्या मुलीला मी जी इतिहासविषयक पत्रे लिहिली, ती मला तब्बल दोन वर्षे पुरली; त्यांच्या योगाने माझे मनही चांगले तल्लख राहिले. ती लिहीत असता मी गतकालातच वावरत आहे, असे वाटून तुरुंगातील परिस्थितीचा मला विसर पडत असे.

ह्यूएन्त्सांग, मार्कोपोलो, आणि इब्न बतूता वगैरे पुराण्या प्रवाशांचे इतिहास आणि मध्य आशियाचा प्रवास करणारा स्वेन हेडिन व तिबेटमध्ये अनेक साहसांशी झुंजणारा रोरिश वगैरे आधुनिक प्रवाशांची वर्णने नेहमीच वाचावीशी वाटत. चित्रांची पुस्तके व त्यातल्यात्यात पर्वतांच्या, हिमनद्यांच्या व वाळवंटांच्या चित्रांची पुस्तके दूर करवत नसत. विस्तृत प्रदेश, अफाट महासागर व गगनभेदी पर्वत ह्यांच्या दर्शनासाठी तुरुंगात दृष्टी तहानेलेली असल्यामुळे अशा चित्रसंग्रहांची महती विशेषच वाटे. माउंट ब्लॅंक, आल्प्स व हिमालय यांची सुंदर चित्रे असलेला एक संग्रह मजजवळ होता. माझ्या कोठडीतील वातावरण ११५ डिग्रीपर्यंत पोचले अथवा त्याच्याही वर गेले, की मी तो संग्रह उघडून हिमनद्यांच्या चित्रांकडे पाहात बसत असे. नकाशा-संग्रहामुळे मनात विचारचक्र सुरू होई. आपण पाहिलेल्या स्थळांच्या स्मृती व जाऊ म्हणत होतो त्या स्थळांची स्वप्ने मनात रंगू लागत; आणि पूर्वपरिचित ठिकाणी पुनः जावे, ठिपक्या-ठिपक्यांनी दर्शविलेल्या नगरांचे, काळ्या रेषांनी दर्शविलेल्या पर्वतांचे व निळ्या रंगाने दर्शविलेल्या महासागरांचे दर्शन घेऊन जगातील रम्य स्थळांचा आनंद लुटावा आणि बदलत्या मानवी समाजातील झगड्यांचे व कलहांचे निरीक्षण करावे, यासाठी जिवाची तळमळ सुरू होई; आणि या तळमळीचा जोर वाढून गळा दाटून

आला की नकाशा-संग्रह बाजूला सारून पुनः माझ्या ओळखीच्या तटाच्या भिंताडाकडे पाहात नित्य दैनिक कार्यक्रमाला मी प्रारंभ करीत असे !

डेहराडूनच्या तुरुंगातील माझ्या लहानशा कोठडीत मी तब्बल साडेचौदा महिने घालविल्यावर मी जणू काही त्या खोलीचा दगडा-तुळवटासारखा एक भागच होऊन गेलो आहे, असे मला वाटू लागले. चुना दिलेल्या भिंतींवरच्या खाचखळग्यांच्या, जमिनीवरच्या व वाळवीने किडलेल्या छपरातील वाशांवरच्या एकूण एक खाणाखुणा माझ्या परिचयाच्या झाल्या होत्या. खोलीच्या बाहेर अंगण होते; त्यातील लहानसहान गवताचे पंदे अगर दगडधोंडे दृष्टीला पडले तरी जुने मित्र भेटल्याप्रमाणे मला हर्ष होई. माझ्या खोलीतदेखील मी एकटा राहात नव्हतो. बऱ्याच गांधिलमाशांनी आपला संसार तेथे थाटलेला होता. वाशांच्या आड पुष्कळ पाली राहात. विचार व भावनांचे ठसे वस्तुजातावर उमटत असते, तर त्या खोलीतील वातावरण अशा ठशांनी भरून गेले असते व त्या चिमुकल्या जागेतील प्रत्येक वस्तूवर ते पाहावयास सापडले असते.

बाहेरच्या वातावरणाला व देखाव्यांना मानासिकदृष्ट्या किती मोल आहे याची बरोबर कल्पना तुरुंगाच्या उंच उंच भिंतींच्या आड बरेच दिवस अडकून पडलेल्या कैद्यालाच येणे शक्य आहे. मोकळ्या वातावरणात फिरण्याची मला फार मौज वाटे. पावसाळ्यात पावसाच्या सरीवर सरी पडत राहात व घोटाभर पाण्यात चालावे लागे तरीसुद्धा बाहेर जाण्याचा क्रम मी सोडला नाही. बाहेरची हवा कोणत्याही स्थळी मिळाली असती तरी मी ती सोडली नसती; मग येथे तर काय, जवळच उभ्या असलेल्या गगनचुंबी हिमालयाचे दृश्य दिसत होते. तुरुंगातील कंटाळवाण्या जीवनाचे मालिन्य त्याच्या दर्शनामुळे बरेचसे झडून जाई. कित्येक दिवस मला भेटी मिळत नसत. कित्येक महिने मला एकट्याने काढावे लागले. अशा वेळी मला प्रिय वाटणाऱ्या गिरिशिखरांकडे पाहण्याची सवलत मिळाली, हे सुदैवच म्हटले पाहिजे.

**पक्ष्यांचे ते अगणित थवे दूर कोठे उडाले !**
**एकाकी हा जलद वळला, तोहि बाजूस चाले !**

**मी एकान्ती गिरिशिखर हे न्याहळीतो बसून,**
**अन्योन्यांचा मजसि गिरिला ये कधीही न शीण !**

डेहराडून येथील वसंतकाल फारच सुंदर असतो व खालच्या प्रदेशातल्यापेक्षा बराच अधिक काळ येथे त्याचे वास्तव्य होते. वनश्रीची हिरवी वस्त्रे शिशिर ऋतूने हरण करून नेली होती. झाडे उघडी-नागडी दिसत होती. तुरुंगाच्या दारासमोर उभ्या असलेल्या चार प्रचंड पिंपळांची पानेसुद्धा बहुतेक सगळीच्या सगळी गळून पडली, याचे मला मोठे नवल वाटले. खडबडीत व रूक्ष असे ते दिवस होते. पण वसंत-वाताने त्यांच्या अंगात ऊब आणली, नवजीवनाचा दिव्य संदेश त्यांच्या अणुरेणूंपर्यंत जाऊन पोचला. पिंपळांच्या व इतर झाडांत एकाएकी जणू काही सळसळ सुरू होऊन आतल्या आत काही गुप्त घडामोड चालू असावी तसे वातावरण त्यांच्या सभोवार उत्पन्न झाले. थोड्याच दिवसांत आश्चर्य घडून येईल आणि जिकडे तिकडे इवलाले हिरवे कोंब डोकावू लागतील ! किती मनोरम दृश्य आहे हे ! पाहता पाहता लक्षावधी पल्लवांच्या पताका उभारल्या जाऊन सूर्यप्रकाशात त्या तकाकू लागतील, वायुलहरींबरोबर डोलू लागतील. इतक्या थोड्या अवधीत कोंबांची पाने व्हावीत हा केवढा चमत्कार आहे ! आंब्याची नवी पालवी तांबडसर असते ही गोष्ट माझ्या लक्षात पूर्वी कधीच आली नव्हती. त्यांचा रक्तधूसर वर्ण, हिवाळ्यात काश्मीरातील टेकड्यांवर पसरणाऱ्या छटांप्रमाणे दिसतो. पण तो रंग फार वेळ टिकत नाही. लवकरच आंब्याची पाने हिरवी होतात.

नेहमीचे व्यवसाय बंद असल्यामुळे निसर्गाच्या लीलांकडे आमचे लक्ष जाऊ लागले. आम्हांला आढळणाऱ्या प्राण्यांची व कीटकांचीही आम्ही अधिक विचारपूस करू लागलो. बारकाईने निरीक्षण केल्यावर मला आढळून आले की, तऱ्हेतऱ्हेचे कृमि-कीटक माझ्या खोलीत व परड्यात वावरत आहेत. मी एकाकीपणाबद्दल तक्रार सांगतो खरा, पण माझ्या ओसाड भासणाऱ्या अंगणात जीवांची समृद्धी नांदत होती. सरपटणारे अथवा उडणारे हे सर्व कृमि-कीटक माझ्या वाटेस न जाता आपापली जीवनयात्रा आक्रमीत असत. मग मी तरी त्यांच्या जीवनात का बरे ढवळाढवळ करावी ? पण ढेकूण व

डांस यांच्याबरोबर मात्र माझे अखंड वैर चाललेले असे. माशांच्याही बाबतीत थोडाफार तोच प्रकार होता. गांधिलमाशा असल्या तरी मला चालत, आणि शेकडो गांधिलमाशा माझ्या खोलीत नांदतही होत्या. पण एक गांधिलमाशी मला चुकून चावली तेव्हा मात्र आमची थोडीशी जुंपली होती. संतापून मी त्यांच्या कुळाचाच संहार करण्यासाठी धावलो, पण आपले घरदार सांभाळण्यासाठी त्या किती निकाराने लढल्या! घरट्यात त्यांची अंडी असावीत. आपल्या वाटेला त्या जाणार नसतील तर राहीनात का बिचाऱ्या सुखाने, असा विचार करून मी हात आखडता घेतला. नंतर एक वर्षाहून अधिकच काळ मी त्याच कोठडीत होतो. गांधिलमाशा माझ्या आजूबाजूला वावरत असत, पण त्यांनी माझ्यावर केव्हाही हल्ला केला नाही. आम्ही एकमेकांचा मान राखून राहात असू.

झाडे जवळपास असली की खारींना तोटा नसतो. तो प्राणी भारीच धिटुकला! त्या माणसाच्या अगदी जवळ येतात. लखनौच्या तुरुंगात असताना घटका घटका मी जरासुद्धा न हालता वाचीत बसलो की एखादी खार माझ्या पायावरून चढून हळूच गुढघ्यावर येऊन बसे व सभोवर दृष्टी टाकी. माझी तिची नजरानजर झाली की मात्र मी म्हणजे काही दगड—झाड नाही अशी तिची खात्री होई, आणि भयगूढ होऊन किंचित काळ ती जेथल्या तेथेच खिळल्याप्रमाणे बसून राही. नंतर जी धूम ठोकी म्हणता! खारीची चिमुकली पिल्ले केव्हा केव्हा झाडावरून पडत. मग त्यांची आई येत असे व त्यांची चेंडूप्रमाणे गुंडाळी करून त्यांना सुरक्षित जागी नेत असे. कधी कधी पिलांची चुकामूक व्हावयाची. माझ्या एका सहकाऱ्याला अशा प्रकारे चुकलेली खारीची तीन पिल्ले सापडली. त्यांची जोपासना तो करीत असे. त्या चिमण्या जीवांना अन्न कसे घालावे याची मोठी पंचाईत पडली. पण खूप डोके चालवून त्याने एक मार्ग काढला हुडकून. फाउंटन पेन भरण्याच्या काचेच्या नळीला बोथी लावल्यावर त्यातून उत्तम प्रकारे दूध वगैरे पाजता येऊ लागले.

डेहराडूनला तऱ्हतऱ्हेचे पक्षी होते. त्यांच्या गाण्याची व किलबिलाटाची एकच गडबड उडून जावयाची. त्या सर्व वातावरणावर कोकिळेचा द्विधा व आर्त असा स्वर निनादत असे. पावसाळ्यात व त्याच्या जरा आधी "वेडा" पक्षी येई. त्याला असे नाव का मिळाले त्याचा उलगडा नंतर

झाला. बिचारा वेडा खराच ! रात्र असो दिवस असो, ऊन असो मुसळधार पाऊस असो, एकच एक सूर तो सारखा घोकीत बसावयाचा ! आमच्या छोट्या आवारात झाडे नसल्यामुळे आम्हाला हे पक्षी बघावयास सापडत नसत. फक्त त्यांचे शब्द ऐकू येत. पण ऐटदार मंडळे घेत घेत अस्मानात उंच चढत जाणारे गरुड व घारी मात्र दृष्टीस पडत. त्यांच्याकडे मी टक लावून बघत असे. ते एकदम खाली झेप घेत व पंख तसेच स्थिर ठेवून नुसत्या वाऱ्याच्या झोतावर पुन्हा वर चढत. मधून मधून पाणकोंबड्यांचा कळपही आमच्या डोक्यावरून उडत जाई.

पण कधी कधी आवारात असेही पाहुणे येत की, त्यांचा सत्कार करणे शक्य होत नसे. आमच्या कोठड्यांतून पुष्कळदा विंचू सापडत. वादळ होऊन गेले की ते हटकून यावयाचे. बिछान्यावर, हाती घेतलेल्या पुस्तकावर, वाटेल तेथे ते उपटत. असे असून मला एकदाही विंचू चावला नाही ही मोठी नवलाची गोष्ट आहे. एक भयंकर विषारी काळाकुळकुळीत असा विंचू मी बाटलीत घालून ठेवला होता. त्याला मी माशा वगैरे खावयास देत असे. नंतर एकदा त्याला दोरा बांधून मी भिंतीवर टांगून ठेवला असता, स्वारी तेथून पसार झाली. तो सुटा असता पुन्हा त्याची माझी गाठ पडावी अशी माझी इच्छा नव्हती, म्हणून मी सर्व खोलीतले सामान बाहेर काढले व कोनान् कोपरा धुंडाळला; पण वृश्चिकमहाशयांचा पत्ता काही लागला नाही !

माझ्या खोलीत व खोलीच्या जवळपास तीन-चार वेळा सापही निघाले. काही लोकांची साप म्हटला की दातखिळी बसते, तशी माझी स्थिती होत नाही. ते दंश करतील म्हणून अर्थात मला भीती वाटतेच, आणि सर्प दिसला तर स्वसंरक्षणाचा मी प्रयत्नही करीत असतो. पण साप म्हटला की मला किळस वाटत नाही किंवा माझी घाबरगुंडी उडाली असे होत नाही. घोणीची मला सापापेक्षा अधिक भीती वाटते.

बाहेरच्यापेक्षा तुरुंगातच माझा जनावरांशी अधिक संबंध आला. मला कुत्र्यांची भारी आवड आहे. स्वतः मी कुत्रे पाळलेही होते. पण इतर गोष्टींच्या गडबडीत त्यांच्याकडे मला द्यावे तसे लक्ष देता येत नसे. तुरुंगामध्ये अनेक प्राण्यांचा सहवास मला घडला. हे त्यांचे माझ्यावर फार उपकार झाले म्हणावयाचे. आपल्या लोकांना घरात जनावरे बाळगणे फारसे आवडत

नाही; आणि एकंदरीत आपण अहिंसा-वृत्तीचे असलो, तरी जनावरांशी आपली वागणूक बरीच क्रौर्याची व निष्काळजीपणाची असते. हिंदू लोक गाईला अगदी देवाप्रमाणे मानतात व तिच्यावरून दंगेही होत असतात; पण ते गाईला मोठ्या ममतेने वागवितात असे मात्र नाही. भक्ती व ममताळू-पणा यांचे नेहमीच पटत नसावेसे दिसते.

## बाहेरच्या जगात १८

सुटकेची वेळ जवळ येत चालली होती. चांगल्या वर्तणुकीबद्दल मला माफी मिळाली असल्याकारणाने दोन वर्षांच्या शिक्षेतील साडेतीन महिने कमी झाले होते. मनाची शांती अथवा तुरुंगामध्ये मनाला येणारे मांद्य सुटकेच्या कल्पनेमुळे नाहीसे झाले होते. पण बाहेर गेल्यावर पुढे काय? प्रश्न मोठा बिकट होता. त्याचे उत्तर देता येईना.

१९३३ जुलैच्या अखेर श्री. जे. एम्. सेनगुप्त एकाएकी निवर्तल्याची फार दुःखदायक बातमी कानी आली. केंब्रिजपासूनची आमची ओळख होती. नवा विद्यार्थी म्हणून मी केंब्रिजला गेलो होतो, तेव्हा ते नुकतेच पदवीधर झाले होते. स्थानबद्ध असतानाच सेनगुप्तांना मृत्यू आला. १९३२ साली युरोपां-तून परत आल्यापासून ते तुरुंगात अथवा नजरकैदेत होते. स्मशानयात्रेच्या वेळी त्यांना श्रद्धाञ्जली अर्पण करण्यासाठी अफाट जनसमुदाय लोटला होता. सेनगुप्त तर गेले. दुसरे दरबारचे कैदी म्हणजे सुभाष बोस. कित्येक वर्षांच्या तुरुंगवासामुळे त्यांचीही प्रकृती क्षीण झाली होती. अगदी सरतेशेवटी उपचाराखातर युरोपमध्ये जाण्याची परवानगी सरकारकडून त्यांना देण्यात आली. विठ्ठलभाई पटेलांसारखा अनुभविक लढवय्या युरोपातच अंथरुणावर पडून होता. तुरुंगवास व बाहेर अव्याहत चालू असणारी धावपळ शरीराला न झेपल्यामुळे असे कित्येक लोक खंगून गेले असतील, आणि कित्येक मृत्युमुखी पडले असतील! या भयंकर स्थितीची जाणीव सेनगुप्तांच्या मृत्यूमुळे मला झाली व त्यामुळे मनाला थकवा आल्याप्रमाणे वाटू लागले.

इतक्या हालअपेष्टा कशासाठी सहन करावयाच्या? कोणत्या ध्येयासाठी हे सारे सोसावयाचे?

प्रकृतीच्या बाबतीत मी मोठा दैववान होतो. काँग्रेसच्या धामधुमीमुळे खूप दगदग होई व आहार-विहाराच्या बाबतीत अनियमितपणाही उत्पन्न होत असे. परंतु एकंदरीत माझी प्रकृती चांगली टिकून राहिली. थोडीबहुत वडिलार्जित देणगी व थोडीबहुत स्वतः ठेवलेली दक्षता, यामुळे प्रकृती चांगली राहिली असावी. आजारपण, अशक्त प्रकृती, आणि स्थूलपणा ह्या गोष्टी माणसाला शोभणाऱ्या नव्हेत असे मला वाटे. व्यायाम, भरपूर मोकळी हवा व साधे अन्न यांच्या साहाय्याने मी उपरोक्त आपत्तींपासून शरीराचा बचाव केला होता. माझा अनुभव असा आहे की, हिंदुस्थानातील मध्यम वर्गात आढळणारे बरेचसे रोग सदोष आहारापासून उत्पन्न झालेले असतात. मुलांचे लाड करणाऱ्या आया, मुलांना गोड व चमचमीत पदार्थ अवश्य त्यापेक्षा अधिक प्रमाणात खावयाला घालून त्यांना कायमचा अपचनाचा रोग जडवून ठेवतात. मुलांच्या अंगाभोवतीसुद्धा जरुरीहून अधिक कपडे लपेटण्यात येतात.

अन्नाचे प्रयोग करण्याच्या भानगडीत मी कधी फारसे लक्ष घातलेले नाही. अधाशीपणा व मिष्टान्न ही टाळण्याचा तेवढा मी प्रयत्न करीत असतो. सर्वच काश्मीरी ब्राह्मणांप्रमाणे आम्हीही मांस खातो, आणि मला विशेष आवड नसली तरी लहानपणापासून माझ्या खाण्यात मांस येत असे. मांसाशन माझ्या प्रकृतीला मानवते. पण माझ्या मनात आता त्याबद्दल किळस उत्पन्न झाली असून मांसाशनात एक प्रकारचा रानटीपणा आहे असे मला वाटू लागले आहे.

व्यायामाच्या सर्व प्रकारांत मला शीर्षासनाची फार आवड आहे. शरीरास त्यापासून फार फायदा होतो असे मला वाटते. पण त्यापेक्षाही शीर्षासनाच्या मानसिक परिणामामुळे ते मला अधिक प्रिय झाले आहे. हे आसन करताना शरीराची जी विचित्र उलटापालट होते त्यामुळे खेळकर वृत्तीत भर पडून आयुष्याच्या विचित्र लीलांकडेदेखील आनंदी मुद्रेने पाहण्याची आपल्या मनाची तयारी होते.

डेहराडूनहून २३ ऑगस्ट रोजी मला नैनी येथे आणण्यात आले. आई एकाएकी आजारी पडल्यामुळे तिला रुग्णालयात नेल्याची बातमी मला त्याच वेळी समजली. आईची प्रकृती चिंताजनक झाली होती, म्हणून ३०

डांस यांच्याबरोबर मात्र माझे अखंड वैर चाललेले असे. माशांच्याही बाबतीत थोडाफार तोच प्रकार होता. गांधिलमाशा असल्या तरी मला चालत, आणि शेकडो गांधिलमाशा माझ्या खोलीत नांदतही होत्या. पण एक गांधिलमाशी मला चुकून चावली तेव्हा मात्र आमची थोडीशी जुंपली होती. संतापून मी त्यांच्या कुळाचाच संहार करण्यासाठी धावलो, पण आपले घरदार सांभाळण्यासाठी त्या किती निकाराने लढल्या! घरट्यात त्यांची अंडी असावीत. आपल्या वाटेला त्या जाणार नसतील तर राहीनात का बिचाऱ्या सुखाने, असा विचार करून मी हात आखडता घेतला. नंतर एक वर्षाहून अधिकच काळ मी त्याच कोठडीत होतो. गांधिलमाशा माझ्या आजूबाजूला वावरत असत, पण त्यांनी माझ्यावर केव्हाही हल्ला केला नाही. आम्ही एकमेकांचा मान राखून राहात असू.

झाडे जवळपास असली की खारींना तोटा नसतो. तो प्राणी भारीच धिटुकला! त्या माणसाच्या अगदी जवळ येतात. लखनौच्या तुरुंगात असताना घटका घटका मी जरासुद्धा न हालता वाचीत बसलो की एखादी खार माझ्या पायावरून चढून हळूच गुढघ्यावर येऊन बसे व सभोवर दृष्टी टाकी. माझी तिची नजरानजर झाली की मात्र मी म्हणजे काही दगड–झाड नाही अशी तिची खात्री होई, आणि भयगूढ होऊन किंचित काळ ती जेथल्या तेथेच खिळल्याप्रमाणे बसून राही. नंतर जी धूम ठोकी म्हणता! खारीची चिमुकली पिल्ले केव्हा केव्हा झाडावरून पडत. मग त्यांची आई येत असे व त्यांची चेंडूप्रमाणे गुंडाळी करून त्यांना सुरक्षित जागी नेत असे. कधी कधी पिलांची चुकामूक व्हावयाची. माझ्या एका सहकाऱ्याला अशा प्रकारे चुकलेली खारीची तीन पिल्ले सापडली. त्यांची जोपासना तो करीत असे. त्या चिमण्या जीवांना अन्न कसे घालावे याची मोठी पंचाईत पडली. पण खूप डोके चालवून त्याने एक मार्ग काढला हुडकून. फाउंटन पेन भरण्याच्या काचेच्या नळीला बोथी लावल्यावर त्यातून उत्तम प्रकारे दूध वगैरे पाजता येऊ लागले.

डेहराडूनला तऱ्हतऱ्हेचे पक्षी होते. त्यांच्या गाण्याची व किलबिलाटाची एकच गडबड उडून जावयाची. त्या सर्व वातावरणावर कोकिळेचा द्विधा व आर्त असा स्वर निनादत असे. पावसाळ्यात व त्याच्या जरा आधी "वेडा" पक्षी येई. त्याला असे नाव का मिळाले त्याचा उलगडा नंतर

झाला. बिचारा वेडा खराच ! रात्र असो दिवस असो, ऊन असो मुसळधार पाऊस असो, एकच एक सूर तो सारखा घोकीत बसावयाचा ! आमच्या छोट्या आवारात झाडे नसल्यामुळे आम्हाला हे पक्षी बघावयास सापडत नसत. फक्त त्यांचे शब्द ऐकू येत. पण ऐटदार मंडळे घेत घेत अस्मानात उंच चढत जाणारे गरुड व घारी मात्र दृष्टीस पडत. त्यांच्याकडे मी टक लावून बघत असे. ते एकदम खाली झेप घेत व पंख तसेच स्थिर ठेवून नुसत्या वाऱ्याच्या झोतावर पुन्हा वर चढत. मधून मधून पाणकोंबड्यांचा कळपही आमच्या डोक्यावरून उडत जाई.

पण कधी कधी आवारात असेही पाहुणे येत की, त्यांचा सत्कार करणे शक्य होत नसे. आमच्या कोठड्यांतून पुष्कळदा विंचू सापडत. वादळ होऊन गेले की ते हटकून यावयाचे. बिछान्यावर, हाती घेतलेल्या पुस्तकावर, वाटेल तेथे ते उपटत. असे असून मला एकदाही विंचू चावला नाही ही मोठी नवलाची गोष्ट आहे. एक भयंकर विषारी काळाकुळकुळीत असा विंचू मी बाटलीत घालून ठेवला होता. त्याला मी माशा वगैरे खावयास देत असे. नंतर एकदा त्याला दोरा बांधून मी भिंतीवर टांगून ठेवला असता, स्वारी तेथून पसार झाली. तो सुटा असता पुन्हा त्याची माझी गाठ पडावी अशी माझी इच्छा नव्हती, म्हणून मी सर्व खोलीतले सामान बाहेर काढले व कोनान् कोपरा धुंडाळला; पण वृश्चिकमहाशयांचा पत्ता काही लागला नाही !

माझ्या खोलीत व खोलीच्या जवळपास तीन-चार वेळा सापही निघाले. काही लोकांची साप म्हटला की दातखिळी बसते, तशी माझी स्थिती होत नाही. ते दंश करतील म्हणून अर्थात मला भीती वाटतेच, आणि सर्प दिसला तर स्वसंरक्षणाचा मी प्रयत्नही करीत असतो. पण साप म्हटला की मला किळस वाटत नाही किंवा माझी घाबरगुंडी उडाली असे होत नाही. घोणीची मला सापापेक्षा अधिक भीती वाटते.

बाहेरच्यापेक्षा तुरुंगातच माझा जनावरांशी अधिक संबंध आला. मला कुत्र्यांची भारी आवड आहे. स्वतः मी कुत्रे पाळलेही होते. पण इतर गोष्टींच्या गडबडीत त्यांच्याकडे मला द्यावे तसे लक्ष देता येत नसे. तुरुंगामध्ये अनेक प्राण्यांचा सहवास मला घडला. हे त्यांचे माझ्यावर फार उपकार झाले म्हणावयाचे. आपल्या लोकांना घरात जनावरे बाळगणे फारसे आवडत

नाही; आणि एकंदरीत आपण अहिंसा-वृत्तीचे असलो, तरी जनावरांशी आपली वागणूक बरीच क्रौर्याची व निष्काळजीपणाची असते. हिंदू लोक गाईला अगदी देवाप्रमाणे मानतात व तिच्यावरून दंगेही होत असतात; पण ते गाईला मोठ्या ममतेने वागवितात असे मात्र नाही. भक्ती व ममताळूपणा यांचे नेहमीच पटत नसावेसे दिसते.

## बाहेरच्या जगात १८

सुटकेची वेळ जवळ येत चालली होती. चांगल्या वर्तणुकीबद्दल मला माफी मिळाली असल्याकारणाने दोन वर्षांच्या शिक्षेतील साडेतीन महिने कमी झाले होते. मनाची शांती अथवा तुरुंगामध्ये मनाला येणारे मांद्य सुटकेच्या कल्पनेमुळे नाहीसे झाले होते. पण बाहेर गेल्यावर पुढे काय? प्रश्न मोठा बिकट होता. त्याचे उत्तर देता येईना.

१९३३ जुलैच्या अखेर श्री. जे. एम्. सेनगुप्त एकाएकी निवर्तल्याची फार दुःखदायक बातमी कानी आली. केंब्रिजपासूनची आमची ओळख होती. नवा विद्यार्थी म्हणून मी केंब्रिजला गेलो होतो, तेव्हा ते नुकतेच पदवीधर झाले होते. स्थानबद्ध असतानाच सेनगुप्तांना मृत्यू आला. १९३२ साली युरोपांतून परत आल्यापासून ते तुरुंगात अथवा नजरकैदेत होते. स्मशानयात्रेच्या वेळी त्यांना श्रद्धाञ्जली अर्पण करण्यासाठी अफाट जनसमुदाय लोटला होता. सेनगुप्त तर गेले. दुसरे दरबारचे कैदी म्हणजे सुभाष बोस. कित्येक वर्षांच्या तुरुंगवासामुळे त्यांचीही प्रकृती क्षीण झाली होती. अगदी सरतेशेवटी उपचाराखातर युरोपमध्ये जाण्याची परवानगी सरकारकडून त्यांना देण्यात आली. विठ्ठलभाई पटेलांसारखा अनुभविक लढवय्या युरोपातच अंथरुणावर पडून होता. तुरुंगवास व बाहेर अव्याहत चालू असणारी धावपळ शरीराला न झेपल्यामुळे असे कित्येक लोक खंगून गेले असतील, आणि कित्येक मृत्युमुखी पडले असतील! या भयंकर स्थितीची जाणीव सेनगुप्तांच्या मृत्यूमुळे मला झाली व त्यामुळे मनाला थकवा आल्याप्रमाणे वाटू लागले.

इतक्या हालअपेष्टा कशासाठी सहन करावयाच्या ? कोणत्या ध्येयासाठी हे सारे सोसावयाचे ?

प्रकृतीच्या बाबतीत मी मोठा दैववान होतो. कॉंग्रेसच्या धामधुमीमुळे खूप दगदग होई व आहार-विहाराच्या बाबतीत अनियमितपणाही उत्पन्न होत असे. परंतु एकंदरीत माझी प्रकृती चांगली टिकून राहिली. थोडीबहुत वडिलार्जित देणगी व थोडीबहुत स्वतः ठेवलेली दक्षता, यामुळे प्रकृती चांगली राहिली असावी. आजारपण, अशक्त प्रकृती, आणि स्थूलपणा ह्या गोष्टी माणसाला शोभणाऱ्या नव्हेत असे मला वाटे. व्यायाम, भरपूर मोकळी हवा व साधे अन्न यांच्या साहाय्याने मी उपरोक्त आपत्तींपासून शरीराचा बचाव केला होता. माझा अनुभव असा आहे की, हिंदुस्थानातील मध्यम वर्गात आढळणारे बरेचसे रोग सदोष आहारापासून उत्पन्न झालेले असतात. मुलांचे लाड करणाऱ्या आया, मुलांना गोड व चमचमीत पदार्थ अवश्य त्यापेक्षा अधिक प्रमाणात खावयाला घालून त्यांना कायमचा अपचनाचा रोग जडवून ठेवतात. मुलांच्या अंगाभोवतीसुद्धा जरुरीहून अधिक कपडे लपेटण्यात येतात.

अन्नाचे प्रयोग करण्याच्या भानगडीत मी कधी फारसे लक्ष घातलेले नाही. अधाशीपणा व मिष्टान्न ही टाळण्याचा तेवढा मी प्रयत्न करीत असतो. सर्वच काश्मीरी ब्राह्मणांप्रमाणे आम्हीही मांस खातो, आणि मला विशेष आवड नसली तरी लहानपणापासून माझ्या खाण्यात मांस येत असे. मांसाशन माझ्या प्रकृतीला मानवते. पण माझ्या मनात आता त्याबद्दल किळस उत्पन्न झाली असून मांसाशनात एक प्रकारचा रानटीपणा आहे असे मला वाटू लागले आहे.

व्यायामाच्या सर्व प्रकारांत मला शीर्षासनाची फार आवड आहे. शरीरास त्यापासून फार फायदा होतो असे मला वाटते. पण त्यापेक्षाही शीर्षासनाच्या मानसिक परिणामामुळे ते मला अधिक प्रिय झाले आहे. हे आसन करताना शरीराची जी विचित्र उलटापालट होते त्यामुळे खेळकर वृत्तीत भर पडून आयुष्याच्या विचित्र लीलांकडेदेखील आनंदी मुद्रेने पाहण्याची आपल्या मनाची तयारी होते.

डेहराडूनहून २३ ऑगस्ट रोजी मला नैनी येथे आणण्यात आले. आई एकाएकी आजारी पडल्यामुळे तिला रुग्णालयात नेल्याची बातमी मला त्याच वेळी समजली. आईची प्रकृती चिंताजनक झाली होती, म्हणून ३०

ऑगस्ट रोजी माझी मुक्तता करण्यात आली. वास्तविक माझी सुटका १२ सप्टेंबर रोजी होणारच होती; पण मला प्रान्तिक सरकारने ११ दिवस जादा माफी दिली.

तुरुंगातून सुटल्याबरोबर मी लखनौला आईकडे गेलो व तेथेच तिच्यापाशी काही दिवस राहिलो. बऱ्याच दिवसांनी मी बाहेर येत असल्यामुळे भोवतालच्या जगाचा संबंध तुटल्यासारखा झाला होता. पण मी तुरुंगात गुंतून पडलो म्हणून जगाच्या गतीत काही खळ पडला नाही. जीवनाचा प्रवाह मला बाजूला सारून जणू काही तसाच पुढे निघाला होता आणि मी काठच्या डबक्यात राहिलो होतो. राजकीयदृष्ट्या देश शांत होता, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. पण हिंदुस्थानातील त्या वेळची शांतता फार अर्थपूर्ण होती. प्रखर दडपशाहीचे फटके सोसल्यानंतर थकल्यामुळे आलेल्या ग्लानीप्रमाणे ती शांतता होती. एक प्रकारे किती बोलकी शांतता होती ती !

बाहेर येऊन हिंदुस्थानच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीचे निरीक्षण केल्यावर माझ्या मनाला फारशी उमेद वाटेना. माझे बरेच सहकारी तुरुंगात होते, धरपकड चालू होती, वटहुकुमांचा रूळ फिरत होता, व नियंत्रकांनी वर्तमानपत्रांच्या मानेभोवती घातलेली पकडही कायम होती. त्यांच्या ढवळाढवळीमुळे आमच्या पत्रव्यवहाराचीही दाणादाण उडे.

तुरुंगात परत जाण्याची माझी इच्छा नव्हती. अगदी पोटभर तुरुंगवास झाला होता ! पण वर्तमान परिस्थितीत राजकारणाचा संन्यास घेतल्यावाचून तुरुंगाचा लकडा सुटणार कसा, ते मला कळेना. राजकारणाला रामराम ठोकण्याची तर माझी मुळीच तयारी नव्हती. तेव्हा सरकारशी खटका उडणार हे ठरून गेल्याप्रमाणेच होते. अमुक करा अथवा तमुक करू नका, असा हुकूम कोणत्याही क्षणी माझ्यावर बजावण्यात आला असता; आणि तोंडात कोणी लगाम अडकवू पाहील तर बंड करून उठावे हा तर पडला माझा स्वभाव. सगळ्या हिंदुस्थानाला नरम आणून त्याला हवा तसा दामटण्याचा प्रयत्न सुरू होता. सर्व देशाच्या बाबतीत मी काय करणार ? पण स्वतःवर मात्र हा प्रयोग चालू द्यावयाचा नाही, असे मी ठरवले होते.

तुरुंगात परत जाण्यापूर्वी काही गोष्टी प्रथम उरकून घेणे अवश्य दिसले. माझी आई अंथरूण धरून होती. तिच्याकडे लक्ष देणे जरूर झाले होते.

पुण्याला जाऊन गांधीजींनाही भेटून यावयाचे होते. त्यांना भेटल्याला दोन वर्षे होऊन गेली होती. शक्य तेवढे प्रांतिक सहकारी जमवून त्यांच्याशी देशाच्या सद्य:स्थितीबद्दलच नव्हे, तर जागतिक परिस्थितीबद्दलही चर्चा करावी व माझ्या डोक्यात साठून राहिलेले विचार त्यांच्यापुढे मांडावेत, असेही मनात होते. जग झपाट्याने धावत सुटले असून त्याचा लवकरच राजकीय व आर्थिक कडेलोट होणार आहे असे मला वाटत असल्यामुळे आपला राष्ट्रीय कार्यक्रम आपण त्या धोरणाने आखीत गेले पाहिजे, असा मुद्दा मला मांडावयाचा होता.

घरच्या व्यवहाराकडेही नजर टाकावयास हवी होती. आतापर्यंत मी तिकडे ढुंकूनही पाहात नसे. वडील वारल्यावर मी त्यांचे कागदपत्रदेखील चाळले नाहीत. बरीच छाटाछाट करूनसुद्धा खर्च ऐपतीबाहेरच जात असे.

आईच्या प्रकृतीत थोडासा आराम पडल्याबरोबर मी गांधीजींना भेटण्यासाठी पुण्यास गेलो. ते क्षीण झाले होते. पण त्यांची प्रकृती झपाट्याने सुधारत असल्याचे पाहून मला आनंद झाला. आम्ही खूप खूप बोललो. जीवन, राजकारण, अर्थकारण या विषयांवर आमच्यात बराच मतभेद असल्याचे दिसून आले. पण माझ्या दृष्टिकोणाशी शक्य तितके जमवून घेण्याची उदारबुद्धी त्यांनी दाखवली, हे त्यांचे माझ्यावर उपकारच आहेत.

परत येताना वाटेत मुंबईला मी काही दिवस थांबलो. तेथे सुदैवाने उदयशंकरचे नृत्य पाहण्याची संधी मिळाली. त्यांचे नृत्य पाहून मला फार आनंद झाला. नाटक, संगीत, चित्रपट, बोलपट, नभोवाणी, ध्वनिक्षेपण वगैरे गोष्टी गेली कित्येक वर्षे माझ्या आटोक्याबाहेर गेल्या होत्या. कारण बाहेर असलो तरी माझ्यामागे कार्याचा व्याप इतका असे की, डोके वर उचलण्याची पंचाईत पडायची. आतापर्यंत फक्त एकच बोलपट मी पाहिलेला आहे, व चित्रपटांतील प्रसिद्ध नट-नटींची नावे काय कानावरून गेली असतील तेवढीच. नाटक पाहावयास न मिळाल्यामुळे मात्र मला फार चुकल्याचुकल्यासारखे होते. उत्तर हिंदुस्थानात चांगले नाटक दृष्टीस पडणे कठीण. बंगाली, गुजराती व मराठी रंगभूमीची थोडीफार प्रगती झालेली आहे असे ऐकतो. हिंदुस्थानी रंगभूमीला कला व रसिकता कशाशी खातात तेसुद्धा माहिती नाही. हिंदी चित्रपट व बोलपट कलाभिरुची व्यक्त कर-

ण्याच्या भानगडीत फारसे पडतच नाहीत, असे माझ्या ऐकिवात आहे. ऐतिहासिक दप्तरे आणि पुराणांच्या पोथ्या यांतलेच कथाप्रसंग बहुधा उचलून त्यांना संगीताची फोडणी व अश्रुधारांचा लिंबूरस यांची जोड दिली की काम खलास !

कलेच्या नवयुगाला नुकताच कोठे प्रारंभ झालेला आहे. टागोरांच्या कुटुंबाने या कामी पुढाकार घेतलेला असून ह्या नवयुगाची प्रभा सर्व देश-भर फाकू लागलेली दिसत आहे. परंतु देशातील जनतेच्या मार्गात पावला-पावलागणिक अडथळे व निर्बंध येत असता व त्यांच्या आकांक्षा दडपून टाकल्या जात असता अभिनव कलेचा प्रसार मोठ्या प्रमाणात व्हावा कसा ?

मुंबईमध्ये तुरुंगातून नुकतेच सुटून आलेले काही मित्र व सहकारी मला भेटले. समाजवादी तत्त्वांचा प्रभाव तेथे बऱ्याच प्रमाणात दिसून आला. कॉंग्रेसमधील पुढाऱ्यांच्या काही कृत्यांबद्दल त्यांच्यामध्ये बराचसा असंतोषही पसरलेला दिसत होता. राजकारणाकडे पाहण्याच्या गांधीजींच्या आध्यात्मिक दृष्टिकोणावरही त्यांनी सडेतोड टीका केली. टीकेपैकी बराचसा भाग मलासुद्धा मान्य होता; परंतु आहे त्या परिस्थितीमध्ये दुसरा मार्ग नसल्यामुळे आपण तसेच पुढे गेले पाहिजे, ही गोष्ट मी निःसंदिग्ध शब्दात सांगून टाकली.

१९२३ च्या सप्टेंबरमध्ये पुण्या-मुंबईकडे एक आठवडा राहून मी लखनौला परत फिरलो. आईला रुग्णालयाचा अगदी कंटाळा आला होता, म्हणून तिला परत अलाहाबादेस न्यावे असे आम्ही ठरविले. माझी बहीण कृष्णा हिचा वाङ्निश्चय नुकताच ठरला होता हेही अलाहाबादेस जाण्याचे एक कारण होतेच. इच्छा अशी की, माझी तुरुंगात रवानगी होण्याच्या आधी शक्य तो लवकर विवाह उरकून घ्यावा. कायदेभंग अद्यापि सुरू असल्यामुळे मला केव्हा उचलण्यात येईल त्याचा मुळीच नेम नव्हता. विवाह रजिस्टर पद्धतीने करावयाचा ठरला म्हणून मला आनंद झाला. पण खरे म्हणजे आम्हाला दुसरा मार्गच मोकळा नव्हता. कारण वधू ब्राह्मण आणि वर अब्राह्मण. अशा आंतरजातीय विवाहांचा प्रसार व्हावा असे माझे मत आहे.

माझ्या बहिणीच्या विवाहाचा जरादेखील गाजावाजा करण्यात आला नाही. समारंभाचा बेत अगदी साधा ठेवण्यात आला होता. हिंदुस्थानातील विवाहांतून दिसून येणारा गाजावाजा मला मुळीच आवडत नाही. शिवाय

आई आजारी, बाहेर सत्याग्रहाचे वातावरण, आणि अनेक मित्रसुहृद् तुरुंगांत; अशा स्थितीत भपका करणे अगदीच अप्रशस्त ठरले असते. काही आप्त आणि स्थानिक मित्रमंडळी यांनाच फक्त निमंत्रणे गेली. पण त्यामुळे वडिलांच्या काही जुन्या स्नेह्यांना फार राग आला. त्यांची अशी समजूत झाली की मी त्यांना मुद्दामच वगळले !

विवाहाच्या छोट्या निमंत्रण-पत्रिका हिंदुस्थानी भाषेत छापून घेतल्या होत्या. पण लिपी मात्र रोमन होती. ही एक नवलपरीचीच गोष्ट झाली. हिंदी भाषा रोमन लिपीत लिहिण्याची पद्धती सैन्यात व मिशनच्या संस्थां-मधून तेवढी प्रचलित आहे. मी हा प्रयोग म्हणून करून पाहिला. अनुकूल-प्रतिकूल दोन्ही प्रकारची मते मला ऐकावयाला सापडली. पण बहुसंख्य लोक प्रतिकूलच दिसले. माझी कल्पना गांधीजींना पसंत पडली नाही. संपन्न परंपरेच्या कोणत्याही भाषेची लिपी बदलणे, म्हणजे मर्मस्थानची शस्त्रक्रिया करण्याप्रमाणे आहे. वाङ्मयात लिपीला अत्यंत जिव्हाळ्याचे स्थान प्राप्त झालेले असते. लिपी बदलली की शब्दांचे निराळेच स्वरूप आपल्यापुढे उभे राहून त्यातून निराळ्याच ध्वनींची व कल्पनांची निर्मिती होऊ लागते. अशा परिस्थितीत जुनी लिपी काढून टाकणे हे अंगावरील कातडी सोलून काढण्या-सारखे मोठे क्रूर कर्म होईल. नव्या लिपीमुळे देशातील शैक्षणिक प्रगतीलासुद्धा पायबंद बसण्याचा संभव आहे.

हिंदुस्तानी हीच राष्ट्रभाषा बनणार ह्याबद्दल मला बिलकुल संदेह नाही. सर्वसाधारणपणे आजही राष्ट्रभाषेचे स्वरूप तिला प्राप्त झालेले आहे. हिंदु-स्तानीची वाढ व विस्तार होऊ लागला तरी प्रांतिक भाषांशी तिचा विरोध येण्याचे कारण नाही, व तसा विरोध येणारही नाही. प्रांतिक भाषांपैकी काही भाषा हिंदुस्तानीपेक्षा अधिक जागृत व बौद्धिक दृष्ट्या तल्लख अशा असल्यामुळे शिक्षणाच्या व इतर कामी त्या त्या प्रांतांतुन त्यांचाच उपयोग व्हावयास हवा. त्यांच्याद्वाराच शिक्षण व संस्कृती यांचा प्रचार सामान्य लोकांत अधिक झपाट्याने करता येईल.

मात्र आपला इतर जगाशी होणारा व्यवहार मुख्यतः इंग्रजीतून होणार हे निश्चित; आणि ही गोष्ट योग्यच आहे. गेल्या कित्येक पिढ्या इंग्रजी शिकण्याचा खटाटोप आपण चालू ठेवला असून त्यात आपणाला बरेचसे

यशही प्राप्त झालेले आहे. तेव्हा सर्व पाटी पुनः चक्क पुसून आतापर्यंत मिळालेल्या शिक्षणाचा फायदा घेण्याचे नाकारणे वेडगळपणाचे होईल. शिवाय, इंग्रजी भाषेचा विस्तार व महत्त्व वाढत असून इतर भाषांवर ती मात करीत चालली आहे ह्यात शंकाच नाही. इंग्रजी भाषा हीच आंतरराष्ट्रीय व्यवहाराचे व नभोवाणीच्या प्रसाराचे माध्यम होणार, असा संभव दिसतो. यासाठी शक्य तितक्या उत्तम प्रकारे इंग्रजी भाषेचे शिक्षण घ्यावे हे योग्यच होय.

# धरणीकंप १९

मला पकडून पुनः तुरुंगात घालतील ही भीती कायमचीच होती. ब्रिटिश सरकारचा स्वभावधर्म आणि माझा स्वभावधर्म यांच्यात छत्तिसाचा आकडा असल्यामुळे माझी मुस्कटदाबी होणे क्रमप्राप्तच होते. या नित्य डोळ्यांपुढे दिसणाऱ्या संभवाचा परिणाम माझ्या कामावर झाला. मिळालेल्या वेळात शक्य तितके काम भरडून काढावे अशी तर माझी फार इच्छा होती; पण कोणतेही काम स्वस्थपणे बसून करण्यास मन लागेना.

परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील कामाची योजना करण्यासाठी १९३३ च्या ऑक्टोबरमध्ये संयुक्त प्रांतातील कार्यकर्ते जमा झाले. सभेमध्ये जागतिक परिस्थितीविषयी म्हणजे आर्थिक मंदी, नाझीपंथ, कम्युनिझम वगैरे गोष्टींविषयी बराच ऊहापोह झाला. इतर ठिकाणी होणाऱ्या घडामोडींशी हिंदुस्थानातल्या चळवळीचा कसा संबंध पोचतो, ते आमच्या कार्यकर्त्यांना कळावे असा एकत्र जमण्यातला हेतू होता. अखेरीला परिषदेने एक समाजवादी ठराव पास करून कायदेभंग बंद करण्यात येऊ नये, असे आपले मत जाहीर केले. कार्यकर्त्यांनी आपले नित्याचे काम करीत राहावे व ते करीत असता शिक्षा झाली तर तिचा आनंदाने स्वीकार करावा, असे धोरण ठरविण्यात आले. विशेष काम म्हणून त्यांनी शेतकऱ्यांशी असलेल्या परि-

चयाला पुन: उजळा देऊन खंडसुटीचा व सरकारी दडपशाहीचा शेतकऱ्यावर काय परिणाम झाला आहे त्याचे निरीक्षण करावयाचे होते.

आम्ही आखलेला कार्यक्रम अगदी सौम्य व सरकारच्या डोळ्यांत न खुपेल असा होता. परंतु बेकायदेशीर असे त्यात काहीही नसले, तरी सरकार धरपकड केल्याशिवाय राहणार नाही अशी आम्हाला खात्री होती. त्याप्रमाणे कार्यकर्ते खेडोपाडी पोचल्यावर 'खंडबंदीचा त्यांनी प्रचार केला' ह्या सबबीवर त्यांना पकडण्यात आले व शिक्षाही झाल्या. अनेक कार्यकर्त्यांना अशा प्रकारे अटक झाल्यानंतर त्या भागात खुद्द आपण स्वत: जावे, असे माझ्या मनात आले; परंतु इतर कार्यक्रमात मी गुंतून पडल्यामुळे माझे जाणे लांबणीवर पडले. आणि त्यातून मी मोकळा झालो, तोपर्यंत वेळ निघून गेली होती.

तेवढ्या वेळात वर्किंग कमिटीचे सभासद देशातील परिस्थितीचा विचार करण्यासाठी दोनदा एकत्र जमले. परंतु माझी अवस्था त्रिशंकूप्रमाणे झाली होती. ना कचेरी, ना हाताखाली माणसे, ना अध्यक्ष! गांधीजींचा सल्ला मिळत असला तरी हरिजन-कार्यासाठी काढलेल्या अखिल भारतीय दौऱ्यात ते चूर असत. आम्ही त्यांना दौऱ्यावर असतानाच जबलपूर व दिल्ली येथे गाठून विचारविनिमय केला. तेथे वर्किंग कमिटीतील निरनिराळ्या सभासदांत असणारे मतभेद स्पष्ट दिसून आले. सगळ्यांना मान्य होईल असा मार्गच सापडेना. कोंडीत सापडल्याप्रमाणे झाले होते.

माझ्या समाजवादी मतप्रचाराच्या परिणामाकडे पाहून वर्किंग कमिटीमधील माझे काही सहकारीसुद्धा बिथरले. माझ्या कार्यामुळे वरिष्ठवर्गीय लोक दहशत खाऊ लागल्यामुळे मतप्रचाराचे निरुपद्रवी स्वरूप कमी कमी होऊ लागले होते. माझ्या सहकाऱ्यांचा समाजवादावर मुळीच विश्वास नाही, हे मला माहीत होते. पण वर्किंग कमिटीचा सभासद असलो, तरी माझ्या मतप्रचाराने तिचा हात कोणत्याही प्रकारे गुंतण्याचा संभव नसल्यामुळे मला समाजवादाचा प्रचार करण्याची पूर्ण मुभा आहे अशी माझी समजूत होती. परंतु माझ्या काही सहकाऱ्यांचे मत निराळे असल्याचे पाहून मला नवल वाटले. माझ्या मतप्रचारामुळे ते पेचात सापडले म्हणून त्यांचा मजवर रोष झाला. पण मी तरी काय करणार? मी ज्या कार्याचे महत्त्व अत्यंत मोठे

समजत होतो, ते मी अंगाबाहेर टाकावे की काय? कॉंग्रेससंबंधी माझे कर्तव्य व माझी निष्ठा यांत विरोध उत्पन्न झाल्यावर जागेचा राजीनामा देऊन बाजूस सरणे समुचित ठरले असते. परंतु वर्किंग कमिटी बेकायदा असता व तिचे कामही धडपणे चाललेले नसता राजीनामा तरी कसा देणार?

डिसेंबरअखेर गांधीजींनी मद्रासहून मला पत्र पाठविले, तेव्हादेखील हीच अडचण पुनः उपस्थित झाली. 'मद्रास मेल'मध्ये प्रसिद्ध झालेल्या आपल्या मुलाखतीचे कात्रण त्यांनी मजकडे पाठविले होते. बातमीदाराने मजविषयी प्रश्न टाकला असता त्यांनी माझ्या कार्याबद्दल जवळ जवळ दिलगिरी व्यक्त करणारे उद्गार काढले होते, व कॉंग्रेसच्या नावाने मी ह्या नव्या विचारसरणीचा प्रचार करणार नाही, असा माझ्या प्रामाणिकपणाबद्दल विश्वासही प्रकट केला होता. माझ्याबद्दलचा हा उल्लेख तर मला पसंत पडला नाहीच, पण जमीनदारी पद्धतीचे त्यांनी जे समर्थन पुढे मांडले होते, ते वाचून माझे डोके बरेच गरम झाले. ती पद्धती म्हणजे राष्ट्राच्या व शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनाचे एक इष्ट अंग आहे, असे त्यांना वाटत असल्याचे पाहून मी थक्कच झालो. कारण पुरेसा मोबदला मिळून ह्या पद्धतीची इतिश्री झाली, तर ती खुद्द जमीनदार-तालुकदारांनाही हवी आहे. तथापि, गांधीजींना मात्र ती पद्धती इष्टच वाटत होती; आणि निधिधारकत्व वगैरेसंबंधी आपले विचार ते अद्यापि बोलून दाखवीतच होते. माझ्या—त्यांच्या दृष्टिकोणात केवढा हा मतभेद? भविष्यकाळी त्यांच्याबरोबर आपण कसे सहकार्य करणार, असे विचार माझ्या मनात आले.

घरच्या आवरासावरीत माझा बराच वेळ गेला. आईची प्रकृती सुधारत होती, पण अगदी मुंगीच्या पावलांनी. अद्यापि ती अंथरुणावरच पडून असली, तरी आता प्रकृतीला धोका मात्र काहीच राहिला नव्हता. पैशा-अडक्याच्या व्यवहाराकडे मी कित्येक दिवसांत पाहिले नसल्यामुळे सगळीच बजबजपुरी माजली होती. आयापेक्षा खर्च जास्त होत होता, पण खर्चात कात्री कोठे लावावी ते कळेना. जमाखर्चाची तात्पुरती तोंडमिळवणी करण्याकरिता माझ्या पत्नीचे दागिने व इतर चांदीची भांडीकुंडी वगैरे सामान विकावे असे आम्ही ठरविले. दहाबारा वर्षांत कमलेने दागिना असा अंगावर चढवलाच नव्हता. सगळे दागिने बँकेतच पडून होते. पण डाग

विकण्याची कल्पना कमलेला पसंत पडली नाही. आपल्या मुलीला देणगी म्हणून ते द्यावेत असा तिचा बेत होता.

१९३४ चा जानेवारी उजाडला. अलाहाबाद जिल्ह्यातील आमच्या कार्यकर्त्यांची धरपकड चालू असल्यामुळे आम्ही त्यांच्या मागोमाग खेडोपाडी जाणे इष्ट होते. सं. प्रां. काँ. समितीचे कर्तृत्ववान चिटणीस रफी-अहमद किडवाई हेदेखील अटकेत पडले. स्वातंत्र्य-दिनाचा दिवस २६ जानेवारी जवळ येत चालला. ऑ. इं. काँग्रेस-कमिटीच्या अधिकारीवर्गापैकी नावाला का होईना, अधिकारी म्हणून मीच तेवढे काम चालविले होते. स्वातंत्र्य-दिन योग्य प्रकारे साजरा करावा अशा आशयाचे एक छोटेसे विनंतिपत्रक मी प्रसिद्ध केले. कोणत्या रीतीनें तो साजरा करण्यात यावा, ते स्थानिक कार्यकर्त्यांनी ठरवावयाचे होते.

आमची अशी अटकळ होती की, स्वातंत्र्य-दिनाच्या बाबतीत खटपट करणारास त्या दिवशीच पकडण्यात येईल. तेव्हा तुरुंगात जाण्यापूर्वी बंगाल-मध्ये जाऊन यावे असा मी बेत केला. जुन्या सहकाऱ्यांना भेटण्याची इच्छा होतीच; पण कमलेची प्रकृती दाखविण्यासाठीही कलकत्त्याला जाणे जरूर होते. १५ तारखेला कलकत्त्याला जाण्याकरिता निघावयाचे असे कमलेने आणि मी ठरविले. कलकत्त्याहून परत आल्यावर स्वातंत्र्य-दिनाच्या तयारी-साठी पुरेसा वेळ मिळावा, म्हणून इतक्या लवकरचा बेत धरला होता.

१९३४ जानेवारीच्या १५ तारखेची दुपार होती. व्हरांड्यात उभा राहून मी काही शेतकऱ्यांबरोबर बोलत होतो. एकाएकी माझे पाय लटपटू लागले आणि तोल सावरता सावरता नाकी नऊ आले! जवळच्या एका खांबाला मी घट्ट धरून राहिलो. दरवाजे दणादण आपटू लागले. धरणीकंपाचा काहीच अनुभव नसल्याने प्रथम हा काय प्रकार चालला आहे तेच उमगेना. पण लौकरच सर्व प्रकार लक्षात आला, व हा नवा अनुभव मला मोठा मजेशीर वाटला. शेतकऱ्यांना उद्देशून चाललेले भाषण मी सुरू ठेविले आणि त्यांना धरणीकंपाची माहिती सांगू लागलो. इमारतीच्या बाहेर धूम ठोक, असे माझी वृद्ध आत्या मला ओरडून सांगत होती. पण ती कल्पनाच मला वेडेपणाची वाटली. काहीही झाले असते, तरी अंथरुणाला खिळलेल्या आमच्या आईला आणि वर सामानाची बांधाबांध करीत असलेल्या माझ्या

पत्नीला तसेच सोडून मी दूर जाणे शक्यच नव्हते. बराच वेळ धक्के बसत होते. मग ते थांबले.

त्या रात्रीच आम्ही कलकत्त्याला गेलो. धरणीकंपाने उद्‌ध्वस्त झालेल्या बिहारच्या दक्षिण भागातून आमची गाडी गेली, पण आम्हाला काहीच कल्पना आली नाही. दुसऱ्या दिवशी कलकत्त्याला धक्क्याची अगदी उडत उडत बातमी कळली. नंतर हळूहळू फुटकळ बातम्या येऊ लागल्या; व तिसऱ्या दिवशी संकटाचा स्थूल आराखडा आमच्या डोळ्यांसमोर उभा राहिला.

बंगालमधून परत येताना आम्ही मुजफ्फरपूरला गेलो, तेव्हा धरणीकंप होऊन बरोबर सात दिवस लोटून गेले होते. तरीही मुख्य रस्ते खेरीज करून इतर ठिकाणांच्या दगड–विटांच्या राशी बाजूला करण्याचा मुळीच प्रयत्न झालेला दिसला नाही. सफाईचे काम सुरू असताना अनेक प्रेते बाहेर काढण्यात येत होती. तेथील उद्‌ध्वस्त झालेली घरे पाहून मनात भीतीच्या व गांभीर्याच्या भावना निर्माण होत. धरणीकंपातून सुरक्षित बाहेर पडलेली माणसे घाबरून अर्धमेली झालेली दिसली. बिहारमधून परत आल्यानंतर लगेच मी एक जाहीर पत्रक काढून मदतीची याचना केली.

भूकंपपीडित भागात जाऊन तेथे चालू असलेल्या मदतीच्या कामाविषयी अहवाल सादर करण्याकरिता अलाहाबाद-धरणीकंप-साहाय्यक समितीने माझी योजना केली व मी बिहारकडे लगेच रवानाही झालो. त्या उद्‌ध्वस्त व विच्छिन्न झालेल्या प्रदेशात मी एकटाच दहा दिवसपर्यंत हिंडत होतो. प्रवासात फार दगदग झाली. धड झोपसुद्धा मिळत नसे. सकाळी पाच वाजल्यापासून रात्री जवळजवळ बारा वाजेपर्यंत आम्हाला काम करावे लागे. भेगाळलेल्या रस्त्यांवरून मोटर हाकावी, जेथले पूल कोसळले असतील अथवा रस्ते पाण्याखाली गडप झाले असतील तेथे होड्यांचा आश्रय करावा, असे चालले होते. जमीनदोस्त झालेल्या इमारती आणि एखाद्या राक्षसी हाताने विदीर्ण केलेले, वळवलेले आणि दुतर्फा असणाऱ्या घरांच्या पायांपेक्षाही उंच उचललेले शहरातील रस्ते पाहिले की मनाला धाक वाटे. रस्त्यांवर पडलेल्या प्रचंड विवरांतून पाण्याचे आणि वाळूचे लोटच्या लोट वर उफाळून मनुष्ये व गुरेढोरे त्यांत वाहून गेली. पण ह्या शहरांपेक्षासुद्धा

उत्तर बिहारमधील ‘ बिहारची बाग ’ असे म्हटल्या जाणाऱ्या प्रदेशाची पार वाताहत उडून गेली होती. सबंध टापू बेचिराख झाला होता. मैलच्या मैल वाळू पसरली, पाण्याची तळी साचली आणि जमिनीत मोठमोठ्या घळी पडल्या; ठिकठिकाणी जमिनीचे फुगे वर येऊन त्यांतून पाणी व वाळू यांचे लोट बाहेर पडले. या प्रदेशाची विमानाने पाहणी करणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सांगितले की, काही अंशी महायुद्धाच्या काळातल्या उत्तर फ्रान्सच्या रणक्षेत्राप्रमाणे खालचा देखावा दिसत होता.

दुःखनिवारक संस्थांपैकी बाबू राजेन्द्रप्रसादांच्या हाताखाली काम करणारी मध्यवर्ती दुःखनिवारक समिती फार महत्त्वाची होती. निखालस काँग्रेसची अशी ती संस्था नव्हती. अनेक गट व अनेक दाते यांच्या साहाय्याने तिला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले होते. दुःखनिवारक समितीने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ह्या चोख संघटनेचा चांगलाच उपयोग करून घेतला. खेड्यापाड्यांतून सरकारी नोकरांचादेखील इतका उपयोग झाला नसता. दुःखनिवारक समितीचे व त्याचप्रमाणे बिहार-काँग्रेस समितीचे नेतृत्व बाबू राजेन्द्रप्रसाद यांच्याकडे बिनविरोध देण्यात आले होते. राजेन्द्रबाबू अगदी अस्सल बिहारी शेतकऱ्याप्रमाणे दिसतात. प्रथमदर्शनी त्यांची मनावर छाप पडत नाही, पण त्यांच्या डोळ्यांतून व्यक्त होणारी तीव्र बुद्धिमत्ता आणि ऋजुता, व चेहेऱ्यावर दिसून येणारी तळमळ ध्यानात आली की पाहणाराची कल्पना पालटू लागते. त्यांच्या मुद्रेचा अथवा डोळ्यांचा माणसाला कधी विसर पडणे शक्य नाही. कारण मूर्तिमंत सचोटीची ज्योत तेथे तेवत आहे. गांधीजींचा संदेशदेखील त्यांच्याप्रमाणे फारच थोड्यांनी आत्मसात केला असेल.

धरणीकंप म्हणजे अस्पृश्यतेच्या पापाबद्दल ईश्वराने आपणाला केलेली शिक्षा आहे, अशा अर्थाचे एक विधान ह्याच सुमाराला गांधीजींनी केले होते, ते वाचून माझी मती गुंग होऊन गेली. आणि ह्या विलक्षण स्पष्टीकरणाला रवीन्द्रनाथ टागोरांनी दिलेले प्रत्युत्तर वाचून मला फार आनंद झाला. मला टागोरांचे म्हणणे पूर्णपणे मान्य होते. गांधीजींच्या विधानाइतके तर्कदुष्ट विधान दुसरे कोणते असेल अशी कल्पनाही करता यावयाची नाही. प्रायश्चित्त म्हणून जर धरणीकंपाची शिक्षा, तर ती कोणत्या पापाबद्दल हे कळावयास नको का ? पण ह्या तर्कटाला अंत नाही. मग प्रश्न असा उद्भवतो

की जगन्नायकाचे हे जे नाटक चालू आहे, त्या प्रयोगात आपण कशाला फेरफार करावेत ? ईश्वरी चक्राची धार मानवी प्रयत्नांनी कशाला बोथट करावयाची ? ईश्वराचा विनोद तरी किती जीवघेणा पाहा ! आम्हाला पापाचे भाजन बनवावयाचे, भोवती अनेक खड्डे— अनेक अडीअडचणी रचून ठेवावयाच्या, काट्यांनी भरलेल्या जगाचा विस्तार मांडावयाचा, वाघाशेजारी शेळीला जन्मास घालावयाचे, आणि मग शिक्षेचा आसूड परजीत जगभर फिरावयाचे !

फेब्रुवारीच्या ११ तारखेला मी घरी अलाहाबादेस पोचलो. बिहारच्या दौऱ्याने माझी खात्रीच केली होती. दहा दिवस अविश्रान्त श्रम केल्यामुळे मी चिपाडासारखा शुष्क झालो होतो. माझी दशा पाहून घरच्या मंडळींना अचंबा वाटला. अलाहाबाद दुःखनिवारक समितीचा अहवाल लिहिण्यासाठी मी लेखणी उचलली; पण डोळ्यांवर झोप इतकी लोटली होती की, पापणी उघडेना ! पुढील चोवीस तासांपैकी निदान तब्बल बारा तास तरी मी झोपून काढले असतील.

तिसऱ्या दिवशी दुपार उलटून गेल्यावर कमलेने व मी चहा घेतला. इतक्यात पुरुषोत्तमदास टंडन येऊन दाखल झाले. आम्ही व्हरांड्यात उभे होतो तोच एका पोलिस-अधिकाऱ्याची मोटर दाराशी खडी झाली. मी समजलो, की माझी वेळ भरली. मी त्यांच्याजवळ गेलो व म्हणालो, “ बहुत दिनों से आपका इंतजार था ! ” ( “ कित्येक दिवस आपली वाट पाहात होतो ! ” ) ते थोडे शरमल्याप्रमाणे झाले व म्हणाले, “ कलकत्त्याहून वॉरंट आले आहे, त्यात आमचा काय दोष ? ”

पाच महिने आणि तेरा दिवस बाहेर राहून मी पुन्हा एकान्तवासाच्या अधीन झालो. पण खरी जबाबदारी माझ्या शिरावर नव्हती; नेहमीप्रमाणे याही वेळी खरी जबाबदारी पडली ती माझ्या क्षीण झालेल्या आईवर, पत्नीवर, व बहिणीवर !

# अलिपूरचा तुरुंग 

त्या क्षणापासून आलो दूर मी आधीच ना ?
बंध नाही, अन् दिसेना स्नेहतारा लोचना
नेतसे वाहून वारा कोठच्या कोठे तरी
जायचे आयुष्य का हे कापशी तंतूपरी !

— रॉबर्ट ब्राउनिंग

त्याच रात्री मला कलकत्त्यास नेण्यात आले. हौरा स्टेशनवर पोलिशी मोटरीच्या प्रचंड धुडात बसून आम्ही लाल बाजार पोलिस ठाण्यावर गेलो.

सुरुवातीला मला प्रेसिडेन्सी जेलमध्ये ठेवले होते. तेथून खटल्यासाठी मला कोर्टात घेऊन जात असत. कोर्टाची इमारत नित्य परिचयाच्या खुल्या कोर्टाप्रमाणे नसून एखाद्या किल्ल्याप्रमाणे दिसत होती. खटला सुरू होण्याच्या आधी बाहेरच्या सज्जात बसलो असता मला अगदी एकाकी असे वाटले. माझी नाडी जलद उडत असावी. पूर्वीच्या खटल्याच्या वेळी माझे मन ज्याप्रमाणे शांत होते तसे या खेपेला राहिले नाही. इतके खटले व इतक्या शिक्षा झालेल्या माणसाचे चित्त जर असे बेचैन होते, तर नवख्या व अननुभवी अशा तरुण मुलांची अवस्था काय होत असेल, असा विचार त्या वेळी माझ्या मनात आला. पिंजऱ्यात उभे राहिल्यावर मात्र मला जरा हायसे वाटले. बचाव करण्यात आला नाहीच. माझे म्हणणे मी थोडक्यात वाचून दाखवले. दुसऱ्या दिवशी म्हणजे फेब्रुवारीच्या १६ तारखेला मला २ वर्षांची शिक्षा फर्माविण्यात आली. तुरुंगातील ही माझी सातवी खेप.

पोलिसांच्या मोटरीतून तुरुंगाकडे जात असता वाटेत आम्हाला यांत्रिक बंदुका आणि चिलखती मोटरी यांच्यासह कूच करीत चाललेले बरेचसे सैन्य भेटले. आमच्या गाडीच्या खिडकीतून मी त्यांच्याकडे दृष्टी टाकली तेव्हा मनात विचार आला की, ह्या चिलखती गाड्या किती बेडौल व भयंकर

दिसत आहेत! जणू काही इतिहासपूर्वकालातील जमिनीवर संचार करणारे राक्षसी पशूच!

प्रेसिडेन्सी जेलमधून मला अलिपूरच्या मध्यवर्ती तुरुंगात नेण्यात आले. तेथे सुमारे दहा फूट लांब व नऊ फूट रुंदीची एक लहानशी खोली मला मिळाली होती. पुढे एक व्हरांडा व छोटेसे अंगण असून आवाराभोवतालची तटबंदी सखल होती. तिच्या पलीकडे पाहिल्यावर एकमजली आणि दुमजली, वाटोळ्या व चौकोनी अशा विचित्र आकारांची छपरे असलेल्या तऱ्हेतऱ्हेच्या इमारती दिसत होत्या. माझ्या आवारात झाडपेड मुळीच नव्हते. सर्व जमिनीवर पक्की फरसबंदी केलेली असून ती स्वच्छ करण्यात येई. पण ती अगदीच रूक्ष व रखरखीत अशी दिसावयाची. शेजारच्या आवारातील एक-दोन झाडांचे शेंडे मात्र माझ्या दृष्टीस पडत. मी आलो तेव्हा त्या फांद्यांवर ना पान ना फूल. परंतु हलके हलके त्यांच्यात नकळत फरक पडत गेला आणि त्या रूक्ष फांद्यांवर हिरवे डोळे चमकू लागले! हा हा म्हणता त्यातून पालवी बाहेर आली आणि नागड्या-उघड्या दिसणाऱ्या त्या झाडांवर हिरवी महावस्त्रे लपेटली गेली. हे स्थित्यंतर इतके सुखकारक होते की, त्यामुळे अलिपूर तुरुंगसुद्धा आनंददायक भासू लागला. त्यापैकी एका झाडावर घारीचे घरटे होते. त्याच्याकडे मी पुष्कळ वेळा पाहात बसत असे. पिले वाढत होती आणि आपल्या जातीच्या कला शिकून तरबेज होत होती. कधी कधी तीराप्रमाणे बिनचूक झेप टाकून कैद्याच्या हातातील भाकरी ती पळवून नेत असत!

सूर्यास्तापासून तो जवळ जवळ सूर्योदयापर्यंत आम्हाला खोलीत बंद करून ठेवण्यात येई, आणि कंटाळवाणी संध्याकाळ संपता संपत नसे. तासन् तास लिहीत अथवा वाचीत बसून जीव उबगून गेला, म्हणजे मग त्या लहानशा खोलीत फेऱ्या घालण्यास प्रारंभ करावा आणि फेऱ्या म्हणजे तरी काय? चार पावले पुढे टाकली की मागे वळावयाचे! पशुसंग्रहालयातील पिंजऱ्यात फेऱ्या घालणारी अस्वले मी पाहिली होती, त्यांची मला आठवण होई! एखादे वेळी अतिशय कंटाळा आला म्हणजे मी शीर्षासन करीत असे.

हिवाळा लवकरच संपला. वसंतकालही झपाट्याने निघून गेला, आणि उन्हाळ्याला सुरुवात झाली. रोजच्या रोज उकाड्याचे मान वाढत चालले.

मला कलकत्त्याची हवा मुळीच आवडत नसे. चार दिवसांच्या वास्तव्यानेच मी अगदी गळून व विटून गेलो होतो. तुरुंगातील वातावरण तर साहजिकच अधिक वाईट होते. माझ्या प्रकृतीचे मान ठीक राहीना. वजन झपाट्याने घटू लागले. कड्या, कुलुपे, भिंती आणि तट ही दृष्टीस पडली की माझे मन वैतागून जाई.

एका महिन्यानंतर मला आवाराच्या बाहेर थोडासा व्यायाम घेण्याची परवानगी मिळाली. सकाळ-संध्याकाळ मुख्य तटाच्या आडोशाला फिरण्याची मला मुभा देण्यात आली होती. हळूहळू अलिपूरचा तुरुंग आणि कलकत्त्याची हवा, इतकेच काय, पण तुरुंगातील भिशीतला धूर व आवाज हीसुद्धा माझ्या पचनी पडली !

एप्रिल महिना उजाडला. अलिपूर जेलमध्ये माझ्या कानावर आलेल्या अप्रिय बातम्यांमुळे माझे मनःस्वास्थ्य बिघडून गेले होते. एके दिवशी तुरुंगाच्या सुपरिन्टेन्डेन्टने सहजगत्या मला सांगितले की, ' गांधीजींनी कायदेभंग परत घेतला.' इतकी वर्षे महत्त्वाची मानलेली चळवळ संपुष्टात आली हे ऐकून मनाला दुःख झाले. तथापि असा शेवट व्हावयाचा हे ठरलेलेच होते, अशी माझी मी समजूत केली. तदनंतर माझ्या हाती साप्ताहिक ' स्टेट्स्मन ' पडला व कायदेभंग थांबविताना गांधीजींनी केलेला खुलासा मला वाचावयास मिळाला. तो विपरीत खुलासा पाहिल्यावर माझे अन्तःकरण अंधारात खचत चालले आहे असे मला वाटले. कायदेभंग बंद करण्यात गांधीजींनी यथोचित वर्तन केले, असेच मला वाटले. पण त्यांनी जी कारणमीमांसा मांडली होती ती मात्र बुद्धीची अवहेलना करणारी होती. राष्ट्रीय चळवळीच्या पुढाऱ्यांनी असल्या तर्कशास्त्राचा अवलंब करावा ही विलक्षण गोष्ट होय.

गांधीजींच्या व माझ्यामध्ये अफाट दर्या पसरला आहे, असे मला वाटले. गेली कित्येक वर्षे ज्या स्नेहबंधनांनी मी त्यांच्याशी निगडित होऊन गेलो होतो, ती तुटून जात आहेत असे वाटून अंतःकरणात सुरी खुपसल्याप्रमाणे मला वेदना झाल्या. कित्येक वेळपर्यंत माझ्या मनात तुफान माजून राहिले होते. गेल्या एकदोन वर्षांत गांधीजींनी केलेल्या गोष्टी मला फारशा पसंत नव्हत्या. कायदेभंगाच्या चळवळीत आपले सहकारी गुंतले असता त्यांनी चालू केलेले उपवास व उत्पन्न केलेले नवे नवे प्रश्न, त्यांनी स्वतःच उपस्थित

केलेल्या अनेक भानगडी व त्यामुळे त्यांच्यापुढे पडलेले विलक्षण पेच ह्या सर्व गोष्टींच्या मी विरुद्ध हातो. मी थोडा वेळ तुरुंगाबाहेर होतो. तेवढ्या वेळात आमच्यातील हे सर्व भेद माझ्या पूर्णपणे लक्षात आले होते.

एकदम मनात विचार आला की, अलिपूरच्या तुरुंगात आपण एकाकी कोंडलेले आहोत. मला सर्व जीवन असार आणि अरण्यवत भासू लागले. आतापर्यंत अनेक बिकट धडे मी गिरवले असतील; परंतु सर्वांत बिकट व दुःखदायक असा धडा मला आता गिरवावयाचा होता. तो असा की, आपण दुसऱ्या कोणावरही विसंबून राहता कामा नये. आयुष्याच्या मार्गावर सोबतीची पर्वा न करता चालत राहिले पाहिजे. दुसऱ्यावर विसंबून राहिले म्हणजे निराशा व्हावयाचीच.

माझ्या अंतःकरणातील हे वादळ ज्यांनी माजविले त्या गांधींची मला पुन्हा आठवण झाली. गांधीजी म्हणजे किती असामान्य माणूस ! त्यांच्या स्वभावातील गोडी किती अनुपम, किती अनिवार्य, आणि जनमनावरील त्यांचे प्रभुत्व तरी किती सूक्ष्म पण गाढ ! त्यांच्या केवळ लेखांवरून आणि उक्तींवरून गांधीजींची खरी कल्पना येणार नाही. त्यापेक्षा किती तरी पटींनी त्यांचे व्यक्तित्व मोठे आहे. आणि त्यांनी केलेली हिंदुस्थानची सेवा तरी किती विशाल आहे बरे ! हिंदी जनतेत त्यांनी मनुष्यपणा निर्माण केला. धैर्याचा स्फुलिंग चेतविला. शिस्त व सहनशक्ती यांचे बीजारोपण केले. आणि ध्येयासाठी हसतमुखाने त्याग करावयास आणि त्या त्यागाला अनुरूप असा विनय अंगी धारण करण्यासही त्यांनीच ना शिकवले ? धैर्याच्या खंबीर पायावरच शीलसंवर्धन करता येईल असे ते म्हणत असत. ज्याच्यापाशी धैर्य नाही, त्याच्यापाशी नीती, धर्म, प्रेम— काहीही असणे शक्य नाही. मनावर भीतीचे दडपण असेल तर सत्य अथवा प्रेम यांची साथ फार काळपर्यंत करता येणार नाही. हिंसेबद्दल मनात आत्यंतिक तिटकारा असूनही ' भ्याडपणा हा हिंसेपेक्षादेखील तिरस्करणीय आहे,' असे ते म्हणत असत.

गांधीजी हिंदुस्थानचे अनन्यसामान्य असे प्रतिनिधी बनले. ह्या पुरातन आणि हतदैवी देशाचे अंतःकरणच त्यांच्या शब्दांवाटे प्रकट होत होते. गांधीजी म्हणजेच जणू काही हिंदुस्थान असे वाटावे. त्यांच्यातील उणीवादेखील हिंदुस्थानच्या राष्ट्रदेहांतील उणीवा होत्या. त्यांचा अपमान झाला, तर

तो गांधीजी या व्यक्तीचा नसून सर्व राष्ट्राचा झाला असे वाटत असे. व्हाइसरॉय वगैरेसारखे जे सद्गृहस्थ गांधीजींची नालस्ती करीत, त्यांना आपण सर्व राष्ट्राच्या हृदयाला सुया बोचीत आहोत याची जाणीव नसावी. परंतु आज गांधीजींचे धोरण, त्यांची देशसेवा, त्यांचे माझ्यावर झालेले अनंत उपकार यांविषयी प्रश्नच नव्हता. ह्या सर्व गोष्टी मान्य असल्या, तरीही इतर बाबतींत माणूस घोडचुका करणार नाही असे थोडेच आहे? त्यांचे ध्येय तरी कोणते? इतक्या वर्षांचा सहवास घडूनसुद्धा मला त्यांचे ध्येय स्पष्टपणे कळलेले नव्हते. आणि त्यांना तरी स्वतःच्या ध्येयाची स्पष्ट कल्पना आलेली आहे की नाही, याची मला शंकाच वाटत होती.

गांधीजी म्हणजे एक कोडे आहे; विसंगतीचे एक उदाहरण आहे. सर्वच असामान्य माणसे, मला वाटते, अशी असतात. कित्येक वर्षे मला एक मोठे गूढ पडले आहे, की पददलित माणसांविषयी ज्याला इतके गाढ प्रेम व आस्था वाटते, त्याने पददलित वर्ग हमखास उत्पन्न करणाऱ्या व त्याला पिसून काढणाऱ्या समाजरचनेला पाठिंबा द्यावा, हे कसे? अहिंसेचा जो एवढा मोठा कैवारी, त्यानेच निर्भेळ हिंसा व दडपशाही यांवर आधारलेल्या सामाजिक व राजकीय संस्थांना मान्यता द्यावी, हा काय न्याय? स्वतःला ते कधी कधी समाजवादी म्हणवतात. पण त्या शब्दाला त्यांच्या कोशात विशिष्ट अर्थ आहे. व्यवहारात समाजवाद या शब्दामुळे ज्या आर्थिक घटनेचा बोध होतो, तो त्यांच्या व्याख्येत बसत नाही. त्यांच्या मागोमाग बऱ्याच प्रमुख काँग्रेस-कार्यकर्त्यांनीही त्या शब्दाचा वापर करण्यास प्रारंभ केलेला आहे. त्यांच्या तोंडी असणाऱ्या समाजवादाचा 'भूतदयावादाचे कडबोळे' एवढाच अर्थ करता येईल.

दक्षिण आफ्रिकेत असताना गांधींच्या मनात कल्पनातीत स्थित्यंतरे घडून आली व त्या योगाने प्रचंड विचारमंथन होऊन त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोण पार पालटून गेला. तेव्हापासून एका ठाम विचारसरणीच्या स्थिर पायावर त्यांच्या कल्पनांना अधिष्ठान सापडलेले असून गांधीजींच्या विचारात आता स्थित्यंतराला वाव उरलेला नाही. हिंसाकर्माशी निगडित झालेल्या समाजवादाविषयी, व विशेषतः मार्क्सवादाविषयी, त्यांचे मन साफ नाही. कलह व हिंसा यांचा भपकारा वर्गकलह ह्या शब्दातून येत असल्यामुळे

त्यांना तो शब्ददेखील त्याज्य वाटतो. जनतेच्या राहणीचे मान काही एका किमान दर्जापलीकडे जावे अशी त्यांची मुळीच इच्छा नाही. काही मूठभर सुखासीन लोक विषयकर्दमात लोळत आहेत तेवढे पुरे; त्यांची संख्या वाढवून परिस्थिती अधिकच बिघडविण्यात काय हशील? विशिष्ट मर्यादेपलीकडे सुखसाधनांची वाढ व्हावी याविषयी ते उत्सुक नसल्यामुळे समाजवाद जे चित्र रेखाटतो, ते त्यांना यत्किंचितही विलोभनीय वाटत नाही. मग भांडवलशाही अंशतः तरी मान्य का करावयाची? वास्तविक त्यांना दोन्ही पद्धतींबद्दल तिटकाराच आहे. परंतु भांडवलशाही सध्या प्रत्यक्ष विद्यमान आहे म्हणून, तिच्याकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही म्हणून, व सपशेल उपासमारीपेक्षा ती जरा बरी म्हणून, ते भांडवलशाहीला मान्यता देतात, इतकेच.

आत्यंतिक सुख व स्वास्थ्य मिळविणे हे ध्येय असे लोकांनी न मानता जीवन अधिक नीतिमय करावे, दुराचरणाचा त्याग करावा, चैन सोडावी, आणि अशा रीतीने स्वतःची आत्मोन्नती साधीत जावे, अशी त्यांची इच्छा आहे. आणि ज्या कोणाला जनतेची सेवा करावी असे वाटत असेल, त्याने जनतेची आर्थिक उन्नती साधणे हेच आपले मुख्य काम आहे असे न समजता स्वतःच्या राहणीचे मान कमी करून सामान्य जनांच्या पायरीवर यावे व त्यांच्याशी मिसळावे. खरी लोकशाही ती हीच, असे त्यांचे मत असल्याचे १७ सप्टेंबर १९३४ रोजी गांधीजींनी काढलेल्या जाहीर पत्रकावरून दिसून येईल.

ही दृष्टी बहुधा पुरातन काळाशी संलग्न झालेली आढळते. त्या काळची परिस्थिती बदलून स्वप्नातही कधी कल्पना आली नसेल इतकी साधनसंपत्ती मानवजातीच्या हाती आता जमा झाली असली, तरी आमच्या मनाभोवती पडलेले भूतकालाचे पाश अद्यापि ढिले झालेले नाहीत. दुसरे ज्याला 'तमोयुग' म्हणतात तेच आपले 'कृतयुग' अशी समजूत करून घेऊन कॅथलिक लोक मध्ययुगीन कालाकडे माना मुरडून पाहात आहेत. "इस्लामी लोकशाही"चे युग पहिल्या पहिल्या खलिफांच्या सदा विजयी राजवटीत होऊन गेले म्हणून मुसलमानांची दृष्टी त्या जमान्यावर खिळून राहिली आहे व वैदिक काळ आणि रामराज्य यांची स्वप्ने हिंदू लोक या घडीला पाहात आहेत. पण इतिहास

मात्र कानाशी ओरडून सांगतो आहे की, त्या सुवर्णयुगात अन्नवस्त्रादी अत्यावश्यक गोष्टीदेखील जनतेला मिळत नसत. लोकांना फाके मारावे लागत. शिखरावरच्या मूठभर लोकांनी अत्यानंद चाखला असेल; कारण आत्मिक विलास उपभोगण्यासाठी आवश्यक ती साधने व स्वास्थ्य त्यांना लाभत होते. पण इतरांची दशा पुसाल तर उदरभरणासाठी घाम शिंपीत राहण्यापलीकडे त्यांनी काही केले असेल अशी कल्पनासुद्धा करवत नाही. उपाशी पोटाला संस्कृती कसली आणि वेदान्त कसला ? पोटाला गोळाभर अन्न कसे मिळावयाचे ह्या विवंचनेतच ते निमग्न असणार.

व्यक्तीची मानसिक, नैतिक व आध्यात्मिक उन्नती करून तद्द्वारा परिस्थितीत बदल करावा, असे गांधीजींना वाटते. दुराचरणाचा व भोग-लोलुपतेचा मार्ग वर्जून लोकांनी शुद्ध व्हावे, अशी त्यांची इच्छा आहे. मद्यपान, धूम्रपान इत्यादी व्यसने सोडा, कामवासनेचे दमन करा, असा त्यांचा आग्रहाचा उपदेश आहे. पण माणसाची लुटारू वृत्ती उतावी, मातावी आणि ती स्वैर सुटावी, अशीच सध्यांची समाजव्यवस्था आहे. त्यात मनुष्याच्या अधम वृत्ती "गवता ऐशा उदंड" पोसतात, हेही तितकेच खरे आहे. दुसऱ्यांना जमिनीवर लोळवून जो त्या मुडद्यांच्या उंच राशीवर उभा राहील तो यशवंत ठरतो. असल्या आकांक्षा व असल्या भावना समाजात जोपासल्या जात असता व शिखरावरची माणसे त्यांच्या संमोहनाला बळी पडत असता, नीतिमान मानव निर्माण करण्याचे आपले ध्येय जयास जाईल असे गांधीजींना वाटते तरी कसे ?

# पुनश्च डेहराडून तुरुंग २१

आलिपूरच्या तुरुंगातील हवा मला मानवेना. माझे वजन बरेच घटले आणि कलकत्त्याच्या वाढत्या उन्हाळ्याचाही मला त्रास होऊ लागला. मला चांगल्या हवेच्या ठिकाणी नेणार अशी बातमी उठली होती. शेवटी १७ मे

रोजी “ लपेट बिस्तरा ” असा हुकूम होऊन मी त्या तुरुंगातून बाहेर पडलो. मला डेहराडून तुरुंगात पाठवावयाचे ठरले होते. इतक्या महिन्यांच्या एकान्तवासानंतर संध्याकाळच्या थंड हवेत कलकत्त्याहून मोटरीने जाताना फार मजा वाटली आणि हावरा स्टेशनच्या भव्य आवारातील गर्दी पाहून अतिशय आनंद झाला.

बदली झाल्यामुळे मला फार समाधान वाटले. मनात म्हटले, की आता डोंगराच्या शेजाराला आपण जाणार. पण आल्यावर पाहतो तो नऊ महिन्यांपूर्वीचे डेहराडून आता राहिलेले नव्हते. एका स्वच्छ व दुरुस्त केलेल्या गोठ्यात माझी सोय करण्यात आली. आवाराभोवतालचा तट दहा फुटांचा चौदा-पंधरा फुटांपर्यंत चढवला होता. त्यामुळे ज्या टेकड्या पाहण्यासाठी मी उतावीळ झालो होतो, त्या मुळीच दिसेनात! पूर्वीप्रमाणे तुरुंगाच्या दारासमोर फेऱ्या मारण्याची परवानगी नाकारण्यात आली. हे आणि इतर नवे निर्बंध मोठे निराशाजनक होते. त्यांचा मला जाच वाटू लागला. माझा उत्साह पार मावळला आणि अंगणातल्या अंगणामध्ये जो काही थोडा-फार व्यायाम करता येण्यासारखा होता, तोही मला करावासा वाटेना. इतका एकलेपणा मला पूर्वी कधीच वाटला नव्हता. ह्या एकान्तवासाचा अनिष्ट परिणाम माझ्या मनावर होऊन माझे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य बिघडून गेले.

सहा आठवड्यांनंतर पावसाळा सुरू होऊन मुसळधार पाऊस पडू लागला. पहिल्याच आठवड्यात बारा इंच पाऊस झाला. हवा बदलली आणि नवजीवनाच्या हालचालींची चाहूल ऐकू येऊ लागली. हवेत गारवा येऊन शरीराला हायसे वाटू लागले. पण मनाचे अथवा डोळ्यांचे शांतवन होईना. मधून मधून माझ्या आवाराचा लोखंडी दरवाजा उघडून वॉर्डर आत येई अथवा बाहेर जाई, तेव्हा काही थोडे क्षण बाहेरच्या जगाचे ओझरते दर्शन मला घडत असे,—हिरवीगार शेते आणि हिरवीगार झाडे, त्यांचा तो चमकदार रंग आणि त्यांच्यावर मोत्याप्रमाणे चमकणारे ते पावसाचे थेंब. पण हे दृश्य क्षण दोन क्षणच दिसून विजेच्या सळीप्रमाणे लक्दिशी नाहीसे होई.

त्या वेळी माझे मन:स्वास्थ्यही बिघडलेलेच होते. मला स्वस्थ झोप लागत नसे आणि तऱ्हेतऱ्हेची स्वप्ने पडत. माझ्या बाबतीत हा नवाच प्रकार होता. कधी कधी मी झोपेत ओरडत असे. एकदा मी नेहमीपेक्षा बराच मोठ्याने

झोपेत ओरडलो असलो पाहिजे. कारण, मी खडबडून जागा होऊन पाहतो तो माझ्या अंथरुणाशी दोन वॉर्डर सचिंत मुद्रेने उभे असलेले दिसले. माझा गळा कोणी तरी दाबीत असल्याचे मी स्वप्नात पाहिले.

वर्तमानकाळाविषयी मन नाउमेद झाल्यामुळे माझ्या सार्वजनिक आयुष्याच्या प्रारंभापासून हिंदुस्थानात झालेल्या राजकीय घडामोडींसंबंधी मी विचार करू लागलो. आम्ही केले ते कितपत योग्य होते ? कितीसे चूक होते ? मी माझे विचार जर लिहून काढले तर ते अधिक सुसंगत व उपयुक्त होतील अशी कल्पना माझ्या डोक्यात आली, आणि मन एका निश्चित कार्यामध्ये गुंतून राहिले म्हणजे त्याला विरंगुळा मिळेल असे वाटले. म्हणून १९३४ च्या जूनमध्ये मी हे ‘ आत्मचरित्रपर कथानक ’ लिहावयास घेतले. लहर लागली की लेखणी उचलावी असे गेले आठ महिने चालले आहे. पुष्कळदा अशा वेळा आल्या की लिहिण्याची वांच्छाच होऊ नये. तीनदा महिन्या-महिन्याचे खंड पडले. परंतु मी काम तसेच पुढे रेटले आणि आता ह्या वैयक्तिक प्रवासाच्या अखेरच्या मुक्कामाची वेळ जवळ येत चालली आहे. विषण्णतेच्या छाया मनात दाटलेल्या असताना व भावनांची वादळे मनात उठली असताना ह्यापैकी बहुतेक लेखन झालेले आहे. त्याचे प्रतिबिंब कदाचित माझ्या लेखनातही उमटलेले असेल. लिहीत असताना मी जणू स्वतःशीच बोलत होतो. स्वतःच प्रश्न मांडीत होतो व स्वतःच्या समजुतीसाठी त्यांची उत्तरेही पण मीच देत होतो.

जुलै महिन्याच्या अखेरीला कमलेची प्रकृती झपाट्याने बिघडू लागली आणि थोड्याच दिवसांत मोठा निर्वाणीचा प्रसंग उद्भवला. ११ ऑगस्ट रोजी मला एकाएकी डेहराडूनमधून काढून पोलिसांच्या पहाऱ्यात अलाहाबादेला पाठविण्यात आले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी अलाहाबादमधील प्रयाग स्टेशनवर आम्ही पोचलो, तेव्हा आजारी पत्नीची भेट घेण्यासाठी तुम्हाला काही काळ सोडण्यात येत आहे, असे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने कळविले. मला अटक झाल्याला त्या दिवशी बरोबर सहा महिने होऊन गेले होते.

कमला अगदी निःशक्त आणि दुबळी होऊन पडली होती. पूर्वीच्या कमलेची ही जणू काही छायाच आपण पाहतो आहोत असे वाटे ! तिचे शरीर व्याधीबरोबर क्षीणपणाने झगडत होते. ती कदाचित मला सोडून जाईल

असा असह्य विचार माझ्या मनाला एकसारखा भेडसावू लागला. आमच्या विवाहाला अठरा–साडेअठरा वर्षे झाली होती. आमचा विवाह झाला तो दिवस आणि त्यानंतरच्या काळातील अनेक प्रसंग मला आठवले. विवाहाच्या वेळी मी २६ वर्षांचा होतो व कमला अवघी १७ वर्षांची मुग्ध अशी बाला होती. ह्या नाजुक आणि भावनामय मुलीचे मन एखाद्या सुकुमार फुलाप्रमाणे पाकळी-पाकळीने उमलत आहे, फार स्नेहाने आणि दक्षतेने त्याची निगा राखली पाहिजे, हे माझ्या लक्षात आले नाही ! दोघांच्या मनाची पार्श्वभूमी असमान असल्यामुळे मनांची गुंफण बेमालुम होत नसे. त्यामुळे कधी कधी खटके उडत. बारीक सारीक गोष्टींवरून रुसणीफुगणीही होत. परंतु ही पोरसौदा भांडणे फार वेळ टिकत नसत. तेव्हाच समेट घडून येई.

आमचा विवाह व्हावयाला आणि राजकारणाला नवी कलाटणी मिळावयाला एकच गाठ पडली. राजकारणामध्ये मी गर्क होऊन गेलो होतो. या चळवळीमध्ये मी इतका गुंगून गेलो होतो की, ज्या काळात कमलेला माझ्या पूर्ण सहकार्याची आवश्यकता होती, नेमकी त्याच वेळी तसा हेतू नसताही माझ्याकडून तिची उपेक्षा झाली ! आणि नंतर तिच्या आजाराला व माझ्या दीर्घकालीन शिक्षांना सुरुवात झाली. त्या मुदतीत फक्त तुरुंगातच काय ती आमची भेट व्हावयाची. कायदेभंगाची चळवळ सुरू झाल्यावर आघाडीच्या सैनिकांच्या बरोबरीने ती लढली आणि शिक्षा झाली तेव्हा तिला समाधान वाटले. त्यामुळे आमचे प्रेमसंबंध अधिकच दृढ झाले. कधी काळी होणारी आमची भेट आम्हाला अमोलिक वाटू लागली. भेटीची आम्ही किती किती उत्सुकतेने वाट पाहात असू !

वैवाहिक जीवनाची ती अठरा वर्षे ! पण त्यातील किती तरी वर्षे मी तुरुंगात काढली.— आणि किती तरी वर्षे कमलेने रुग्णालयात काढली ! याही खेपेला मी तुरुंगात खितपत पडलो होतो, आणि कमला अंथरुणावर खिळून होती. एक-दोन दिवसच काय ती मला मोकळीक मिळणार, अशा तऱ्हेचे विचारचक्र माझ्या मनात भ्रमत होते. आणि तासामागून तास, दिवसामागून दिवस जात असता मी तिच्या उशाशी बसून राहिलो होतो.

स्थानिक बाचाबाची आणि भराभर पसरत चाललेले नवे राजकारण यामुळे माझा जीव अगदी उबून गेला. मला आपला सूर त्यात मिळवता

येईना. आमच्या अलाहाबाद शहरातच मला परक्याप्रमाणे वाटू लागले. अशा गोष्टीत मन घालण्याचा प्रसंग स्वत:वर आला म्हणजे माझ्यासारख्याला कसे वागावे लागेल, ह्या विवंचनेत मी पडलो होतो.

माझी सुटका होऊन अकरा दिवस झाले होते. २३ ऑगस्ट रोजी पोलिसची मोटर दाराशी आली व तुमची मुदत संपली असल्याकारणाने तुम्ही मजबरोबर नैनी तुरुंगाकडे चलावे, असे पोलिस-अधिकाऱ्याने मला सांगितले. मंडळींचा मी निरोप घेतला. आता मी मोटरीत बसणार इतक्यात आई आजारी असताही धावत माझ्यापाशी आली व तिने मला घट्ट पोटाशी धरले! त्या वेळचा तिचा चेहेरा किती तरी वेळ माझ्या डोळ्यांपुढून हालला नाही.

मी पुन्हा नैनी तुरुंगात येऊन दाखल झालो; आणि वाटले की, जणू काही नव्या शिक्षेलाच सुरुवात होते आहे. आतून बाहेर, बाहेरून आत; टेनिसच्या चेंडूप्रमाणे माझी अवस्था झाली होती. ह्या फेकाफेकीमुळे माझे सर्व मन हादरून गेले. हे सारखे होणारे फेरबदल अंगवळणी पाडणे सोपे नव्हते.

तुरुंगात पुन्हा पाऊल ठेवल्यानंतर बरोबर एका महिन्याने एका पोलिस-ऑफिसरने मला जरा वेळ पत्नीच्या भेटीसाठी नेले. ऑक्टोबरच्या सुरुवातीला मला पुन्हा भेटण्यासाठी नेण्यात आले. तापाने फणफणून ती सुंद होऊन पडली होती. आम्ही असे ठरवले होते की, कमलेला जरा हुषारी वाटू लागताच दुसऱ्या चांगल्या स्थळी हालवायचे. पण बरे वाटण्याचे बाजूला राहून तिची प्रकृती खालावतच चालली. तेव्हा इत:पर फुकट वाट पाहात न बसता, आहे अशा क्षीण अवस्थेतदेखील तिला हिमालयात भोवाली येथे न्यावे असे ठरले.

पाऊण महिन्यानंतर नैनीहून मला आलमोऱ्याच्या जिल्हा तुरुंगात नेण्यात आले. भोवाली वाटेवरच होती. तेथे आम्ही काही तास थांबलो. कमलेची प्रकृती बरीच सुधारलेली दिसली व त्यामुळे मलाही फार आनंद आला. तिचा निरोप घेऊन मी आलमोऱ्यास जाण्याकरता निघालो, तेव्हा माझे मन आनंदाने हलके फूल झाले होते. वास्तविक कमलेची भेट होण्यापूर्वीच पर्वतांच्या पंक्ती पाहून माझे मन उमलले होते.

आम्ही आलमोऱ्याला निघालो तेव्हा रात्र व्हावयाला अजून फार अवकाश होता. मुक्कामाला पोचण्याच्या सुमाराला आम्ही एक वळण घेतले. इतक्यात ढग फाकले जाऊन जे एक नवेच दृश्य मला दिसले, त्यासरशी आश्चर्य व

आनंद यांनी मी थक्क होऊन गेलो. घनदाट अरण्याने आच्छादलेल्या पर्वतांच्या पलीकडे, लांब अंतरावर, हिमालयाची बर्फाच्छादित शिखरे लखलखत होती. मला वाटले की, युगानुयुगांच्या ज्ञानाने गंभीर आणि अगम्य अशी भासणारी ती गिरिशृंगे खालच्या मुलुखावर पहारा करण्यासाठीच जणू काही उभी राहिली आहेत ! त्यांच्या दर्शनाबरोबर माझा मनस्ताप निवला आणि खालच्या प्रदेशात आणि शहरात चाललेले क्षुद्र कलह आणि कारस्थाने, अभिलाषा आणि असत्ये, ही ह्या नगाधिराजाच्या गौरवाच्या मानाने निःसार आणि नगण्य आहेत, असा विचार मनात आला.

आलमोऱ्याचा छोटेखानी तुरुंग एका डोंगराच्या कंगोऱ्यावर वसलेला आहे. मला राहण्यासाठी एक भली प्रशस्त बराक देण्यात आली. ती बराक म्हणजे एकावन्न फूट लांब व सतरा फूट रुंद असा एक प्रचंड गाळाच होता. जमीन उकीरवाकीर आणि छप्पर वाळवीने किडलेले होते. वरून एकसारखा बुऱ्हा पडत असे. बराकीला पंधरा खिडक्या आणि एक दरवाजा होता. खरे म्हणजे खिडक्या व दारे असे त्यांना म्हणताच यावयाचे नाही; गज घातलेली ती सोळा भगदाडे होती असेच म्हटले पाहिजे ! तेव्हा ताज्या हवेची तर तेथे वाणच नव्हती. थंडी पडू लागल्यावर काही भगदाडे तरटे लावून बंद करावी लागली. ह्या प्रचंड दालनात एखाद्या एकछत्री राजाप्रमाणे मी राहात होतो ! पण मी अगदीच एकटा होतो असे मात्र म्हणता येणार नाही. कारण त्या चंद्रमौळी छप्परात कमीत कमी चाळीस-पन्नास चिमण्यांनी तरी कोठे केलेले होते. कधी कधी एखादा प्रवासी मेघ मला भेटावयास आला की खिडक्यांवाटे त्याचे अनेक बाहू आत घुसत आणि मग ती सर्व खोली ओलसर धुक्याने भरून जाई !

दुपारी साडेचार वाजता माझे जेवण झाले की पाचच्या सुमाराला मला बराकीत बंद करण्यात येत असे, आणि सकाळी सात वाजता दरवाजा खोलला जाई. दिवसा मी बराकीत अथवा शेजारच्या अंगणात ऊन खात बसावयाचा. भोवतालच्या तटावरून एक दोन मैल अंतरावरच्या डोंगराचे शिखर दिसत असे; डोक्यावर ढगांच्या बुट्टयांचा निळ्या नभाचा विस्तीर्ण चांदवा ताणलेला दृष्टीस पडे. हे ढग विलक्षण रूपे धारण करीत आणि त्यांच्याकडे पाहात बसण्याचा मला कधीही कंटाळा येत नसे. हरतऱ्हेच्या

श्वापदांचे स्वरूप ढगांना प्राप्त होत आहे अशी माझ्या मनात कल्पना येई आणि कधी कधी सारेजण एकत्र गोळा झाले की ढगांचा अफाट समुद्रच पसरला आहे असे वाटे. अथवा ते पुळणीप्रमाणे दिसत आणि देवदारूंच्या झाडांतून वारा घोंघावू लागला की दूर अंतरावरच्या वेळेवर भरतीच्या थापेचा आवाज व्हावा त्याप्रमाणे भास होई. कधी कधी एखादा मेघ आमच्यावर मोहरा करून येई. येताना तो चांगला भरदार आणि आटीव दिसावयाचा; पण जवळ आला की पिंजलेल्या कापसासारखा फुलून त्याचे धुके होई आणि सरतेशेवटी मी त्यात लुप्त होऊन जात असे.

कमलेच्या प्रकृतीत सारखे चढउतार चालले होते. त्यामुळे मन अस्वस्थ होत असे. अनिष्ट बातमी समजली की थोडा वेळ जीव खालवर होई. पण डोंगरी वाऱ्याचा हात अंगावरून फिरला म्हणजे मनातील काहूर निवत असे आणि चित्ताचे सान्त्वन होई. तेथील हवेमुळे मला फिरून पूर्वीप्रमाणे गाढ झोप लागू लागली. झोप पापण्यांवर घुटमळू लागली म्हणजे मला वाटे की, झोप म्हणजे किती अजब आणि किती गूढ चीज आहे! झोपेतून मनुष्य जागा होतोच कशाला? समजा, की मी कधीच जागा झालो नाही तर?

जानेवारी महिना संपून फेब्रुवारीला नुकताच प्रारंभ झाला आहे आणि वातावरणात वसंताचा पदरव ऐकू येत आहे. बुलबुल वगैरे पक्षी दिसू लागले असून त्यांचे संगीत कानावर पडत आहे. इवलाले कोंभ जमिनीच्या कंवद्या फोडून वर डोकावत असून या विचित्र सृष्टीकडे विस्मयाने पाहात आहेत. टेकड्यांच्या उतरणीवर ऱ्होडोडेंड्रनचे रक्तासारखे लाल गुच्छ बहरले आहेत. आणि पीच व प्लमच्या झाडांवर नुकता कोठे मोहोर डोकावू लागला आहे. सरांतून ओघळून जाणाऱ्या मण्यांप्रमाणे चाललेले दिवस मोजीत व कमलेच्या पुढील भेटीचा विचार करीत मी बसलो आहे. आशाभंग, यातना आणि वियोग यांच्या शिशिर ऋतूनंतर जीवनाच्या प्रफुल्ल वसंताला प्रारंभ होतो असे म्हणतात, ते कितपत खरे असेल कोण जाणे!

# भरतवाक्य २२

**कर्म करीत असावे, एवढेच आपल्या ललाटी लिहिलेले आहे; कर्मांचे फळ चाखावे असे लिहिलेले नाही. —टालमुड.**

संपले माझे निवेदन. माझ्या जीवनातील प्रसंगाचे हे आत्मप्रधान कथानक मी आज १४ फेब्रुवारी १९३५ रोजी आलमोऱ्याच्या जिल्हा-तुरुंगात लिहून पुरे करीत आहे. याच तुरुंगात बरोबर तीन महिन्यांपूर्वी मी माझा ४५ वा वाढदिवस साजरा केला. मला वाटते की मी अद्यापि पुष्कळ वर्षे जगेन. कधी कधी वार्धक्याच्या कल्पनेने मन झाकोळून जाऊन गात्रे थकून जातात, तर कधी कधी मला उल्हासाचे व उत्साहाचे भरते येते. माझे शरीर चांगले टणक आहे. आघात झाल्यानंतर माझे मनही लवकरच पूर्ववत होते, तेव्हा मध्यंतरी काही अस्मानी-सुलतानी झाली नाही, तर मी पुष्कळ दिवस तग धरीन असे मला वाटते. भविष्यकाळासंबंधी लिहावयाचे म्हटले, तरी आधी माणूस जगला-वाचला पाहिजे ना ?

गेल्या काही वर्षांतील अनुभवांपासून अनेक फायदे झाले आहेत; पण त्यांतला एक फायदा अत्यंत महत्त्वाचा म्हटला पाहिजे. जीवन हा एक नितान्त रमणीय अनुभव आहे. त्यात किती तरी शिकण्यासारखे आहे, किती तरी करण्यासारखे आहे असे मला वाटू लागले. माझी एकसारखी प्रगती होत आहे असे मला वाटत असे, व अजूनही माझी तीच कल्पना आहे. त्या कल्पनेमुळे माझ्या कार्याला उत्साहाची जोड मिळत असते. निरनिराळी पुस्तके वाचताना माझे मन तल्लीन होऊन जाते व एकंदर आयुष्याला रंजकता प्राप्त होते.

पुष्कळ वेळा माझ्या मनात अशी शंका उत्पन्न होते की, मी एका तरी व्यक्तीचा प्रतिनिधी आहे काय ? अनेकांच्या मनामध्ये माझ्यासंबंधी मित्रत्वाची अथवा आपुलकीची भावना वसत असली, तरी पण मला कोणाचाही प्रतिनिधी म्हणता येणार नाही. पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतीच्या संमिश्र रांध्यापासून मी निर्माण झालो आहे. माझे सूत कुठेच जमत नाही, मी कोठेही नांदत

नाही. माझे विचार व माझा जीवनविषयक दृष्टिकोण पौर्वात्य संस्कृतीपेक्षा पाश्चात्य संस्कृतीशीच अधिक मिळता-जुळता असावा. परंतु हिंदभूच्या कोट्यवधी अपत्यांप्रमाणेच मीही अनेक पाशांनी तिच्या अन्तःकरणाशी संबद्ध होऊन गेलेलो आहे, आणि माझ्या अन्तर्मनाचा एक धागा आतापर्यंतच्या ब्राह्मणांच्या ज्या शेकडो–हजारो पिढ्या झाल्या त्यांच्या स्मृतींशी सह्लग्न होऊन राहिलेला आहे. ते इतिहासाचे देणे मला विसरता येत नाही, आणि आधुनिक संस्कृतीची लेणीही मला झुगारून देता येत नाहीत. इतिहास व वर्तमान काळ माझ्या रक्तात जसे काही भिनून गेलेले आहेत.

दूरचे डोंगर साजरे दिसतात, चढावयाला सोपे वाटतात; मनाला वाटते, की गिरिशिखर आपणाला जणू काही बोलावीत आहे. परंतु जवळ जावे तो अडचणी दिसू लागतात व प्रत्येक पावलागणिक प्रवास कठीण होत जाऊन ढगांमध्ये डोंगरमाथा दिसेनासा होतो. तथापि, डोंगर चढून पाहण्यातदेखील एक प्रकारचा आनंद व समाधान असतेच की नाही? तसेच जीवनालासुद्धा जे महत्त्व प्राप्त होते, ते कदाचित आयुष्यातील कराव्या लागणाऱ्या झगड्यामुळेच असेल. झगड्याचा परिणाम काय होतो, यावर जीवनाचे महत्त्व तितकेसे अवलंबून नसते. योग्य मार्ग कोणता ह्याबद्दल पुष्कळदा संदेहही उत्पन्न होतो. परंतु अयोग्य कोणते ते ओळखणे कधी कधी बरेच सोपे असते. आणि अयोग्य वाटणारा मार्ग टाळणे हेदेखील महत्त्वाचेच आहे. महात्मा सॉक्रेटिसाचे अंतकाळचे उद्गार मोठ्या नम्र भावनेने मी उद्धृत करू का? "मरण म्हणजे काय ते मला सांगता येणार नाही;—मरण ही कदाचित चांगली गोष्ट असेल. मग मला त्याचे भय काय म्हणून वाटावे? आपल्या गत आयुष्यापासून च्युत होणे ही वाईट गोष्ट आहे, एवढे मात्र निश्चित. तेव्हा जी गोष्ट वाईट आहे अशी माझी खात्री पटली, तिच्यापेक्षा जी गोष्ट चांगली असण्याचा संभव आहे तिचाच स्वीकार करणे योग्य नव्हे काय?"

तुरुंगामध्ये बसून काढलेली ही वर्षे! एकाकी बसून, आपल्याच विचारात गुरफटून राहून, एकामागून एक काळाच्या अनन्य अंधारात विलीन झालेले कित्येक ऋतू, शुक्लपक्षाचे कौमुदी-हास्य आणि कृष्णपक्षाच्या निबिड छाया मी किती वेळा तरी पाहिल्या असतील! जगाकडे तुच्छतेने पाहात मोठ्या दिमाखाने मिरवणाऱ्या तारकापंक्ती किती तरी वेळा माझ्या डोळ्यांसमोरून

गेल्या असतील. माझ्या तारुण्यातील शेकडो-हजारो दिवसांचे मृतदेह या तुरुंगाच्या आवारात पडलेले आहेत. केव्हा केव्हा त्या नष्टदिनांची स्मृति-पिशाच्चे जागृत होऊन माझ्या कानात कुजबुजतात की, " एवढा खटाटोप केलास, पण साधलेस काय ? " या प्रश्नाला उत्तर देताना मला कचरण्याचे काहीच कारण नाही. माझ्या गतायुष्याचे दान मला पुन्हा कोणी केले, तर माझ्या सध्याच्या ज्ञानाचे व अनुभवाचे साहाय्य घेऊन मी माझ्या आयुष्यात खासच अनेक फेरबदल करीन, आणि पूर्वी केलेल्या गोष्टींत अनेक प्रकारच्या सुधारणा करण्याचाही प्रयत्न करीन. परंतु, सार्वजनिक आयुष्यात मी घेतलेल्या मुख्य मुख्य निर्णयांच्या बाबतीत बदल होणे संभवनीय नाही, आणि तसा बदल करू म्हटले तरी तो होणेही शक्य नाही; कारण माझ्या कक्षेपलीकडे असलेल्या परिस्थितीमुळे त्या निर्णयांचे स्वरूप निश्चित झाले होते; आणि त्या निर्णयांकडे माझ्याहून समर्थ अशा शक्तींच्या द्वाराच मी खेचला गेलो होतो.

माझ्या पत्नीची प्रकृती चिंताजनक असल्याची बातमी आल्यामुळे ४ सप्टेंबर रोजी आलमोरा तुरुंगातून माझी अकस्मात सुटका झाली, व माझी शिक्षा " तहकूब " करण्यात आली आहे, असे मला कळविण्यात आले. मी साडेपाच महिने आधी सुटलो व सुटल्याबरोबर विमानमार्गे तडक युरोपकडे प्रयाण केले.

धुमश्चक्रीत सापडलेले, युद्ध व यादवी यांच्या चिंतेने काळवंडलेले, क्षितिजावर आर्थिक आपत्तीचे वादळ सदैव उभे असलेले युरोप; परचक्राखाली भरडला जाणारा व बॉम्बमुळे होरपळून जाणारा ॲबिसीनिया; आणि स्वतःच्या प्रजाजनांवर निर्दयपणे दडपशाही करणारे, बॉम्बचा पाऊस पाडणारे पण त्याचबरोबर राष्ट्रसंघाचा कैवार घेऊन तोंडाने शांतिस्तोत्र गाणारे सर्वबलाढ्य असे साम्राज्यवादी इंग्लंडसारखे राष्ट्र;—माझ्यापुढील जगताचे दृश्य हे असे आहे. पण ह्या ब्लॅक फॉरेस्टमधील शांततेचा व गांभीर्याचा तिळमात्र भंग झालेला नाही. खालच्या दरीतून धुके हळूहळू वर चढत आहे, तिकडेच माझे डोळे लागून राहिले आहेत. दूर अंतरावरील फ्रान्सची सरहद्द आणि इतर सर्व भूप्रदेश पाहता पाहता धुक्याआड दिसेनासा झाला ! धुक्याच्या ह्या पडद्याआड काय काय गोष्टी दडल्या आहेत कोणास ठाऊक !